म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : नाटक
दा. क्र. : २३४५६

IRBK-0123456

# अखेरचा सवाल

वसंत कानेटकर

IRBK-0123456

इंद्रायणी साहित्य
पुणे

प्रकाशक
श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य
२७३ शनवार पेठ
पुणे ४११ ०३०

तिसरी आवृत्ती
१० मार्च १९८९

किंमत
पंचवीस रुपये

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ 'शिव-पार्वती'
टिळक रोड
पुणे ४११ ०३०

या नाटकाचे सर्व हक्क
सौ. उषा वसंत कानेटकर
यांच्या स्वाधीन आहेत.
आगाऊ लेखी परवानगी
घेतल्याशिवाय
या नाटकाचा
कोणीही प्रयोग करू नये.
परवानगी
आणि
परवानगीमूल्य
यासंबंधात
सौ. उषा वसंत कानेटकर
शिवाई
शरणपूर रोड
नासिक २
या पत्त्यावर
पत्रव्यवहार करावा.

कै. नंदू
आणि तिच्या ममी
यांना

क्र. २३४५८ २५।७७।९
वि. नाटक

## निवेदन

माझी भाची आणि माझे मेव्हणे कै. मुकुंदराव श्रीखंडे यांची कन्या सुनंदा ऊर्फ नंदू दि. २१ जून १९७२ रोजी वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी कालवश झाली. त्यापूर्वी दोन वर्षे आधी किडनीच्या ट्यूमरसाठी तिच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. त्याच वेळी तिचे दुखणे कॅन्सरचे आहे याची जाण प्रथम डॉक्टरना आणि पाठोपाठ डॉक्टर असलेल्या तिच्या आईला आली. शस्त्रक्रियेनंतर नंदू वरकरणी जरी खडखडीत बरी झाल्या-सारखी दिसली तरी आज ना उद्या सेकंडरीज येणार याची डॉक्टरना आणि नंदूच्या मर्मीना पूर्ण कल्पना होती. १९७२ च्या जानेवारी-फेब्रुवारीत नंदूचे डोके दुखायला लागले. तिच्या दृष्टीवरही परिणाम झाला. त्याच वेळी सेकंडरीज मेंदूमध्ये डेव्हलप होत आहेत हे डॉक्टरांना आणि मर्मीनाही लक्षात आले. हळूहळू तिची संपूर्ण दृष्टी गेली. केसही गळाले. २१ जूनला नंदू गेली. या मधल्या काळात तिच्या घरात जे महाभारत घडले ते या नाटकात अंशत: चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे.

'अंशत:' म्हणण्याचे कारण तीन तासांच्या नाटकाच्या कथेत नंदू, ममी यांची संपूर्ण कहाणी मांडणे मला शक्यच नव्हते. मी फक्त त्यातील निवडक प्रसंग तेवढे उचलू शकलो. अंशत: म्हणण्याचे कारण दुसरेही असे की नाट्यकथा बांधताना कल्पित घटनांचे साहाय्यही मला घ्यावे लागले. सबंध नंदू—जयसिंह प्रकरण, तसेच देवदत्तांची व्यक्तिरेखा, आणि राजीव—हेमा प्रकरण मी अन्य ठिकाणाहून उचलून या नाट्य-कथेवर कलम केले आहे. पण तेवढे सोडले तर नंदूची संपूर्ण व्यक्तिरेखा, तिने आणि तिच्या आईने हा वज्राघात ज्या धैर्याने आणि शौर्याने सोसला, इतकेच नव्हे तर नंदू ज्या हसतमुखाने मरणाला सामोरी गेली, त्या साऱ्या

घटना अक्षरशः खऱ्या आहेत. माझ्या आजवरच्या सर्व नाटकांत हे एकच नाटक असे आहे की, ज्यातल्या घटना, प्रसंगच नव्हेत तर संवाददेखील वास्तव आहेत. थोडेही कल्पनेला मला कधी डिवचावे लागले नाही. उलट विचार मनात असा येतो की, यातल्या किती तरी जागा अशा आहेत की निव्वळ कल्पनेने मला त्या कधीच गोचर होऊ शकल्या नसत्या. या नाटकातले अवघे नाट्य मी प्रत्यक्ष डोळ्यांदेखत पाहिले, अनुभवले तेव्हा मी स्तंभित– अगदी अवाक् झालो होतो. Facts are stranger than fiction या वचनातले मर्म मी उमजलो होतो. कल्पनाविलासाचा थिटेपणाच नव्हे तर तिरळेपणाही माझ्या लक्षात आला होता. रसरशीत सशक्त अंगयष्टीची, देखण्या मुद्रेची, आणि गोड हसऱ्या स्वभावाची नंदू अगदी सहज हसत हसत मरणाला सामोरी गेली ! तिला दिसेनासे झाले त्या वेळची एक गोष्ट : 'हिमालयाची सावली'च्या पहिल्या प्रयोगाला सबंध कुटुंबियांना निमंत्रण करण्यासाठी मी शीवला त्यांच्या घरी गेलो होतो. नंदूच्या डोळ्यांवर काळा चष्मा होता. नंदू हसून मला म्हणाली– "काका, आता तुमच्या एखाद्या विनोदी नाटकात मला भूमिका द्या." मी वधायलाच लागलो. तशी नंदू चष्मा काढून दाखवत म्हणते– "पाहा मी कशी छान तिरळी झालेय ती." असे म्हणत नंदू खळखळून हसली. मी कष्टाने हसलो. या नाटकातले नंदूचे आणि तिच्या मर्मांच्या वृत्तीचे सारे लहानमोठे बारकावे मी मुळातून जसेच्या तसे उचलले आहेत. या नाटकाच्या अखेरीस आलेल्या घटनेला 'मर्सी किलिंग'चा थोडा वास येतो. पण या नाटकाचे उद्दिष्ट आणि अर्थ निराळाच आहे हे चतुर रसिकांच्या सहज लक्षात येईल. तो अर्थ या नाटकात ठायी ठायी इतका भरभरून व्यक्त झाला आहे की त्याचा या निवेदनात निर्देशदेखील रसिकतेचा अपमान करण्यासारखे होईल.

कै. नंदू आणि तिच्या मर्मी यांना प्रारंभापासून आधार देणारे माझे आप्त डॉ. अरविंद बावडेकर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी आणि माझी मावस-बहीण सौ. सरोज या उभयतांनी या नाट्यलेखनात मला अपरिमित साहाय्य केले आहे. वैद्यकीय उल्लेखांच्या दृष्टीने नाटक निर्दोष व्हावे यासाठीच नव्हे तर नाटकातला ध्वन्यर्थ सुस्पष्ट व्हावा यासाठीही या

उभयता पतिपत्नींनी वेळोवेळी मला बहुमोल सूचना दिल्या आहेत. मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. या नाटकाचे दिग्दर्शक दामू केंकरे आणि या नाटकात प्रमुख भूमिका करणाऱ्या सौ. विजया मेहता यांनीही या नाटकाच्या लिखितात आणि रंगमंचावरील प्रयोगात कल्पकतेने फार मोठी भर घातली आहे. गोवा हिंदू असोसिएशनचा कलाविभाग तर आता मला घरच्या माणसासारखा झाला आहे. त्याचे आभार कसे आणि कोणत्या शब्दांत मानावेत? या सर्वांशी मी कृतज्ञ आहे.

नित्याच्या रिवाजाप्रमाणे नंदू 'हिमालयाची सावली'च्या पहिल्या प्रयोगाला येऊ शकली नाही. त्याच दिवशी तिला सेकंडरीज यायला सुरुवात झाली. 'बेइमान'च्या आधी किती तरी दिवस ती गेली होती. आता हे नाटक रंगमंचावर सादर होईल त्या दिवशी नंदू प्रेक्षागृहातून थेट रंगमंचावर अवतरलेली दिसेल. नंदूने जे हसतमुखाने सोसले ते रंगभूमीवर पाहाण्याचे बळ तरी आम्हा आप्तेष्टांना मिळेल का?

नंदू— हे नाटक म्हणजे तुझ्या अवघ्या गोड स्मृतीला वाहिलेली भावफुले आहेत.

१४ एप्रिल १९७४
शिवाई
शरणपूर रोड, नासिक २

**वसंत कानेटकर**

## तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

या लोकप्रिय (अर्थात 'रसिकांच्या हिशेबी') नाटकाची ही नवी तिसरी आवृत्ती माझे मित्र श्री. श्यामराव कोपर्डेकर आपल्या 'इंद्रायणी साहित्य' प्रकाशनातर्फे प्रसिद्ध करीत आहेत. या देखण्या आवृत्तीचे माझे रसिक वाचक, प्रेक्षक तसेच हौशी कलाकार उत्साहाने स्वागत करतील. अशी मला खात्री वाटते.

१० मार्च १९८९
शिवाई
शरणपूर रोड, नासिक २

**वसंत कानेटकर**

## पहिला प्रयोग

या नाटकाचा पहिला प्रयोग दि गोवा हिंदू असोसिएशनचा कलाविभाग मुंबई येथे ऑगस्ट १९७४ च्या पहिल्या आठवड्यात सादर करीत आहे. या प्रयोगात भाग घेणारे कलावंत—

**दिग्दर्शन / नेपथ्य**

दामू केंकरे

**प्रकाशयोजना**

प्रकाश मळकर्णेकर

**क ला का र**

डॉ. दुभाषी : मोहन मुंगी

बॅ. देवदत्त : मधुकर तोरडमल

मुक्ताबाई : सौ. विजया मेहता

नंदू : भक्ती बर्वे

जयसिंह : उपेन्द्र दाते

हरिभाऊ : मोहनदास सुखठणकर

राजीव : अरुण जोगळेकर

हेमा : सौ. दया डोंगरे

गंगाराम : अजय वढावकर

## अंक पहिला

### प्रवेश पहिला

(बॅरिस्टर देवदत्त मुळगावकर आणि डॉ. सौ. मुक्ताबाई मुळगावकर यांचा बंगला. दर्शनी हॉल. फर्निचर, सजावट भारीपैकी. पण गृहिणीचा हात फिरत नसल्यासारखी अवकळा. वर जाण्यासाठी एक जिना. आत जाण्यासाठी एक दार. समोरून घरात येण्याचा दरवाजा. बाहेर व्हरांडा. पलीकडे छोटी बाग त्यापलीकडे मुक्ताबाईंचा दवाखाना, बॅ. देवदत्तांची कचेरी वगैरे असावे.

वेळ सायंकाळची. पडदा वर जातो, त्या वेळी हॉल रिकामा आहे. क्षणभरातच बाहेरून बोलत येतात डॉ. सौ. मुक्ताबाई आणि पाठोपाठ त्यांची बॅग घेऊन कम्पाउंडर हरिभाऊ गायतोंडे. मुक्ताबाई चाळिशीच्या असाव्यात. मुळात देखण्या पण अतिश्रमाच्या आणि काळजी–चिंतेच्या खुणा उग्र करारी मुद्रेवर स्पष्ट दिसतात. साध्या पातळ-पोलक्यावर त्यांनी एप्रन घातला आहे आणि गळ्यात स्टेथॉस्कोप अडकवला आहे. आत येता येता त्या एप्रन काढतात आणि व्हिजिटला जायची तयारी करीत बोलत राहतात.)

मुक्ताबाई — दोन पेशंट्स ड्रेसिंगचे. त्यांच्याबद्दल मी हेमाला सांगितलंय. इंजेक्शन्सदेखील ती देईल. मी केस-पेपर्स तयार करून ठेवलेत, तेवढ्यांची मिक्श्चर्स तुम्ही तयार करून द्या. तेवढ्यात मी व्हिजिटला जाऊन येते. (घड्याळात पाहात) अजून नंदू कशी आली नाही?

हरिभाऊ — (खवचटपणे) मॅचिस... मॅचिस चालल्या आहेत, त्या–त्या जयसिंह पाटलाबरोबर. रोज संध्याकाळी याच वेळी नियमानं जातात. सारख्या खेळायला जातात सुनंदाताई. बॅडमिंटन.

मुक्ताबाई — राजूही घरी परतलेला दिसत नाही.

हरिभाऊ — प्रोफेसर–लोकांची कसलीशी मीटिंग आहे; यायला उशीर होईल असा फोन आला होता त्यांचा हेमाला.

मुक्ताबाई — हूंऽऽ! यांच्याबद्दल तर काय विचारायलाच नको. कोर्ट उठलं तरी पक्षकारांचा घेराव काही सुटायचा नाही. यांच्या तब्येतीची काळजी करता करता एक दिवस मलाच ब्लडप्रेशरची व्यथा जडणार आहे. ही औषधाची गोळी. कोर्टातून घरी परतले की आठवणीनं घ्यायला

सांगायचं. लक्षात राहील तुमच्या? की—

हरिभाऊ म्हणजे काय बोलणं झालं? हार्टच्या पेशंटची काळजी कशी घ्यावी हे इतकी वर्षं दवाखान्यात औषधं घोटून मला कळत नसेल तर धोकटीच घेतलेली बरी.

मुक्ताबाई माझी काळजी वेगळीच आहे. तुम्हाला जरा जास्तच कळायला लागलंय दवाखान्यातलं आणि आमच्या घरातलंदेखील.

हरिभाऊ (सर्द होत) तसं नाही... तसं नाही, बाई—

मुक्ताबाई ते महीपतराव पवार बायकोला घेऊन येतील. त्यांना थांबायला सांगा. व्हिजिटसाठी डॉक्टर दुभाषी येणार आहेत म्हणावं. दवाखान्यात किती पेशंट्स राहिलेत अजून?

हरिभाऊ कितीऽऽ? सबंध वेटिंगरूम भरून बाहेर फूटपाथवर बसली आहेत पेशंटमंडळी. तुमच्या पद्धतीनं तपासायचं तर रात्री दहाचा भोंगा तरी नक्कीच वाजणार.

मुक्ताबाई मग हरिभाऊ, आता असं करा,—तुमच्या पद्धतीनं दवाखाना तुम्हीच चालवायला घ्या.

हरिभाऊ (शरमिंधे होत) हॅं हॅंऽ! भलतंच काय? म्हणजे माझ्या म्हणण्याचा अर्थ—

मुक्ताबाई कळला. त्या मुलाला हाक मारा आधी. काय त्याचं नाव—

हरिभाऊ गंगाराम, (तत्परतेने दाराशी जाऊन हाका मारीत—) गंगाराम... (आत डोकावत) ए गंग्याऽऽ, तिकडे स्वयंपाकघरात काय करतंयस? बाई घरात आल्या एवढं कळत नाही?

मुक्ताबाई (समोर पाहात, स्वतःशीच) घराला घरपण राहिलं नाही या. कुठं भोवऱ्यासारखं नुसतं फिरत फिरत राहायचं. (सहजगत्या कोचाच्या पाठीवरली धूळ बोटानं पुसून पाहात) शीऽऽ

(तेवढ्यात आतून गंगाराम, एक बारा–तेरा वर्षांचा घरगडी येतो. हरिभाऊ त्याला टप्पल लगावीत— )

हरिभाऊ बघतंयस कुठं... चालतंयस कुणीकडं! कोचावरची धूळ तश्शी? गाढवाच्या लेका, तुझा बाप—

मुक्ताबाई हांऽ हरिभाऊ! शिव्या नाही द्यायच्या. पोर अजून नवा आहे. हळूहळू रुळेल. गंगाराम, भाजी घेऊन एवढ्यात काकू परत येतील, तर त्यांना सांग, रात्रीसाठी फ्लॉवरची भाजी आणि कान्दे-टोमॅटोची कोशिंबीर करायची. वरच्या बरणीतून लोणचं काढून ठेवायचं. साहेब आणि राजीव परत येतील तेव्हा चहाबरोबर बिस्किटं ठेवायला विसरू नका म्हणावं.

झालंच तर नंदू आली की तिच्यासाठी दुभत्याच्या कपाटात शिरा ठेवलाय, म्हणाली तर तुपावर परतून द्यायला सांगायचं.

हरिभाऊ — त्रैलोवासारख्या नुसत्या माना डोलावू नको. लक्षात राहील का सगळं ? तुम्ही काळजी करू नका, बाई. माझ्या आहे सगळं ध्यानात. (गंगारामला) ही बॅग गाडीत नेऊन ठेव. ( गंगाराम बॅग घेऊन जातो. )

मुक्ताबाई — ( पायांत चपला सरकवीत, दारावरचा पडदा पाहात ) दारावरचे पडदे बदलायला हवेत एकदा. कधी वेळ मिळायचा देव जाणे. चला. ( जाता जाता ) डॉक्टर दुभाषी एवढ्यात आले तर त्यांना सांगा की — ( असे बोलत बाई आणि पाठोपाठ हरिभाऊ जातात. क्षणमात्र हॉल रिकामा. बाहेर मोटर गेल्याचा आवाज. पाठोपाठ "ममी...ममी... मॉम्स..." अशी नंदूने मारलेली जोरात हाक ऐकू येते. त्याच वेळी—"तुझी तरी कमालच आहे. गाडीच्या आवाजात तुझी हाक ऐकू जाणार आहे का ममीला ?" हे जयसिंहचे उद्गारही ऐकू येतात. क्षणभरातच सुनंदा, अठरा वर्षांची तरुण मुलगी अल्लडपणे दुडदुडत गात गात येते. वेष नुकताच कॉलेजमधून परतत असल्यासारखा. हातात पर्स आणि एक-दोन नोटबुक्स, पुस्तके. पुस्तक, नोटबुक्स आणि पर्स भिरकावत, एकदम काही आठवून— )

सुनंदा — अय्याऽऽ ! जया, तुला कॉलेजमधली एक गंमत सांगायची विसरलेच की. अरे आज आमच्या त्या जॉनी वॉकरच्या तासाला— ( थबकून, वळून पाहात ) जय...जयसिंह... इश्श हे रे काय ? ( परत माघारी बाहेर जात ) तू तर ग्रेटच आहेस.
( बाहेर जाऊन जयसिंहाच्या हाताला धरून त्याला ओढत आत आणीत) चोरासारखा बाहेर का म्हणून ?

जयसिंह — ( सोडवून घेत ) अग पण—

सुनंदा — आमच्या घरात वाघसिंह राहातात का राक्षस ?

जयसिंह — ( चाहूल घेत ) एक वेळ वाघ-सिंह आणि राक्षस पुरवले, पण तुझा तो दात ओठ खाणारा भाऊ राजीव... डोळे फाडफाडून बघणारी ममी, आणि मारक्या म्हशीसारखा शिंगं रोखणारा कब्जी कलूशा हरिभाऊ ( त्याच वेळी बाहेर हरिभाऊ ओरडतात "गंग्याऽऽ" तशी —) मेलो !

सुनंदा — काही मरत नाहीस. बैस इथं. मी कपडे बदलून येते तोवर—

जयसिंह — पण मी बाहेर फूटपाथवर उभा राहतो की !

सुनंदा — कशाला ? लाइन मारायला ? नथिंग डुइंग. बैस, बैस आधी. ( त्याला बळेबळे बसवते. तो अस्वस्थ होऊन चेहरा टाकतो तशी खुदकन हसत

नंदू म्हणते ) किती फनी दिसतोयस रे तू, जय !

जयसिंह (हातातल्या रॅकेटशी खेळत) दिसायचाच. तुला एकदा आमच्या ओल्डमॅनपुढं उभी करतो आणि बघतो तुझी मजा.

सुनंदा अरे जा जा ! कर नाही त्याला डर कसली ? माझं रेकॉर्ड स्वच्छ आहे. तुझ्यासारखी पानापानावर खाडाखोड नाही.

जयसिंह (उठून हात जोडत) मातोश्री, आता कृपा करा आणि वर जाऊन कपडे बदलून या. ( नंदू खळखळून हसू लागते तशी–) हसतेस काय ?

नंदू (हसत) एकदा आरशात जाऊन पाहा या— म्हणजे कळेल तुला तू किती—

जयसिंह (तिच्या तोंडावर हात ठेवीत) पुरे पुरे... मला ठाऊक आहे मी फनी दिसतो ते. आता अगोदर जाऊन कपडे बदलून ये. तुझी रॅकेट आण हो. आज मी तुझ्या रॅकेटनं खेळणार आहे.

नंदू (मागं सरत मिस्किलपणे) हां हां ऽ ऽ ते वरीक चालायचं नाही हं, महाराज. मला ठाऊक आहे माझ्या रॅकेटवर तुझा डोळा आहे. पण जमणार नाही. जीव मागितलास तरी देईन, पण रॅकेट–ऊं हूंः !

जयसिंह बरं बरं— मागायची वेळ येईल तेव्हा बघू या जीव देतेस की रॅकेट देतेस ते. आता आधी जाऽऽऽ ! मॅचला उशीर करायचा आहे का ?

सुनंदा काऽही उशीर होत नाही. तू आधी बैस पाहू. (त्याला खाली बसवू पाहात) तू असा नर्व्हस होणार असलास तर मात्र आजची फायनल नक्कीच हरणार.

जयसिंह अग पण—

सुनंदा आधी तुला एक गंमत सांगते ती ऐक. अरे आज कॉलेजमध्ये आमच्या जॉनी वॉकरच्या तासाला मज्जाच झाली.

जयसिंह जॉनी म्हणजे तो लुकडा भीम ?

सुनंदा तोच. क्लास कंट्रोल नाही म्हणून प्रिन्सिपॉलनी त्याला खूपच तापवला असला पाहिजे. वर्गात आला तोच तणतणत आणि फणफणत आला; आला तशी सगळ्या पोरांनी त्याला 'हुईऽऽ' करून उचलला. तशी तो काय म्हणाला आहे ठाऊक ? (नक्कल करीत) सायलेन्स...सायलेन्स... प्लीज सायलेन्स...! हिअर नॉइज, देअर नॉइज... एव्हरी व्हेअर नॉइजच नॉइज ! यू टू हंड्रेड, आय वन... कंट्रोल... कंट्रोल, अरे हाउ कंट्रोल ? (सुनंदा खदखदून हसते. जयसिंहदेखील खळखळून हसू लागतो. तेवढ्यात हरिभाऊ येतात. पाठोपाठ गंगाराम. जयसिंहाचे हसू विरघळते )

हरिभाऊ सुनंदाताई, दुभत्याच्या कपाटात शिरा ठेवलाय. म्हणाल तर तुपावर परतून देतो– म्हणजे द्यायला सांगतो. पण— ( जयसिंहाकडे मारक्या म्हशीसारखे पाहात ) मला वाटतं, शिरा तुमच्यापुरताच असावा.

सुनंदा मग तो तुम्हीच खा; पण आम्ही गेल्यावर. मी कपडे बदलून येते, तोवर तुम्ही जयशी बोला.

हरिभाऊ अहो पण—

सुनंदा मॅचला उशीर होईल, हरिभाऊ, जयशी बोला. (वर जाताजाता थबकून) जंगलीपणा करू नका. त्याला चियर अप करा. जय, मी आलेच रे. ( दुडदुडत वर जाते. जाताजाताही गात गात जाते. क्षणमात्र हरिभाऊ मारक्या म्हशीसारखे जयसिंहाकडे रोखून बघतात, तसा तोही मूळ स्वभावावर जात रगेलपणे ताठ्यात नजरेला नजर देऊन उभा राहतो. क्षणार्धातच— )

हरिभाऊ ( कुत्सितपणे ) बागाईतदार पाटलांचे तुम्ही चिरंजीव, नाही का ?

जयसिंह ( गुर्मीतच ) हो, मीच तो. जयसिंहराव.

हरिभाऊ जयसिंहराव काय ? परवा त्या कौसल्या कासेगावकरणीच्या तमाशात धुमाकूळ घालणारे तेऽ

जयसिंह ती थोरली पाती. - वडील बंधू,— संपतराव. का हो, तुम्ही त्या बारीत सोंगाड्याचं काम करीत होता वाटतं ?

हरिभाऊ तोंड आवरून बोला, मिस्टर. मी कम्पाउन्डर हरिभाऊ गायतोंडे.

जयसिंह असं, असं... तमाशातली इतकी बारकाईनं माहिती सांगायला लागलात म्हणून वाटलं... ( हसतो. )

हरिभाऊ का हो पाटीलबाबा, ऊस खाता की नाही ऊस ?

जयसिंह खातो की; गोड लागला तर मुळासकट खातो, नाहीतर गुरापुढं टाकतो.

हरिभाऊ आपली कीर्ती ओळखून आहोत. पण आमची नंदू फार सरळ आहे, निष्पाप आहे; अजून अल्लड आहे. कोल्ह्याचे दात कसे असतात ते ठाऊक नाही तिला अजून.

जयसिंह ( उपरोधानं ) असंऽ ?

हरिभाऊ तुम्ही खूप उसांना दात लावले असतील; पण नंदूला हात लावाल तर याद राखा. सरळ आडवा करून चरकात घालीन आणि चिपाड ओढून बैलांपुढं टाकीन.

जयसिंह ( हसत ) वा रे वा !

हरिभाऊ मी असा फाटक्या अंगाचा दिसतो एवढ्यावर जाऊ नका.

जयसिंह काय हो हरिभाऊ, आमच्या कारखान्यातल्या एका कामगाराला चुकीचं

इंजेक्शन दिल्याबद्दल तुम्हाला...

हरिभाऊ (गडबडून ओरडत) खोटं आहे... साफ खोटं आहे ते; ते आता सगळ संपलंय...मिटलंय...

जयसिंह (हसत, खोचून) हरिभाऊ, दुसऱ्याचे दात काढण्यापूर्वी स्वतःचे हात नीट पाहात चला.

हरिभाऊ (उसळून) तुम्हाला... तुम्हाला काय म्हणायचंय?

जयसिंह (रॅकेट उचलत हसून) टेक इट ईझी. इथली हवा फारच गरम झालीय. उकडायला लागलंय मला. नंदूला सांगा मी बाहेर फूटपाथवर थांबलोय म्हणून...

(जयसिंह जातो. गंगाराम काम करता करता खुदकन हसतो, तशी हरिभाऊ उसळतात आणि त्याचा कान पकडीत–)

हरिभाऊ खी खी खी करून हसतंयस काय? मघापासून बघतोय, झेंड्यासारखा फडका नुसता फडफडतोयस. जरा मानेवर खडा ठेवून पूस की...का–

(तेवढ्यात लगबगीने नंदू येते. गात, गात, अल्लडपणे दुडदुडत, हातातली रॅकेट फिरवीत, शुभ्र स्कर्ट–ब्लाऊज, पायांत टेनिस शूज. गंगाराम स्वतःला सोडवून घेत जोरजोराने एक खुर्ची पुसू लागतो.)

नंदू हूं, चल. (थबकून विस्मयाने पाहते.) हे काय? जय कुठाय?

हरिभाऊ बाहेर फूटपाथवर थांबतो म्हणाले.

नंदू इश्श–फूटपाथवर? का?

गंगाराम (मध्येच तोंड घालीत) इथली हवा फारच गरम झालीय... म्हणाले.

(हरिभाऊ गंगारामवर डोळे वटारतात तशी––)

नंदू त्याच्यावर कशाला डोळे वटारता उगीच, हरिभाऊ? तुम्हीच काही तरी आगाऊपणानं बोलला असाल जयला?

हरिभाऊ छे छे... मी कशाला...

नंदू (जाता जाता फणकाऱ्याने) काही सांगू नका. तुम्ही पक्के लुब्रे आहात लुब्रे. (पळत बाहेर जाते गंगाराम हसू दाबतो. तशी ––)

हरिभाऊ (रागाने वेडावीत) हास हास की! दात पाडून टाकीन. ते टीपॉय झटक अगोदर. लुब्रा लेकाचा.

(गंगाराम टीपॉय झटकतो. त्याला सूचना देत हरिभाऊ खिशातून तपकिरीची डबी काढून तपकीर ओढतात. थोड्याच वेळात राजीव येतो. सुटाबुटात. हातात प्राध्यापकाची पुस्तकांनी भरलेली बॅग. दारातून मागे वळून बाहेर पाहात येतो आणि–– )

राजीव इतक्यात नंदू गेली का? त्या उडाणटप्पूबरोबर?

हरिभाऊ हो ना. त्या जयसिंह पाटलाबरोबर. मॅचिस चालल्या आहेत त्यांच्या— म्हणे हो.

राजीव ( थबकतो. क्षणमात्र कपाळी नाराजीची आठी) हूंऽऽ ! ममी कुठं आहे ?

हरिभाऊ बाई व्हिजिटला गेल्या आहेत. साहेब कोर्टातून आले नाहीत. ( जाऊ लागत) निरोप सांगतो आपण आल्याचा, हेमाताईंना. या पाहा, आल्याच. ( जिन्यातून वर जाणारा राजीव पायरीवरच थबकतो. हेमा,— एक काळीसावळीच पण तरतरीत तरुणी लगबगीने येते. दवाखान्यात ती नर्स असावी हे वेषावरूनही लक्षात यावे. )

हेमा हरिभाऊ, तुमची तरी कमालच आहे. तुमच्या नावानं तिकडे पेशंट्स कधीचे ओरडायला लागलेत आणि तुम्ही—

हरिभाऊ निघालोऽऽ जातोऽऽ इथं नाही थांबत मी. ( जातात )

राजीव ( माघारी येत, अंगातला कोट काढीत— ) गंगाराम, ही बॅग माझ्या खोलीत टेबलावर ठेव आणि हा कोट हँगरला लाव.

( गंगाराम बॅग आणि कोट घेऊन जातो. राजीव एका आसनावर बसत गळ्यातला टाय सोडतो आणि पायांतले बूट, पायमोजे काढू लागतो. हेमा एका कोचाच्या मागे उभी राहून त्याला न्याहाळते. क्षणार्ध बोचक शांतता. ती असह्य होऊन— )

हेमा ( लाघवीपणाने ) आज बोलायचं नाही ?

राजीव (चिडखोरपणे बूट कोपऱ्यात भिरकावीत ) बोलण्यासारखं काही उरलंच नाही, हेमा.

हेमा ( व्याकुळून ) चिडू नकोस रे, राजू . .

राजीव चिडत नाही मी, हेमा. पण— ( थबकून ) मला या—या सगळ्यांत काहीही अर्थ उरला नाही असं वाटायला लागलंय. ( सिगरेट काढून पेटवतो. )

हेमा ( कळवळून ) असं रे का म्हणतोस ?

( राजीव उत्तर देत नाही. झुरके घेत धुराची वलये सोडीत राहतो तशी— ) फॅनीला पुन्हा भेटून आलास ?

राजीव ( झुरका घेऊन धूर सोडीत ) हूं.

हेमा स्वीडनला ती परत केव्हा जायचं म्हणतेय ?

राजीव पुढल्या आठवड्यात.

हेमा कायमची ?

राजीव हूं.

हेमा आणि तरीही ती तुला घटस्फोट द्यायला तयार नाही ?

राजीव नाही. माझ्यासाठी ती तिकडे वाट पाहात बसणार आहे.

हेमा तिचं नक्की म्हणणं तरी काय आहे?

राजीव तिला हा देश आवडत नाही. माझी माणसंही आवडत नाहीत.

हेमा तू तरी आवडतो आहेस का तिला?

राजीव आता तो प्रश्नच उरला नाही. सगळ्या आवडीनिवडीची पाऽर राख-रांगोळी झालीय. तिलाही ते कबूल आहे.

हेमा (क्षणभर वाट पाहून) मग?

राजीव मिळवता नवरा म्हणून मी तिला हवा आहे. युरोपमध्ये मला खूप पैसे मिळवता येतील आणि तिची चंगळ चालेल असा तिचा सरळ साधा हिशेब आहे.

हेमा शीऽऽ!

राजीव शीऽ काय? सगळ्याच बायका तुझ्यासारख्या वेड्या नसतात.

हेमा (क्षणमात्र न्याहाळत, पाणावत) कसल्या चक्रव्यूहात फसलास रे राजू, तू?

राजीव (चिडून उठत, सिगरेट पायाखाली चुरगळीत) म्हणूनच सांगतो, माझा नाद तू सोडून दे. तू तुझ्या मार्गानं जा.

हेमा (डबडबलेल्या डोळ्यांनी) असलं बोलणं तुझं तुलाच शोभतं. मला माझा असा दुसरा मार्ग काही उरलाय का रे?

राजीव (उसळून) तर मग लग्नाशिवाय बायको म्हणून माझ्याजवळ राहायची तयारी आहे तुझी?

हेमा तुला ते चालणार असेल तर तेही दिव्य—

राजीव नॉन्सेन्स. बोलायला हे सारं सोपं आहे हेमा, पण पूर्वीसारखा मी स्वप्नाळू राहिलो नाही आता. लोक शेण घालतील आपल्या तोंडात.

हेमा आजही कोणी पुष्पवृष्टी करीत नाही आपल्यावर.

राजीव (आवेगाने) तुला कसं कळत नाही, हेमा?— कॉलेजमध्ये मी प्रोफेसर म्हणून नोकरी करतोय. असला जगावेगळा संसार थाटल्यावर कॉलेजचे चालक एक दिवस तरी मला नोकरीवर ठेवतील? कॉलेजच्या चालकांचं सोड, खुद्द ममीदेखील—

(थबकतो. कारण बाहेर बॅरिस्टर देवदत्त कोणा पक्षकाराशी बोलताना ऐकू येते. पक्षकार म्हणत असतो— "...बॅरिस्टरसाहेब, आमचा पॉइंट असा आहे की—"

त्यावर देवदत्त म्हणतात— "माफ करा— तुमचे सगळे पॉइंट्स मी उद्या ऐकेन. सकाळपासून दोन पायांवर सारखा उभा आहे मी. माझे

डॉक्टर शिव्या घालतील मला मी इतकं काम करतोय हे त्यांनी पाहिलं तर. तुमचे कागदपत्र माझ्या कारकुनाच्या स्वाधीन करा आणि—” त्यावर पक्षकार अजीजीने— “फार नाही बॅरिस्टरसाहेब, फक्त एक मिनिट. म्हणजे फिर्यादीचा दावा असा आहे की...” आणि हे बोलणे बाहेर चालू असतानाच आतमध्ये— )

राजीव पप्पा आलेले दिसतात. त्यांच्यासमोर मला देखावा नकोय, हेमा.

हेमा ( लगबगीने डोळे पुसत ) ठीक आहे. तुला योग्य वाटेल त्या मार्गानं जायला तू मोकळा आहेस. मी काही तुझ्या गळ्यात पडणार नाही. फॅनीलाच वाट पाहत येते असं नाही. मीदेखील वाट पाहीन;— जन्मभर ! ( ताडताड निघून जाते. )

राजीव ( मागोमाग दारापर्यंत जात ) हेमा... हेम... मी सांगतो ते ऐक. ( हताशपणे माघारी वळतो. विचारमग्न स्थितीत आसनावर बसतो. मग पायाखाली चुरगाळलेले थोटूक उचलून पाहात रक्षापात्रात टाकतो. तेवढ्यात बाहेर देवदत्त— “ठीक ठीक... देशपांडे, यांचे सगळे पेपर्स फाईलला लावून ठेवा आणि त्यांना उद्या सकाळची अपॉइंटमेंट द्या. नमस्ते !” असे बोलल्याचे ऐकू येते. क्षणार्धातच बॅरिस्टर देवदत्त आत येतात. बॅ. देवदत्त पन्नाशीचे रुबाबदार गृहस्थ. हसतमुख, कुशाग्र बुद्धीचे आणि हृदयविकाराचा झटका येऊन गेल्यापासून सतत मृत्यूच्या खांद्यावर हात ठेवून उभे असल्यासारखे वागणारे.

आत येतायेताच देवदत्त दाराशी थबकतात. पुन्हा माघारी वळत दारातूनच बाहेर पाहून हाकारतात— “अग बेटीऽऽ, हेमाऽऽ” नि आत वळून राजीवला विचारतात— “इतक्यात हेमाच गेली ना रे राजू, इथून ?” राजू पुढे होऊन “होय, पप्पा—” असे म्हणत त्यांच्या हातातली बॅग आणि त्यांनी अंगातला काढलेला कोट घेतो तेवढ्यात लगबगीने गंगाराम येतो. त्याच्या हाती कोट आणि बॅग देत आत नेऊन ठेवायला सांगतो. दरम्यान हेमा दाराशी येते तशी — )

देवदत्त डॉक्टर दुभाषींची गाडी पाहिली मी. दवाखान्यात डॉक्टर आलेत ना ?

हेमा होय, पपा.

देवदत्त त्यांना सांग, तुमचं आटोपल्यावर इकडे येऊन जा. प्रकृती बघायला नव्हे हो. अगदी सहजच या म्हणावं.

हेमा होय, सांगते, ( जाऊ लागते, तशी— )

देवदत्त ( तिला न्याहाळत ) काय ग पोरी, सुखासुखी अशी खारकेसारखी सुकत कशानं ग तू चाललीस ? चांगलं भरपूर खावं, प्यावं, मजा करावी

— ऊं ? दिवसेंदिवस बघतोय, तू आपलीऽऽ,– हा हृदयविकाराचा तर परिणाम नाही ?

हेमा (लाजून मुरका मारीत) इश्शऽ काही तरीच काय ?

(असे उद्‌गारत पळून जाते. देवदत्त हसत आत येतात आणि थकल्यासारखे आसनावर बैठक मारीत—"हुश्य ! सुटलोऽऽ" असा निःश्वास टाकीत पायांतले बूट, पायमोजे काढू लागतात. गंगाराम त्यांना मदत करतो.)

राजीव पपा, तुम्ही पुन्हा जिवापाड कष्ट करायला लागलात.

देवदत्त हळू– हळू बोल.

राजीव आमचं कोणाचं तर तुम्ही ऐकत नाहीच, पण डॉक्टर दुभाषींनी—

देवदत्त शूऽऽक ! केवळ्यांदा ? तो खवीस आलाय तिकडे. तुझा एक शब्द त्याच्या कानी पडला, तर उद्यापासून माझी कोर्टाला सुटी करून टाकील.

राजीव पण, पपा—

देवदत्त (दबक्या स्वरात) आधी सांग– तुझी ममी कुठाय ?

राजीव ममी व्हिजिटला गेलीय.

देवदत्त आणि आमची ठकूताई ?

राजीव (नाराजीनं) नंदू ? ती मॅचला गेलीय.

देवदत्त (मोठ्याने) तरीच... (पाहात) अरे चोराऽ, म्हणून तू हेमाशी गुळूगुळू गोष्टी करीत बसला होतास होय ?

राजीव काहीतरीच काय, पपा ? आता इतक्यात मी कॉलेजमधून परत आलो. तिच्याशी मी पाच मिनिटंदेखील बोललो असेन नसेन—

देवदत्त एवढ्यात मी येऊन टपकलो. व्हेरी सॉरी माय बॉय, व्हेरी सॉरी...

राजीव (रूक्षपणाने) तसला रोमान्स करण्याचे माझे दिवस राहिले नाहीत, पपा.

देवदत्त (मिस्किलपणे) ऊं ऊं ऊंऽ ? एवढ्यात वय झालं तुझं ? मग केसांना पांढरा कलप तरी आणून फास एकदा,— म्हणजेऽ— बाकी तीदेखील एक फॅशनच गणली जात असेल या नया जमान्यात ?

राजीव (चिडखोरपणे) कलप लावायची काही गरज नाही. असेच भोग भोगत राहिलो तर वर्षभरातच सगळे केस पिकतील माझे.

देवदत्त (गलबलून) राजू... राजू... अरे काय हे ? (उठून त्याचे खांदे धरीत) इतका चिडलास ? माझ्यावर ?

राजीव तर काय ? तुम्हाला सगळं माहीत आहे, तरीदेखील–

देवदत्त मी तुझी थट्टा-मस्करी करतो, हेच ना ? पोरा, त्यातला अर्थ तुझ्यासारख्या प्राध्यापकाला तरी कळायला हवा. अरे राजू, जे दुःखभोग भोगूनच

संपवावे लागतात, त्यावर थट्टा-मस्करी करून हसण्यासारखी दुसरी रामबाण गोळी नाही.

( तेवढ्यात बाहेरून हरिभाऊ एका हातात पाण्याचा ग्लास आणि दुसऱ्या हातात औषधाची गोळी घेऊन लगबगीने येतात, आणि– )

हरिभाऊ ( गोळी पुढे करीत ) साहेब, ही गोळी.

देवदत्त ऊं ? ही होय ? असू दे... असू दे.

हरिभाऊ 'असू दे' नाही; घ्या तावडतोब, माझ्यासमोर घ्या.

देवदत्त डॉक्टरसाहेबांनी हुकूम फर्मावलाय वाटतं ?

हरिभाऊ नाही. बाईसाहेबांनी मला ताकीद दिली आहे.

देवदत्त मग काय, घ्यायलाच हवी. ( गोळी तोंडात टाकून पाणी पितात. )

हरिभाऊ ( गंगारामला ) बघतंयस काय ? साहेबलोक घरात आले तर स्वयंपाकघरातून चहा आणायचा नाही ? ( गंगाराम पळत जातो, तशी दारापर्यंत जाऊन ) बिस्किटं ठेवायला विसरू नकोस. ( बाहेरून– बहुधा दवाखान्यातून 'हरिभाऊऽ' अशी हाक ऐकू येते. तशी 'आलोऽऽ' अशी ओ देत, हरिभाऊ चरफडत "हे डॉक्टर दुभाषी म्हणजे असे आहेत..." इत्यादी पुटपुटत जातात.)

देवदत्त बोला प्रोफेसरसाहेब, फॅनीला भेटून आलात ?

राजीव ( निःश्वास टाकीत ) हूंऽऽ

देवदत्त 'काय झालं' म्हणून विचारण्यात काही अर्थच दिसत नाही. माझा कयास खरा ठरला; होय ना ?

( देवदत्त राजीवकडे रोखून पाहू लागतात. तो हळूच मान वर करून दृष्टीला दृष्टी भिडवतो, तशी देवदत्तांना हसू लोटते. तेवढ्याने दुखावून)

राजीव हसताय काय, पपा ? ही काय हसण्याची गोष्ट आहे ?

देवदत्त ( हसू आवरीत) नाही रे, राजू. मला दोन वर्षांपूर्वीच्या घटनांची आठवण झाली आणि क्षणभर मौज वाटली. फॅनीशी लग्न ठरवल्याची तू स्वीडनहून केबल केलीस आणि आम्ही दोघं वेड्यासारखी विमानानं तुझ्याकडे धावलो,– या अविचारापासून तुला वाचवण्यासाठी. त्या वेळी तू खुषीत होतास; मस्तीत हसत होतास; तुझी ममी रडरड रडत होती; आणि मी ? लांबलचक चेहरा करून मोठे सुस्कारे सोडीत होतो. ( मिस्किलपणे ) आत्ता तू जसे सुस्कारे टाकतो आहेस ना— तसेच. फक्त—

राजीव ( चिडून ) पप्पा, तुम्हाला हृदय आहे का हो ?

देवदत्त ( मिस्किलपणे ) हृदय ? ( चाचपून पाहात ) असावं असं वाटतं.

असलंच पाहिजे की! — एरवी त्या वेळी मला हृदयविकाराचा झटका कसा आला असता?

राजीव (दुखावून) पपा—

देवदत्त (हसत हसत) तू फॅनीला हृदयार्पण केलंस त्या वेळी मला पहिला झटका आला. आता दुसरा बहुधा आमच्या ठकूताईंच्या हृदयदानाबरोबर येणार, असा—

राजीव (व्याकुळतेने) पपा, काय हे?

देवदत्त (हसत हसत) मिळून काय— तुम्हा पोरांच्या हृदयाच्या देवाणघेवाणीत, माझ्या हृदयाची काही धडगत दिसत नाही मला.

राजीव (आवेगाने) पपा, मी काय केलं म्हणजे त्या वेळच्या माझ्या चुकीसाठी तुम्ही मला क्षमा कराल?

(त्याच वेळी गंगाराम ट्रेमधून चहाचे कप घेऊन येतो.)

देवदत्त सांगू? हे सुस्कारे टाकणं थांबवून माझ्या संगतीत जरा मजेत चहा घेतलास तर तुला पूर्वीचे सगळे गुन्हे माफ. (चहाचा कप हाती देत) घे. (राजीव चहाचा कप घेतो. देवदत्त एक बिस्किट त्याच्या हाती देऊ पाहतात. तशी तो मानेने नको म्हणतो; तशी — ) अरे घेऽऽ! तुझ्या आईची माया चिकटलीय या बिस्किटाला. (स्वतः खात) व्वा! फर्मास! (राजीव नकळत बिस्किट उचलतो. क्षणमात्र दोघेही स्तब्धतेत चहापान करतात. मग— ) राजू, तुम्हा लोकांना फार आश्चर्य वाटत असेल, नाही?

राजीव कशाबद्दल?

देवदत्त (चहाचा घोट घेत) नाही, गेल्या दीड–दोन वर्षांत मी पाऽर बदलून गेलोय म्हणून? पूर्वीचा माझा रागीटपणा, खंबीरपणा, कडवी शिस्त वगैरे सगळं सगळं वितळून विरघळून मी कसा मऊ, मऊ लिबलिबीत झालोय, नाही? सारखा हसत असतो, खिदळत असतो, येता-जाता कोणाचीही थट्टामस्करी करीत असतो—

राजीव आम्हा सर्वांच्याच लक्षात आलंय ते पपा, पण मला वाटतं, वाढत्या वयाबरोबर—

देवदत्त ए बुद्दू. वाढत्या वयाचा या परिवर्तनाशी काही संबंध नाही. उलट म्हातारपण यायला लागलं की माणसं तऱ्हेवाइकच होतात,– आंबट, तुरट, तिरसट होतात. माझ्यात ही किमया घडलीय ती आमच्या भाड्याला तडा गेल्यापासून. तुला सांगतो राजू हार्ट अटॅक ही माणसाला जाग आणणारी, प्रत्येक क्षणाचं मोल पटवणारी विलक्षण रोमांचकारी

घटना आहे. अरे, रोज रात्री झोपताना मी या सुंदर जगाचा निरोप घेतो, आणि सकाळी जागा झाल्याबरोबर 'आणखी एक दिवस तर पदरात पडलाऽऽ' या खुषीत चिमुकल्या हृदयाचे आभार मानतो. त्यामुळंच स्थानी-अस्थानी थट्टामस्करी करून दुःखाला दूर पिटाळून लावणं मला भागच पडतं. तू पाहिलं आहेस तसं जिवाला मी अलीकडे काहीही लावून घेत नाही, की कशासाठीही खेद वा खंत करीत नाही. ध्यास एकच धरला आहे,– मला आवडणारी सगळी माणसं सुखातच असली पाहिजेत. गाढ सुखात...तुडुंब मजेत...तृप्त मस्तीत. ॲट एनी कॉस्ट! अरे, सुखाला दुसरा पर्याय नाही, हे भांड्याला तडा गेला म्हणजेच कळतं. ( थबकून चहा संपवून सिगरेट काढीत ) तू मनात विचार करीत असशील की पपांनी आजच आल्या आल्या हे कसलं पुराण सुरू केलंय, होय ना?

राजीव तसं नाही, पण—

देवदत्त हे पुराण नाही, ही प्रस्तावना आहे. आज मी सॉलिसिटर मोटवानींच्याकडे गेलो होतो,– तुझ्या बाबतीत सल्ला घ्यायला. तुला ठाऊक आहे, घटस्फोटाच्या केसिस मी घेत नाही, त्यामुळं—

राजीव ( अधीरतेने ) काय म्हणाले मोटवानी?

देवदत्त नाही, घटस्फोट तुला केव्हा तरी मिळेलच. फॅनीला शहाणपणा सुचला तर हा प्रश्न तावडतोब सुटू शकेल. पण तिनं अडवायचं ठरवलं तर–

राजीव तिनं ठरवलंच आहे अडवायचं.

देवदत्त राजू, कायद्याचा न्याय नुसता आंधळा नाही, त्याचे पायदेखील कासवाचे आहेत. घटस्फोट मिळाल्यावरच हेमाशी लग्न करून संसार थाटण्याचा तुझा विचार असेल तर—( थबकतात. )

राजीव मला माझ्या म्हातारपणापर्यंतदेखील वाट पाहावी लागेल. हेच ना?

देवदत्त तुला चालणार आहे ते? तेवढा धीर आहे तुला?

राजीव नाही तर दुसरा काय मार्ग आहे, पपा?

देवदत्त कदाचित तुला तेवढा धीर असेलही. पण मला तेवढी सवड नाही, राजू. कोणत्याही परिस्थितीत माझ्या डोळ्यांसमोर तुझा सुखी संसार उभारलाच पाहिजे. कायदा गाढव असेल, पण माणसाला बुद्धी आहे, तारतम्य आहे, आणिक—

राजीव ( विस्मयानं ) पपा, तुम्हाला काय सुचवायचं आहे?

देवदत्त घटस्फोट मिळेल तेव्हा लग्न करता येईल. पण तोपर्यंत हेमाबरोबर नवरा-बायकोसारखा संसार करायला तुला काही हरकत नाही.

राजीव (थक्क होत) पपा–पपा हे तुम्ही...

देवदत्त (स्मित करीत) भांड्याला तडा गेला की शहाणपणाचेदेखील सगळे हिशेबच बदलतात, राजू.

राजीव पण पपा—

देवदत्त मला माहीत आहे राजू, हा मार्गदेखील सरळ नाही की सोपा नाही. इथंही सुखाची भरपूर किंमत तुम्हा दोघांना द्यावी लागणार आहे. पण ती द्यावी असं मला वाटतं. मी तुला फक्त माझ्या बाजूनं हिरवा कंदील दाखवतोय. अखेर हे निर्णय ज्यांचे त्यांनीच-—

(तेवढ्यात बाहेर गडबड ऐकू येते. म्हणून देवदत्त आणि राजीव दोघेही दारापाशी जातात. मुक्ताबाईंचा आवाज– "तरी मी तिला म्हणत होते की या वेळी मॅचमध्ये भाग घेऊ नको. पण ऐकायचं नाव नाही." देवदत्त आणि राजीव "काय झालं? काय झालं?" असे विचारीत पुढे होतात. नंदू म्हणते– "अग पण ममी, मी जायच्यापूर्वी खरोखरीच चांगली होते. अगाई गऽऽ" डॉ. दुभाषी म्हणतात– "दॅट्स ऑल राइट. ती चर्चा आता नकोय, नंदू, तुला चालताना त्रास होत असेल तर—"

नंदू म्हणते— "नको नको...मी चालतच जाते..."

नंदूला आधार देत मुक्ताबाई आणि राजीव आत येतात. पाठोपाठ देवदत्त, डॉ. दुभाषी आणि सगळ्यांत शेवटी जयसिंह येतो. डॉ. दुभाषी देवदत्तांच्याच वयाचे. पण उग्र मुद्रेचे, परखड बोलणारे. आत येता येता मुक्ताबाई त्रासिकपणे म्हणतात– "या मुलांचा खेळ म्हणजे वडील माणसांचा छळ आहे! त्यावर"–)

देवदत्त हो हो– पण झालं काय?

डॉ. दुभाषी काही विशेष झालं नाही, बॅरिस्टर साहेब, शी इज ऑल राइट. अरे खेळ म्हटला की असं चालायचंच. कुठं तरी वाकडी उडी पडली असेल म्हणून कळ आली.

मुक्ताबाई परवापासून तीन वेळा झालं असं, डॉक्टर.

डॉ. दुभाषी ठीक आहे. झालं तर होऊ द्या. आता मी जबाबदारी घेतलीय ना तिची? नंदू, बाळ, आत जाऊन स्वस्थ पडून राहा हो. उद्या सकाळपर्यंत टुणटुणीत होशील.

नंदू (आत जाता जाता थांबून) पपा, माझी मॅच गेली. (डोळे भरून येतात; तशी देवदत्त तिला जवळ घेत कुरवाळीत–)

देवदत्त अहा रे वेडाबाई! गेली तर गेली. ठकूताई, अग शिर सलामत तो

मॅचिस पन्नास...

राजीव (नंदूला हात देत) तुझ्या मॅचेस बंदच करून टाकल्या पाहिजेत.

नंदू वारे वा! का म्हणून? तुझे पत्ते नि बुद्धिबळं बंद करशील का? निवड झाली तर डिसेंबरमध्ये मी मॅच खेळायला दिल्लीला जाणार आहे हं ममी...अग आई ग...

मुक्ताबाई डिसेंबरचं डिसेंबरमध्ये...आत्ता आधी आत तर चल. (देवदत्तांना) तुम्ही तिला सोडा आणि स्वस्थ बसा. उगीच स्वतःचा प्रक्षोभ वाढवून घेऊ नका.

देवदत्त (निग्रहाने दूर होत) सावकाश...राजू, तिला—

राजीव तुला उचलून आत नेऊ का? बघ तर खरी कशी फुलासारखी अल्लाद उचलून नेतो ते.

नंदू (वेदना होत असताही मिस्किलपणे) नको. तो प्रयोग राखून ठेव. मला नुसता हात दे. (राखून ठेव म्हणताना फक्त राजीवलाच कळेल अशी डोळ्यांनी खूण करते. राजीव डोळे वटारतो. आत जाता जाता वळून नंदू जयसिंहाला म्हणते—) जय... सॉरी हं.. तुझा फार विरस केला मी.

जयसिंह काही वाईट वाटून घेऊ नकोस, नंदू. तू आधी बरी हो.
(मुक्ताबाई आणि राजीव यांचा आधार घेत नंदू आत जाते.)

देवदत्त (जयसिंहला) मॅचमध्ये खेळताना ती पडली का?

जयसिंह पहिली गेम चांगली खेळली. दुसऱ्या गेममध्ये एक बॅकहॅंडचा शॉट मारता मारता पोटात कळ आली म्हणून ती खाली कोसळली. कितीतरी वेळ तिला उठताच येईना, म्हणून तिला गाडीत घालून मी इथं आलो. तर दाराशीच नंदूच्या आई भेटल्या. काही विशेष सीरियस नाही ना, डॉक्टर?

डॉ. दुभाषी (इतका वेळ पाइप पेटवीत विचारमग्न—दचकून भानावर येत) ओ नो. नॉट इन द लीस्ट. तू गेलास तरी चालेल, जयसिंह, तुझी सिंगल्सची मॅच व्हायची आहे ना अजून?

जयसिंह ती काय महत्त्वाची नाही एवढी. पण नंदू—

डॉ दुभाषी तिची काळजी तुला रे कशाला? तिची माणसं आहेत की सगळी शाबूत!

जयसिंह (शरमून) तसं नाही, पण—

डॉ. दुभाषी पण बिण काही नाही. जरा खेळातलं लक्ष कमी कर आणि वडिलांना धंद्यात मदत कर. तुझा बाप मरेमरेतोवर राबतोय साखरकारखान्यासाठी.

(देवदत्तांना) याला ओळखता ना तुम्ही?

देवदत्त — नंदूबरोबर पाहिलंय मी त्यांना.

डॉ. दुभाषी — अहो आपल्या बागाईतदार बाबूराव पाटलांचा हा मुलगा. (जयसिंह नमस्कार करतो. देवदत्त तो घेतात.) जा, पळ,...नंदू ठीक आहे. उद्या सकाळपर्यंत ती खडखडीत बरी होईल. (जयसिंह जातो.) देवदत्त, तुमचं कसं काय?

देवदत्त — माझं? उत्तम! मला काय धाड भरलीय? बसा, बसा तर खरे.

डॉ. दुभाषी — छे, छे. बसतोय कसचा? अजून गावदेवीच्या कन्सल्टिंग रूमवर जायचंय. या पोरीनं वेळ खाल्ला माझा.

देवदत्त — (मिस्किलपणे) किरकोळ गोष्ट आहे.

डॉ. दुभाषी — किरकोळ? फी चार्ज करीत नाही म्हणून म्हणता होय?

देवदत्त — हात्तिच्या! करा की! तुम्ही चार्ज करणार, तिची आई देणार...

डॉ. दुभाषी — ते आमचं आम्ही बघून घेऊ. पण देवदत्त, यू आर अ बॅड पेशंट. तुम्हाला डायबिटीस आहे. तुम्ही हार्टचे पेशंट आहात. तरीदेखील मी सांगितल्याप्रमाणं तुम्ही पथ्यपाणी करीत नाही अशी तक्रार आहे तुमच्याबद्दल मुक्ताबाईंची.

देवदत्त — मुक्ताचीच ना? जाऊ द्या हो, डॉक्टर! नवऱ्याविरुद्ध तक्रार करायची बायका संधीच शोधीत असतात.

डॉ. दुभाषी — छे छे, ते खरं नाही. मला ते मान्य नाही. चालणार नाही...

देवदत्त — डॉक्टर, वहिनींच्या तुमच्याबद्दल काय कमी तक्रारी आहेत?

डॉ. दुभाषी — त्याची शहानिशा माझे डॉक्टर करतील. मी तुमचा डॉक्टर आहे. तुमच्या बाबतीत मी सांगतो तसंच झालं पाहिजे.

देवदत्त — अहो पण—

डॉ. दुभाषी — पण बिण काही नाही. रोज सकाळी चार मैल फिरायला जायचं. सहाच्या टोल्याला मी इथं येऊन तुम्हाला अंथरुणातून हुसकून काढणार आहे. साखर, भात, बटाटा बंद. सकाळी उकडलेल्या भाज्या आणि रात्री चिकन सूप. मीठ घालायचं नाही. झोपण्यापूर्वी पेलाभर कारल्याचा रस.

देवदत्त — (कपाळावर हात मारीत) मेलोऽऽ

डॉ. दुभाषी — अरे वा रेऽऽ असे बरे मराल? हा डॉ. दुभाषी जिवंत उभा आहे तोवर कसे मरताय, बघतोच मी! मेलोऽ म्हणे.

(तवढ्यात मुक्ताबाई बाहेर येतात आणि–)

मुक्ताबाई — डॉक्टर, तुम्ही नंदूला तपासलंत?

डॉ. दुभाषी हो.

मुक्ताबाई रिनल कॉलिकचा ॲटॅक असावा असं वाटतंय मला.

डॉ. दुभाषी तुम्ही तपासलंत वाटतं ?

मुक्ताबाई नुसतं वरवर पाहिलं.

डॉ. दुभाषी ( उसळून ) ही नसती उठाठेव करायला तुम्हाला कोणी सांगितलं ? तुम्ही डॉक्टर असलात तर त्या तिकडे दवाखान्यात. या घरात फक्त बाईमाणूस आहात.

मुक्ताबाई अहो पण—

डॉ. दुभाषी पण बिण काही नाही. माझ्या पेशंटच्या केसमध्ये लुंग्यासुंग्यांनी लुडबूड केलेली मला खपायची नाही. मी सांगेन तेवढं ऐकून घ्यायचं आणि ततोतंत पाळायचं. प्रश्न विचारायचे नाहीत.

मुक्ताबाई बरं बाई, चुकलं माझं. पुन्हा नाही विचारणार.

डॉ. दुभाषी ( जायला निघत ) उद्या सकाळी उजाडताना नंदूला माझ्या क्लिनिकमध्ये पाठवून द्या. चहापाणी काही नाही. पाठवून द्या म्हणतोय,— तुम्ही घेऊन येऊ नका.

देवदत्त त्यात काय, मी तिला घेऊन येईन.

डॉ. दुभाषी नाही; तुम्ही फिरायला जाणार आहात. चार मैल. आणि हो— ( मुक्ताबाईंना ) रात्री झोपण्यापूर्वी देवदत्तांना पेलाभर काल्याचा रस देता की नाही, मुक्ताबाई ?

मुक्ताबाई विचारा त्यांनाच. देण्याचं काम माझं; पण घेताना एवढा दंगा करतात लहान मुलासारखा—

डॉ. दुभाषी असं ? आडवे पाडून, नाक दाबून घ्यायला लावा. राजीवची मदत घ्या. हरिभाऊंना बोलवा. तितक्यांना नाही आवरले तर मला फोन करून बोलवा. मी बघून घेईन. मलाही तरुणपणी तांबडी माती लागलीय अंगाला.

देवदत्त नको, नको. आता घेईन.

डॉ. दुभाषी ( दमदाटीने ) आय होप सो. ( जाऊ लागतात. दारापर्यंत ते पोचले असतील नसतील तेवढ्यात– )

मुक्ताबाई ( न राहवून ) डॉक्टर... ( अडखळत ) नंदूचा एक्स-रे काढणार आहात ?

डॉ. दुभाषी ( उसळून ) पुन्हा प्रश्न ? ( रोखून पाहात ) हो.

( आणि पाठ वळवून तरातरा जातात. मुक्ताबाई व्याकुळचित्त विचारमग्न उभ्या राहतात. )

देवदत्त (दारापर्यंत जाऊन माघारी फिरत) छा! काय माणूस आहे ग हा? (तेवढ्यात आतून नंदू 'पपा' अशी हाक मारते. "आलो ग, ठकूताई" असे म्हणत देवदत्त आत जाऊ लागतात. दाराशी थबकून वळून पाहात) का ग? विचारातशी पडलीस?

मुक्ताबाई (स्मित करीत) काही नाही. सहजच.

(देवदत्त आत जातात. मुक्ताबाई तशाच उभ्या आहेत. विचारमग्न. प्रकाशझोत त्यांच्या मुद्रेवर आणि मग अंधार—

(प्रवेश पहिला संपला.)

म. ग्रं. स. ग्रा. ग्रन्थालय शाखा.
दा. क्र. २३४५६ नों दि. २५/१९९/
वि. ... नाटक क्र. ..

अंक पहिला

प्रवेश दुसरा

(सुमारे तीन महिन्यांनंतरच्या एका रविवारची सकाळ. तोच हॉल. सुटीचा दिवस असल्याने साफसफाई चालली आहे. केवळ नंदूने मनावर घेतलेय म्हणून आणि खास तिच्या देखरेखीखाली. बाहेरच्या दारावरचा पडदा काढून टाकला आहे. एका स्टुलावर उभे राहून हरिभाऊ पडद्याच्या पेल्मेटचा खिळा हातोडीने ठोकताहेत. गंगाराम जवळच नुसता पाहात उभा आहे. कोचापाशी नंदू एक नवा सुंदर पडदा घेऊन उभी आहे. पितळी दांडीच्या रिंग्जमध्ये पडद्याचे हुक्स अडकवण्यात ती मग्न आहे. मध्येच गंगारामकडे पाहून—)

**नंदू** हूंऽऽ, नुसता बघत उभा राहू नकोस, गंगाराम. ती सगळी जुनी वर्तमानपत्रं आणि मासिकं गोळा करून आत नेऊन ठेव.

**हरिभाऊ** (खिळा ठोकता ठोकता) कपाटात बरं का. इकडं-तिकडं टाकलीस तर सूर्याची पिल्लं दाखवीन.

**नंदू** आणि ममीला सांग—(ओरडून हाक मारीत) मम्मीऽऽ ए मॉम्स... (आतून मुक्ताबाई—"आलेऽऽ ओरडू नकोस. उशांचे अभ्रेच घेऊन येत्येय मी." गंगाराम रद्दी गोळा करून घेऊन जातो. खिळा ठोकून मग पाहात, "यंव! अगदी जाम झालं काम!" असे उद्गारत हरिभाऊ खाली उतरतात. नंदू पडदा घेऊन पुढे होते. हरिभाऊ पुढे होत—"द्या इकडे" म्हणतात. तशी नंदू "नको मीच लावते." असे म्हणत स्टुलावर चढते. हरिभाऊ तिला मदत करतात. दारावर पडदा लागतो, तो पाहात नंदू विचारते—) कसा दिसतो, हरिभाऊ?

**हरिभाऊ** टॉप!

**नंदू** (विस्मयाने वळून) ऊंऽ

**हरिभाऊ** तुमच्या शब्दात सांगितलं. खरं म्हणजे अगदी सिनेमातल्यासारखा सजलाय आपला हॉल.

**नंदू** तसा टिकून राहायला हवा. आता ती फीत आणि फुलांची बॅजेस द्या इकडे.

**हरिभाऊ** (काचेवरची फीत आणि बॅजेस उचलून पाहात तिच्या हाती देत—) यांचं काय करणार?

नंदू पाहा तर खरं...( पडद्याच्या दोन्ही पदरांना चुण्या करून फीत मधो-मध बांधते आणि त्यावर ती बॅजेस लावते. मग कमरेवर हात ठेवून पाहात ठसक्यात विचारते–) काय ?

हरिभाऊ ( पाहात, मान डोलावीत ) आहे...डोकं आहे.

नंदू ( तेवढ्यात कॅलेंडरवर नजर जाऊन ) अय्या ? हे हो काऽय, हरिभाऊ ?

हरिभाऊ क... काय झालं ?

नंदू ( हात लांबवून कॅलेंडरवरची दोन पाने फाडत ) मी हॉस्पिटलमध्ये होते त्या काळात कॅलेंडरवरची पानं फाडायचीदेखील कोणाला आठवण राहिली नाही ? ग्रेटच आहेत सगळे.

हरिभाऊ आम्ही सगळे तुमच्या काळजीत. पण– गंग्याऽऽ (गंगाराम येतो तशी ) बघतोयस काय ? ही पानं कोणी फाडायची ? उचल, उचल ती आधी. ( गंगाराम खाली टाकलेली पाने उचलून घेऊन जातो. तेवढ्यात आतून मुक्ताबाई कोचावरल्या उशांचे नवे अभ्रे घेऊन येतात. नेमक्या त्याच वेळी नंदू अल्लडपणे टुणकन् स्टुलावरून खाली उडी मारते. तशी मुक्ताबाई घाबरून किंचाळत " कारटे ! मेले मी ! " म्हणत तिच्याजवळ धावतात. आणि–)

मुक्ताबाई ( तिला धरून रागाने हात उगारीत ) ऑपरेशनला पुरते दोन महिने देखील झाले नाहीत तुझ्या, आणि बेधडक उडी मारलीस ! जिवाला काही वाटत नाही तुझ्या ?

नंदू ( सोडवून घेत हसून ) अग नाहीऽ हळूच तर उतरले..खर्रर्रच. एवढ्या तेवढ्यासाठी किती ग चिडतेस, मॉम्स... ( आईच्या गळ्यात हात घालते. )

मुक्ताबाई चिडतेस म्हणजे ? तू काय लहान आहेस आता ? पुन्हा ऑपरेशन टेबलावर जायचा प्रसंग ओढवून घ्यायचाय का तुला ? सारखं धावायचं, नाचायचं, नाहीतर उड्या मारायच्या.

नंदू ( कान धरीत ) अग चुकले—

मुक्ताबाई डॉक्टरांनी तुला एवढं दहा दहा वेळा बजावून सांगितलं तरी—

नंदू चुकलं म्हटलं ना — ? आता किनई अगदी कासवाच्या पावलानं चालेन. कशी सांगू ? ( चालून दाखवीत ) अश्शी !

हरिभाऊ तरी मी म्हणतोय की माझ्या हातात द्या... पडदा मी लावतो, पण —

नंदू ( वेडावून ) ॲहं...ॲहं... तुमचं पुरे झालं. सरळ आणि तिरकं यातला फरक देखील दिसत नाही तुमच्या डोळ्याला.

मुक्ताबाई ( उशांचे अभ्रे बदलीत ) अग पण जरा तिरका लागला पडदा तर—

नंदू (फणकाऱ्याने) अग वा ग वा! असा कसा चालेल मला तिरका लागून? (लडिवाळपणे) बघ तर खरं पडदा किती टॉप दिसतोय! ए मॉम्स, बघ ना—(आईच्या गळ्यात हात घालते, तशी—)

मुक्ताबाई (विरघळत तिचा गालगुच्चा घेत) आपलं ते खरं करणारी बयाबाई आहेस तू. (पडदा पाहात) छान दिसतोय. पण एवढ्यासाठी शंभर रुपयांची खिरापत केलीस आणि—

नंदू असू दे. या हॉलला शोभायला तरी नको? (सभोवार पाहात, स्वतः-भोवती गिरक्या घेत) खरं म्हणजे ममी, इथलं सगळं फर्निचरदेखील बदलायला हवं. अग हॅरिसनकडे इतका सुंदर सोफा आलाय म्हणून सांगू—

मुक्ताबाई येऊ दे. आपल्याला आहे हाच ठीक आहे.

नंदू (फणकाऱ्याने) तू म्हणजे अश्शीच! (लागलीच उत्साहभराने) ममी, आपल्या घरी टी. व्ही. सेट कधी आणायचा?

मुक्ताबाई आता टी. व्ही. बीव्ही काही नाही हं. फार लाडावलीस तू. या एका महिन्यात पाच-सहाशे रुपये खर्च केलेस तू.

नंदू पण माझ्यासाठी केले का? पपाच म्हणाले की टेस्ट मॅचच्या अगोदर मी तुला टी. व्ही. सेट आणून देईन म्हणून. होय की नाही, हरिभाऊ?

मुक्ताबाई अग पण तुला काही कळायला नको का, नंदू? दोन-अडीच हजार रुपये पडतात टी. व्ही. सेटला.

नंदू पण एकदाच तर घ्यायचा.

मुक्ताबाई एखादा संस्थानिक नवरा करून घेतलास तरच तुझं निभेल हो.

हरिभाऊ नाहीतर बागाईतदार. (दोघेही डोळे विस्फारून बघतात; तशी—) नाही म्हणजे हा षोक संस्थानिकांनादेखील परवडण्यासारखा नाही. ते बिचारे अलीकडे हॉटेलं चालवतात. पण बागाइतदारांना परवडेल. ते लक्षभोजनं घालतात!

नंदू (वेडावून दाखवीत) कळलं, कळलं. तुम्ही नका चोंबडेपणा करू.

मुक्ताबाई (दटावीत) नंदू—त्यांच्यावर उगीच डाफरू नकोस. तुझ्या मित्राबद्दल—त्या जयसिंह पाटलाबद्दल परवा मला ते हे सांगत होते की—

नंदू (उसळून) कोण? कोण सांगत होते? आधी त्याचं नाव सांग—

मुक्ताबाई हो, हो पण— तुला एवढं उसळायला काय झालं?

नंदू एखाद्याच्या माघारी असं बॅक-बायटिंग करणं मला नाही आवडत. त्याला आणून तुझ्यापुढं उभा करते; तुला सांगणारा कोण असेल त्याला तू आणून उभा कर. समोरासमोर रुजवात होऊ दे.

मुक्ताबाई जाऊ दे! सोडून दे! एवढा फणकारा तुला नको यायला! ( थबकून ) हरिभाऊ, डॉ. दुभाषींकडून एक्स रे रिपोर्ट्स कसे आले नाहीत अजून? ते महीपतराव पवार दोन वेळा येऊन गेले काल.

हरिभाऊ आज रविवार, उद्या सकाळी मिळतील सगळे रिपोर्ट्स.

नंदू ( सगळे विसरून उल्हासाने ) आज रविवार, नाही? ममी, परवा पपा म्हणाले होते की रविवारी आपण सगळे जुहूला — ( थबकून ) हरिभाऊ, पपा कसे अजून आले नाहीत? समुद्रात पोहायला काय मज्जा येते!

मुक्ताबाई चार मैलांची रपेट करण्यासाठी उजाडताना बाहेर पडलेत ते.

नंदू चार मैल चालून यायला एवढा वेळ?

मुक्ताबाई तुझ्या आणि त्यांच्या वयात फरक आहे, नंदू.

नंदू तरीदेखील चार मैल फिरून यायला—

हरिभाऊ छे छे— चार मैल कुठले आलेत? मी येताना पाहिलं... म्हणजे मी आपलं सहजच पाहिलं हो... साहेब, नाक्यावरच्या इराण्याच्या हॉटेलात टोस्ट-ऑम्लेट खात वर्तमानपत्र वाचीत बसले होते. अगदी निवांतपणे.

नंदू अय्याऽऽ! नाक्यावरच्या इराण्याच्या हॉटेलात?

मुक्ताबाई टोस्ट ऑम्लेट खात? छा—न! चांगलं—! कोलेस्टेरॉल वाढलंय म्हणून मी त्यांच्यासाठी अंडी खायचं सोडलंय, आणि—

हरिभाऊ माझं नाव सांगू नका. पण हा रोजचा कार्यक्रम आहे त्यांचा. सकाळची रपेट फक्त इराण्याच्या हॉटेलपर्यंत. हुंऽऽ! वर मला दम— 'कोणापाशी बोलशील तर खबरदार.' साहेबांच्या प्रकृतीसाठी चहाडी करतो हां, बाई.

नंदू पाहिलंस, मॉम्स...?

मुक्ताबाई ( रागाने उशी आपटीत ) सगळं पाहिलं. त्याचा अर्थ एकच आहे, उद्या सकाळपासून मला त्यांच्याबरोबर फिरायला जायला हवं.

( रागारागात आत निघून जातात. क्षणमात्र नंदू आणि हरिभाऊ थक्क होऊन पाहातच राहतात. तेवढ्यात बाहेरून "हाश्श, हुश्श!" करीत घामाघूम झाल्यासारखे देवदत्त प्रवेशतात. येतायेताच ते म्हणतात—)

देवदत्त ही चार मैलांची रपेट म्हणजे— नाही, थकायला होतं, पण एक थ्रिलिंग अनुभव आहे. हरिभाऊ, घाम पुसायला टॉवेल घेऊन या.

नंदू ( काम करता करता ) आणिक थोडी सुपारी नाहीतर बडीशेपदेखील.

देवदत्त ( विस्मयाने ) सुपारी? बडीशेप? म्हणजेऽऽ?

नंदू टोस्ट, ऑम्लेट खाल्ल्यानंतर विशेष नाहीतर सुपारी लागायचीच, नाही का ?

देवदत्त कोणी चहाडी केली ? कोण तो हरामखोर ?

हरिभाऊ मी नाही रे बाबा. हा गंग्याऽऽ! गंगाराम— ( लगबगीने बाहेर जातात. )

नंदू पपा, तुम्हाला ही लबाडी शोभत नाही.

देवदत्त ( बैठक मारीत ) नंदू, बेटी, एक हार्ट अ‍ॅटॅक येऊन गेलेल्या माणसाला सगळं सगळं काही शोभतं. अरे तीस–चाळीस वर्षांच्या खाण्यापिण्याच्या सवयी, केवळ हृदयात गडबड झाली म्हणून घाबरून सोडून द्यायच्या ? त्याही पन्नाशी ओलांडल्यावर ? अरे हट्‌!

नंदू हे मम्मीला पटवून द्या, पपा. मॉम्स...ए मॉऽम्स...

देवदत्त कारटेऽऽ! गप्प बसायला काय घेशील ?

नंदू फक्त एक टी. व्ही. सेट.

देवदत्त ( आवेशाने ) दिला. पण नंदू, तू मला सांग—
( त्याच वेळी मुक्ताबाई येतात आणि—)

मुक्ताबाई ( थंडपणे विचारतात ) काय ?

देवदत्त ( हबकून ) न...नाही, म्हणजेऽऽ ( अवसान गोळा करीत ) मी हिला विचारीत होतो की-— समजा, टोस्ट, ऑम्लेट, भात, बटाटा, साखर वगैरे वगैरे मी वर्ज्य केलं -- काय ? नुसत्या उकडलेल्या पालेभाज्या त्याही मीठ न घालता मी चघळल्या; वर ते कळकट्ट सूप नामक बेचव पाणी ढोसलं; कडू कार्ल्याचा भयंकर रस, दंगा न करता नाक दाबून घशाखाली उतरवला, आणि रोज सकाळी वणवणाऽ, वणवणा ऽ वणवणा ऽऽ चार मैल पोस्टमनसारखा रखड रखडलो; तर–तुमचा डॉ. दुभाषी मला अमरपदाची गॅरंटी देणार आहे का ? अमरपद सोडा, फक्त एक दिवस तरी मी हमखास मरणार नाही, याची गॅरंटी स्टॅंप-पेपरवर लिहून देणार आहे तो ? बोल ? तर मी सगळं करतो.

मुक्ताबाई ते डॉक्टर येतील, तेव्हा त्यांनाच विचारा. मी बरीक उद्या सकाळपासून तुमच्याबरोबर फिरायला येणार आहे.

देवदत्त अग पण–
( तेवढ्यात बाहेरून उत्साहभराने जयसिंह येतो. येतो तोच मुळी उत्साहभराने ओरडत– "हाय नंदू ऽऽ! दिल्लीसाठी आपण दोघंही सिलेक्ट झालो !" असे म्हणत तो दारातून आत येतो, आणि आतली

माणसे पाहाताच हबकतो. दारातच उभा राहतो. नंदू अत्यानंदाने पुढे होत—)

नंदू अय्या ऽऽ खरंच म्हणतोस की काय, जय? उगीच फिरकी घेऊ नकोस.

जयसिंह आय स्वेअर... स्पोर्ट्स कमिटीची मीटिंग आत्ता आटोपली. मला निकाल कळला तशी—

नंदू पण कसं शक्य आहे, जय? मागची मॅचदेखील मी पुरी खेळले नाही.

जयसिंह म्हणून काय झालं? गेल्या दोन वर्षांचा तुझा परफॉर्मन्स कमिटीच्या मेंबर्सना काय ठाऊक नाही?

नंदू तरी पण—

जयसिंह कमिटीच्या चेअरमननी सॉलिड जॅक लावला होता, आहे ठाऊक! अर्धा तास मीटिंगमध्ये त्यांनी तुझ्यासाठी फाइट दिली. ते म्हणाले म्हणे, महाराष्ट्रातर्फे ही मुलगी सिलेक्ट होणार नसेल तर मी ही टीमच बुइड्रॉ करतो.

नंदू (हर्षभराने) अय्या, खर्रर्रंच?

जयसिंह दिल्ली जिंकली की आपण सरळ यू. के. ला जातो आहोत.

नंदू (आईच्या गळयात हात घालीत) मॉम्स...हाऊ फाइन...

मुक्ताबाई इतक्यात हुरळून जाऊ नकोस, नंदू. डॉ. दुभाषींना विचारायला हवं. ते तुला परवानगी देतील असं मला वाटत नाही.

नंदू (उसळून) जा ऽऽ! मी जाणार. चांगली खडबडीत बरी झालेय मी. (वडिलांच्याकडे धाव घेत) पपा, तुम्ही सांगा—

देवदत्त हो हो पण! आत्ताच तर ट्रंक–वळकटी बांधायची नाही ना? सगळ्या बाजूंनी विचार करू आणि मग—

जयसिंह आज संध्याकाळपर्यंत संमती कळवायचीय कमिटीला. तासाभरात ऑफिशियल पत्रदेखील येऊन धडकेल.

देवदत्त एवढंच ना? दुपारी डॉ. दुभाषींना विचारून—

नंदू (फुरंगटून) नाही...नाही...पपा, डॉक्टर नको म्हणाले तरी मी जाणार. हा केवढा चान्स आहे त्याची कल्पना तरी—

मुक्ताबाई त्या चान्सपेक्षा तुझी प्रकृती महत्त्वाची नाही का?

नंदू नाही नाही,-मॉम्स, मी जाणार, जाणार, जाणार!

मुक्ताबाई इतका हट्टीपणा बरा नव्हे, नंदू. आत्ता आत्ता तू ऑपरेशनमधून उठते आहेस. मॅचमधलं खेळणं तुला झेपायला तरी नको?

देवदत्त मी म्हणतो, हा वाद आत्ता आणि इथं कशाला? डॉ. दुभाषींच्या

बरोबर सल्लामसलत करून—

नंदू (रागारागात) काय वाटेल ते ठरवा. (तिरीमिरीत जिन्यातून वर जात) जय, माझ्या नशिबात काही हा चान्स दिसत नाही. ही माणसं काही मला दिल्लीच्या मॅचसाठी जायला परवानगी द्यायची नाहीत. तू जा. कमिटीच्या चेअरमनला माझा नकार कळवून टाक. (तरातरा जिन्यातून वर जाते.)

मुक्ताबाई नंदू...नंदू, इतका माथेफिरूपणा बरा नव्हे.

देवदत्त (तिच्या मागोमाग जिन्याच्या पायरीपाशी जात) नंदू, बेटी, जरा समजुतीनं घ्यावं, मी काय सांगतो ते– (थबकून) गेलीच.

मुक्ताबाई जाऊ दे; घटकाभर बसेल रुसून. पण भलतेच कसले लाड ?

देवदत्त जयसिंह, तुम्ही आनंदाची बातमी आणून दिलीत. फार आभारी आहोत. संध्याकाळपर्यंत जो काय निर्णय ठरेल तो आम्ही कमिटीला कळवू.

जयसिंह पण— (अडखळत) नंदू...नंदू तशी ठीक आहे ना आता ?

देवदत्त अगदी उत्तम आहे. पण डॉ. दुभाषींना विचारल्याशिवाय कसं काय काही ठरवता येईल ? तरी पण मी सांगतो–बहुतेक ती येईल.

जयसिंह (हर्षभराने) थँक यू, पपा...नंदूच्या आई, येतो मी. (जातो.)

देवदत्त (दाराशी जाऊन पाहात, माघारी वळत) नंदूला उगीच दुखावलंस तू, मुक्ता.

मुक्ताबाई तुम्हाला वैद्यकशास्त्रातलं काही माहीत आहे का? ऑपरेशनची जखम वरून भरून आली असली तरी ते ट्यूमरचं ऑपरेशन होतं. सुचर्स काढले असले तरी आतून जखम अजून नाजूक आहे. खेळ म्हटला की ही धावणार, धडपडणार, उड्या मारणार. उद्या काही भलतंच होऊन बसलं तर तात्काळ ऑपरेशन–टेबलवर तिला घ्यावं लागेल, माहीत आहे ?

देवदत्त पण हेच, जरा वेळानं तिला सांगता आलं असतं; गोडीनं समजावून देता आलं असतं; डॉ. दुभाषींच्यामार्फत —

मुक्ताबाई डॉ. दुभाषी गोडीत सांगणार ? आणि एकदा 'होय' म्हटल्यावर ही बयाबाई ऐकणार ?

देवदत्त (वर जाऊ लागत) नो नो ! असं नाही चालणार, मुक्ता. मुलांच्या कलानंच घ्यायला हवं आपल्याला. निदान या अखेरच्या पर्वात तरी—

मुक्ताबाई तुम्ही फक्त मुलांचे लाड करा; बाकी सगळा वाईटपणा घ्यायला आहेच मी. मला ठाऊक आहे— राजूलादेखील तुमचीच फूस आहे.

देवदत्त (तिसऱ्या पायरीवर थबकून एकदम उसळत) काय...काय म्हणालीस? (मुद्रा तंग)

मुक्ताबाई (राग गिळून टाकीत, एकदम सौम्यपणे) काही नाही. आधी खाली या. तुम्हाला जिना चढायचा नाही, हे तुम्ही विसरलात.

देवदत्त (थबकतात. मुद्रेवरले भाव भराभर बदलतात. राग मावळतो, आणि मुद्रा सस्मित होते आणि–) होय होय, खरंच की! आणिक रागवायचं नाही हे देखील विसरलो. (पायऱ्या उतरून खाली येता येता) 'ऑब्झर्व द ऑब्झर्वर' – कृष्णमूर्ती म्हणतात हा राग कसा येतो ते पाहाणं मोठं मजेदार आहे, बरं का मुक्ताबाई!

मुक्ताबाई (सस्मित मुद्रेने) तसं खाण्यापिण्याबद्दल संयम कसा पाळावा यावर कृष्णमूर्ती नाही का काही सांगत?

देवदत्त (बसता बसता पाहून प्रसन्नपणे हसत) तू आहेस तश्शी खट्याळ पोरगी आहेस.

मुक्ताबाई पोरगी?

देवदत्त निदान माझ्या दृष्टीला तरी.

मुक्ताबाई इश्शऽऽ! कोणी ऐकलं तर म्हणतील की—

देवदत्त म्हाताऱ्याला 'म्हातारचळ' लागला,– हेच ना? अग मरणाच्या खांद्यावर हात ठेवून, हा म्हातारचळ बघण्यातदेखील मोठी—
(मुक्ताबाई त्यांच्या तोंडावर हात ठेवून त्यांचे बोलणे बंद करतात. देवदत्त हात हलकेच दूर करतात, पण हात हाती ठेवत) राहिलं. पण मुक्ता, जरा बैस अशी राजूला फूस लावण्याचं तू बोलून गेलीस—

मुक्ताबाई ते चुकलं माझं (बसतात; हात सोडवून घेतात.)

देवदत्त चूक किंवा बरोबर हा सवाल नाही. आपण दोघांनी त्याबद्दल एकदा मोकळ्या मनानं बोलायला हवं.

मुक्ताबाई (स्मित करीत) मोकळ्या मनानं बोलता येईल. पण बोलणं न रागावता, न चिडतादेखील व्हायला हवं.

देवदत्त तो संयम तू पाळायचास. मी कधी रागावतो? चिडतो?

मुक्ताबाई (चेष्टा करीत) छे छेऽऽ! मुळीच नाही. फक्त मध्येच डोळे मोठ्ठे करून एकदम गुरकावता– (नक्कल करीत) काय? काय म्हणालीऽस!
[दोघेही खळखळून हसतात. देवदत्त हसता हसताही 'मान लिया'— अशी दाद देतात. मग हसू आवरीत क्षणार्ध गंभीर होत देवदत्त–]

देवदत्त मुक्ता, तुला खरं सांगू? हे माझं हसणं, खिदळणं, थट्टा करणं अगदी वरवरचं आहे. निव्वळ मुखवटा खरं एकच आहे. मरणाला मी घाबरतो

आहे. प्रयत्न करून देखील हवं तेवढं धैर्य—

मुक्ताबाई काहीतरीच तुमचं बोलणं. तुमची प्रकृती अगदी उत्तम आहे. घाबरण्या-सारखं तुम्हाला काहीसुद्धा झालेलं नाही. (न्याहाळत) तुमचा माझ्यावर विश्वास नाही का? मी तुम्हाला फसवते आहे असं—

देवदत्त सोडून दे. बोलायला नको होतं ते चुकून बोलून गेलो. हं तर— मुक्ता, आता आपण मुद्द्याचं बोलू या. नुसतं शांतपणेच नाही, तर अगदी त्रयस्थपणानंदेखील. म्हणजे पक्षकार किंवा पेशंटकडे जसं आपण पाहतो तसं राजू–हेमाचं प्रकरण आपण तपासू या.

मुक्ताबाई तुम्ही म्हणाल तसं.

देवदत्त तोपर्यंत रुसून वर गेलेल्या या पोरीचा पारा जरा उतरेल आणि राजू–बाय द वे राजू कुठाय?

मुक्ताबाई सकाळी उठल्या-उठल्याच तुमच्यापाठोपाठ घराबाहेर पडलाय तो

देवदत्त काल रात्री तुम्हा मायलेकांचा जो प्रेमळ परिसंवाद झाला त्याचा परिणाम.

मुक्ताबाई (उसळून उठत) परिसंवाद? मी त्याला नुसतं एवढं म्हटलं की—

देवदत्त आवाज चढला! शांतताभंग झाला! त्रयस्थपणा संपला. आधी खाली बैस. (मुक्ताबाई बसतात. निर्मळ हसतात; तशी) दॅट्स इट! तो रागानं बाहेर गेला असला तरी चुकला पीर मशिदीत, तसा राजू हेमाच्या घरी. काच निवली की येईल परत. (उठून काही शोधत) तोवर आपण बोलू या. अगं ती घंटा काय झाली? (कोठेशी कॉल-बेल सापडते.) सापडली. (दारावरल्या नव्या पडद्याकडे दृष्टी जाऊन, जवळ जाऊन पाहात) वा! काय सुंदर आहे ग हा पडदा?

मुक्ताबाई तो तुमच्या लाडक्या ठकूताईचा उद्योग.

देवदत्त असं म्हणतेस? वा! छान! ठकूताई संसार मोठा रंगतदार करणार, बरं का! (बैठक मारीत घंटा समोर टीपॉयवर ठेवतात.)

मुक्ताबाई हो, पण ही घंटा कशाला आणलीत?

देवदत्त सांगतो. बोलण्याच्या भरात मी किंवा तू रागावलो की दुसऱ्यानं अश्शी—(घंटा दाबीत वाजवतात.) म्हणजे काय? इशारा. की लागलीच रागाचा पारा एकदम शून्यावर. बघतेस काय? कृष्णमूर्तींच्या तत्त्वज्ञानावर मी बसवलेला हा एक व्यावहारिक प्रयोग आहे. हूं; आता बोल. का मी बोलू? मला वाटतं, मीच बोलावं. एक तर लग्नाच्या वेळी कधीकाळी प्रथम मागणी मीच घातली होती—

मुक्ताबाई इश्शऽऽ, त्याचा इथं—

देवदत्त शिवाय, लग्नानंतर आजतागायत भांडणतंट्याचे प्रसंग निर्माण झाले

तेव्हाही पहिल्यांदा शरणागती मीच—

मुक्ताबाई तुम्हाला पहिल्यांदा त्याची वकिली करायचीय, एवढंच ना? ठीक आहे. प्रथम तुम्ही बोला. ( एकदम आवेशात येत ) मात्र एक आधीच बजावून ठेवते, घटस्फोट मिळायच्यापूर्वी राजूला या घरात मी कसलेही थेर करू द्यायची नाही.

देवदत्त ( मिस्किलपणे ) म्हणजे ‘ घराबाहेर ’ राजूनं कसलेही थेर करायला तुझी हरकत नाही...

मुक्ताबाई ( ताड्कन, रागाने उसळून उठत ) तुम्ही मुद्दाम वाकड्यात शिरत आहात. तुमचं नेहमीचंच पाहून ठेवलंय मी. मी काही सरळपणानं सांगायला गेले तरी— ( देवदत्त घंटेची कळ दाबतात. तशी घंटा हिसकावून घेत ओरडत— ) मी रागावले नाहीऽऽ, सांगून ठेवते !

देवदत्त ( मिस्किलपणे ) तेदेखील एवढ्या रागानं सांगितलंस !

( मुक्ताबाई घंटा भिरकावून देतात. देवदत्त स्मित करीत— “ प्रयोग फसलाऽऽ ! ” असे उद्गारत उठतात; घंटा उचलून शांतपणे दूर कोठे ठेवतात. )

मुक्ताबाई ( फणकाऱ्याने ) फसला तर फसू देत. घरादाराचा उच्छेद शांतपणानं पहायला मला काही धर्मराज व्हायचं नाही.

देवदत्त उच्छेद कसला आलाय त्यात ? मुक्ता, अगं घटस्फोट मिळाल्यावर राजू हेमाशी लग्न करणारच आहे. फक्त--

मुक्ताबाई आणि तोवर हेमानं राजूजवळ काय रखेली म्हणून राहायचं ?

देवदत्त मुक्ता, हा हिशेबी प्रश्न विचारायचा असेल तर, त्या दोघांच्यापुढं नीतिमार्तंडांनी आणि कायदेपंडितांनी दुसरा कोणता पर्याय ठेवलाय तेही तुला सांगावं लागेल. दोन उमद्या जीवांना, न्याय-नीतीच्या नावाखाली, बेमुदत खितपत ठेवण्याचा अधिकार कोणालाही नाही.

मुक्ताबाई ठीक आहे. माझ्या एकाच प्रश्नाचं उत्तर द्या: हातापाया पडून आपण विनवणी करीत होतो, तरी राजूनं फॅनीशी लग्न करण्याचा हट्ट—

देवदत्त मुक्ता — त्या एका चुकीसाठी एवढं जबर प्रायश्चित्त भोगायला हवं का त्यानं ?

( त्याच वेळी बाहेरून राजीव येतो आणि— )

राजीव ( शांतपणाने ) पपा, माझ्या चुकीचं प्रायश्चित्त मी भोगायचं ठरवलंय. हेमाचीदेखील मी समजूत घातलीय. ममी, घटस्फोट मिळून लग्न झाल्याशिवाय आम्ही संसार करणार नाही, की मैत्रीची मर्यादा ओलांडणार नाही.

मुक्ताबाई राजू, माझ्या म्हणण्याचा अर्थ—

राजू बास, बास ! यापुढं या प्रश्नाची चर्चा बंद. (वर निघून जातो.) (क्षणार्ध बोचक शान्तता. देवदत्त प्रयासाने मनःस्थिती आवरून पाईप भरू लागतात—)

देवदत्त आज सकाळी खाल्लेलं टोस्ट-ऑम्लेट काही सुखासुखी पचेलसं दिसत नाही, बाईसाहेब.

(तेवढ्यात डॉ. दुभाषी हातात बॅग घेऊन येतात, आणि—)

डॉ. दुभाषी (दारातच थबकून) टोस्ट ऑम्लेट ? म्हणजे तुम्ही टोस्ट-ऑम्लेट खाता ? (मुक्ताबाईंना) आणि तुम्ही यांना ऑम्लेट देता ?

देवदत्त (गडबडून) छे छे हो...आपलं सहज...म्हणजे...

मुक्ताबाई मी कशाला द्यायला हवं ? नाक्यावर इराणी बसलाय की हॉटेल घालून. फिरायला म्हणून जायचं आणि हवं ते चापून यायचं.

डॉ. दुभाषी अस्सं ऽऽ ! ही चालबाजी काय ?

देवदत्त नाही हो. डॉक्टर...फक्त आजच—

डॉ. दुभाषी यू आर रिअली– रिअली अ प्रॉब्लेम चाइल्ड.

मुक्तबाई उद्यापासून मीच त्यांच्याबरोबर फिरायला जायचं ठरवलंय.

डॉ. दुभाषी काही जरूर नाही. आसमंतातल्या सगळ्या हॉटेलवाल्यांना असा दम भरून ठेवतो की देखते रहेना. तहान लागली तर प्यायला पाणीदेखील मिळायचं नाही.

मुक्ताबाई (स्मित करीत) त्यांना तुमच्याकडून गॅरेन्टी पाहिजे आहे, डॉक्टर.

डॉ. दुभाषी गॅरेन्टी ? कशाची ?

मुक्ताबाई अमरपदाची. गॅरेन्टी मिळत असेल तर ते पथ्य करणार आहेत.

डॉ. दुभाषी (बॅग उघडून एक बाटली पुढे करीत) ही घ्या. सकाळी आणि संध्याकाळी एक चमचा, पाण्यातून.

देवदत्त (बाटली घेत) ही कसली बाटली ?

डॉ. दुभाषी अमृताची. तुम्हाला गॅरेन्टी हवीय, नव्हे ?

मुक्ताबाई डॉक्टर, रिपोर्ट्स मिळाले ?

डॉ. दुभाषी हो; कालच इंग्लंडहून आले. काय हो बॅरिस्टरसाहेब, पक्षकारांना केस जिंकण्याची गॅरेन्टी देता का कधी ?

देवदत्त अहो निव्वळ गंमत ! तुम्ही काय एवढं मनावर घेताय, डॉक्टर ? मला आधी सांगा, दिल्लीच्या मॅचसाठी नंदूची निवड झालीय. तिला भाग घ्यायला काही हरकत नाही ना ? म्हणजे अजून अवकाश आहे तसा, पण —

मुक्ताबाई (अस्वस्थतेने) डॉक्टर, रिपोर्ट्स—

डॉ. दुभाषी लक्षात आहे माझ्या, मुक्ताबाई. प्रथम यांना अमर करतो, आणि मग रिपोर्ट्स दाखवतो. नंदू कशी आहे?

देवदत्त अगदी ठणठणीत आहे. दिल्लीला जायला मिळत नाही म्हणून वर रुसून बसलीय. मॅचमध्ये खेळायला तुम्ही परवानगी—

डॉ. दुभाषी या मॅचिसचं भारी स्तोम माजलंय आताशा. परवाच्या टेस्ट मॅचच्या वेळी तर लोकांनी उच्छाद मांडला होता. जिकडे जावं तिकडे 'स्कोअर किती झाला? विकेट्स किती पडल्या?' दुसरी बात नाही. एका पेशंटला हार्ट ॲटॅक आला म्हणून त्याच्या घरी गेलो. घामानं निथळ-तोय, छातीतल्या कळांनी तळमळतोय, तोंडाला धाप लागलेली, मी इकडे ऑक्सिजन द्यायची तयारी करतोय. तर गधडा मला विचारतोय, "विकेट्स किती पडल्या?" म्हटलं, तोंड मीट, नाहीतर तुझीच विकेट पाडतो अगोदर!

(मुक्ताबाई मंद हसतात. देवदत्त खळाळून हसतात. तेवढ्यात हरिभाऊ येतात आणि–)

हरिभाऊ साहेब, बाहेर परवाचे पक्षकार आलेत.

देवदत्त (घुटमळत) पक्षकार? (डॉ. दुभाषींकडे पाहात चाचरत) अरे म्हणजे... पाहिलंत, डॉक्टर?

डॉ. दुभाषी सगळं पाहिलं. चला ऽऽ पळा अगोदर. बघीन बघीन आणि एक दिवस माझ्या नर्सिंगहोममध्ये अडकवूनच टाकीन तुम्हाला, तेव्हा समजेल. (देवदत्त हसत हसत हरिभाऊंच्या बरोबर जातात.)

मुक्ताबाई (अधीरतेने) डॉक्टर—

डॉ. दुभाषी (खिशातून सिगरेट-पेटी काढत) येस येस— तिकडेच वळतोय मी. देवदत्तांना कसं पिटाळावं या विचारात होतो मी. शेवटी पक्षकार ऐन वेळी साहाय्याला आला. (सिगरेट शिलगावीत) बसा मुक्ताबाई. (मुक्ताबाई अस्वस्थतेत बसतात.) मी ऽऽ (थबकून) मुक्ताबाई, यू हॅव गॉट टु बी ब्रेव्ह. बातमी काही फारशी चांगली नाही. पण कधी तरी—

मुक्ताबाई (थरथर कापत उठत) म्हणजे नंदू ऽऽऽ

डॉ. दुभाषी बसा मुक्ताबाई, बुई हॅव टु फेस इट्! नंदूच्या बायोप्सीचा हा रिपोर्ट, हे एक्स रे, आणि हे—

मुक्ताबाई का.... काय आहे त्यात, डॉक्टर?

डॉ. दुभाषी तिला रेडिओ थेरॅपीची ट्रीटमेंट घ्यावी लागेलसं वाटतंय मला.

मुक्ताबाई (धक्का बसून) म्हणजे बायोप्सीच्या रिपोर्टमध्ये— (थरथरत डोळ्यांत पाणी) नाही... नाही......नाही.

डॉ. दुभाषी मन घट्ट ठेवायचं. (मुक्ताबाई तळव्याने तोंड झाकून हुंदका देतात तशी) नाही..., मुक्ताबाई, तुम्हाला असं धीर सोडून चालणार नाही. यू हॅव टु फेस इट ब्रेव्हली. मुक्ताबाई, मी काय म्हणतोय ते कळतंय ना तुम्हाला ? (रडता रडता त्या मानेने 'होय' म्हणतात.) हे–हे अक्षम्य आहे; निदान तुम्हाला तरी. मुक्ताबाई, तुम्ही डॉक्टर आहात.

मुक्ताबाई (तळव्याने तोंड झाकून) नाही डॉक्टर, मी आई आहे नंदूची.

डॉ. दुभाषी (गलबलून) येस येस, आय नो दॅट... म्हणूनच मुक्ताबाई, तुम्ही डोळे पुसून कंबर कसून उभं राहायला हवं. विचार करा मुक्ताबाई, नंदूला कळलं तर काय होईल ? कोवळी पोर, उन्मळून पडेल. देवदत्तांचा विचार करा. त्यांना एक हार्ट ॲटॅक येऊन गेलाय. नुसती शंका जरी त्यांना आली तरी —

मुक्ताबाई (पदराने डोळे पुसून वर पाहात, धीर एकवटून) नाही नाही... डॉक्टर, कोणालाही काहीही कळता कामा नये... कधीही कळणार नाही. (क्षणभर सावरून) सांगा आता.

डॉ. दुभाषी ॲबडॉमेन ओपन केल्यावर लिम्फोसारकोमा काढून टाकण्याच्या अवस्थेत नाही हे सर्जन गिडवानींच्या लक्षात आलं. ट्यूमर रक्तवाहिन्यांना चिकटला होता. (थबकतात)

मुक्ताबाई (दगडी मुद्रेने) समजलं मला. गोळ्या कसल्या होत्या ? एण्डॉक्सॉन ?

डॉ. दुभाषी हूं (झुरका घेऊन धूर सोडीत) माफ करा, तुम्हाला कळू नये एवढ्यासाठी बाटलीचं लेबल काढून —

मुक्ताबाई (खिन्न हसून) तुमच्या लक्षात यायला हवं होतं— मी डॉक्टर आहे.

डॉ. दुभाषी माझ्या एवढंच लक्षात होतं की तुम्ही नंदूची आई आहात. (मुक्ताबाईंचे डोळे भरून येतात, तशी—) ऊं हूं, नाही मुक्ताबाई... आणि तसं ऑल इज नॉट लॉस्ट. प्रायमरीच ट्यूमर होता. शिवाय ती तरुण आहे. सशक्त आहे. वाढत्या वयाची आहे. निसर्ग आपल्या बाजूचा आहे. मुख्य म्हणजे सेकंडरीज आढळून आल्या नाहीत आणि ट्यूमर रेडिओ-सेन्सिटिव्ह आहे असं—

मुक्ताबाई (क्षणार्ध उन्मळत) पण डॉक्टर, हे असं का व्हावं ? माझ्या नंदूलाच– (पुन्हा हुंदका फुटतो... पण प्रयासाने दाबतात, गिळतात– पदर दाताखाली घट्ट धरून) नाही डॉक्टर... मी धीर सोडणार नाही. धीर सोडून मला चालणार नाही, तिच्यासाठी आणि त्यांच्यासाठी तरी...

डॉ. दुभाषी दॅट्स इट ! मी सांगतो मुक्ताबाई, डीप एक्स-रे ट्रीटमेंटनं शी विल बी ऑल राइट. अहो, महीपतराव पवारांच्या बायकोला तर वीस वर्षांनी सेकंडरीज डेव्हलप झाल्या. आपल्याकडून प्रयत्नात मुळीच कसूर होणार नाही. तुम्ही मात्र– ( गहिवरतात. )

मुक्ताबाई ( रिपोर्ट्स, एक्स-रे फोटो इत्यादी गोळा करीत शांतपणे ) महीपतराव पवारांच्या बायकोचे रिपोर्ट्सही यातच आहेत ? ( डॉ. दुभाषी सिगरेटचा झुरका घेत धूर सोडत ' हूं ' म्हणतात. तशी — ) तिची काय स्थिती आहे ?

डॉ. दुभाषी नो होप्स. ॲडव्हान्स स्टेज आहे.
( तेवढ्यात देवदत्त — " खरोखर या पक्षकारांना काळ, वेळ काही समजत नाही. आधी चालढकल करतात, आणि गळ्याशी येऊन ठेपलं की— " असे म्हणत येतात, आणि — )

देवदत्त ( थबकतात. मुक्ताबाईंची मुद्रा पाहात ) का ? काय झालं ?

मुक्ताबाई ( गडबडीने रिपोर्ट्स, एक्स-रे फोटो आवरीत ) क... काही नाही.

देवदत्त डॉक्टर, हिची मुद्रा अशी का ?
( मुक्ताबाई रिपोर्ट्स, फोटो वगैरे कपाटात बंदोबस्ताने ठेवू लागतात. )

डॉ. दुभाषी ( उठत ) या बाईंना जगाची काळजी. आता महीपतराव पवारांच्या बायकोला कॅन्सर झाला, तर –

देवदत्त सिली ! ते तू एवढं जिवाला लावून घेतेस ? अगं महीपतरावांना ठाऊक आहे, त्यांच्या बायकोलाही ठाऊक आहे—

मुक्ताबाई ( कपाटाचे दार लावून कुलूप लावीत ) मरण येणार हे सगळ्यांनाच ठाऊक असतं. म्हणून चटका लागायचं टळतं का ?

देवदत्त छे छे छे – तू उगाच डॉक्टर झालीस बघ.

मुक्ताबाई ( वळत शांतपणे ) काही माणसं सगळंच हसण्यावारी घालवतात, काही माणसांना झुरत, कुढत टिपं गाळावी लागतात.

देवदत्त ( हसून ) डॉक्टर, कळलं ना ? हा आम्हाला टोमणा, बरं का ?

डॉ. दुभाषी ( बॅग उचलत ) बराय, येतो मी. ( जाऊ लागतात. )

देवदत्त वेट अ मिनिट. डॉक्टर, नंदूचं दिल्लीला जायचं काय ठरलं ?

डॉ. दुभाषी ( दारात थबकून, वळून ) मुक्ताबाई सांगतील... ( जातात. )

देवदत्त कमाल आहे बोवा ! म्हणजे इतका वेळ तुम्ही दोघं त्या महीपतराव पवारांच्या बायकोला झालेल्या कॅन्सरबद्दल चर्चा करीत होता ?
( त्याच वेळी नंदू वरून खाली येत असते. तिला पाहून– )
ठकूताई; तुझी आई आणि तुझे डॉक्टर दोघंही ग्रेऽटच आहेत.

नंदू (जिन्याच्या शेवटच्या दोन पायऱ्यांवर थबकून) मॉम्स! चुकले ग मी. मी उगीचच्च हट्ट केला. मी दिल्लीला जाऊ नये असं तुला वाटत असेल तर—

मुक्ताबाई (गलबलून धावतात. लेकीला मिठीत ओढतात आणि) नाही... नाही ग, नंदू. पोरी, मी तुला दिल्लीला पाठवायचं ठरवलंय.

नंदू (अत्यानंदाने आईचे अंग घुसळत, तिच्याभोवती नाचत बागडत) खरंच? खरंच? मॉम्स, अगदी खरंच?

मुक्ताबाई (डोळे पाणावत) होय, होय ग, अगदी खरंच!

देवदत्त (बुचकळ्यात पडून) डॉक्टरांनी परवानगी दिली?

मुक्ताबाई परवानगी मी दिलीय. मी डॉक्टर आहे, आणिक तिची आईदेखील.

नंदू (पाठीमागून आईच्या गळ्याला मिठी घालीत, तिचे पटापटा दोन्ही गालांचे मुके घेत) ममी...ममी, तू किती चांगली आहेस...कित्ती कित्ती चांगली आहेस...पपा, आपली ममी किती किती किती चांगली आहे...

("किती किती किती" म्हणताना नंदू हर्षभराने आपल्या आईचे मुके घेते. फक्त प्रेक्षकांना दिसते आहे पाठीमागून आईच्या गळ्यात हात घालून हसणारी नंदू...आणिक डोळ्यांवाटे पाणी ओघळणारी नंदूची आई. देवदत्तही मागे उभे आहेत. बुचकळ्यात पडल्यासारखे— आणि त्याच वेळी—
पडदा.)

(अंक पहिला संपला.)

## अंक दुसरा

### प्रवेश पहिला

(बऱ्याच महिन्यांचा काळ उलटला असावा. अशीच एक सायंकाळ. तोच हॉल. ...आता खूपच नटला सजला आहे. बहुधा नंदूच्या हट्टामुळे. किती तरी किमती सुंदर चिजांची भर या हॉलमध्ये पडली आहे, नवा सोफा, टी. व्ही , पडदे, पेंटिंग्ज, पुतळे, शो-केस... जिकडे तिकडे रेलचेल दिसते आहे. एका कपाटावर फोटो-फ्रेम ठेवली आहे, राजीव आणि हेमा यांची. अगदी ठसठशीतपणे डोळ्यांत भरण्याजोगी. छायाचित्रातही हेमाच्या गळ्यातून छातीवर रुळणारे मंगळसूत्र स्पष्ट दिसते आहे.

पडदा वर जातो त्या वेळी हॉल रिकामा आहे. क्षणभरातच बोलण्याचा आवाज ऐकू येतो. नंदूचा आणि मुक्ताबाईंचा. दोघी बोलतच आत येतात. खरे म्हणजे बोलते आहे फक्त नंदू. मुक्ताबाई तिला फक्त साद देताहेत. तीही वरकरणी हसऱ्या प्रेमळ मुद्रेने आणि शब्दाने. पण त्यांची दृष्टी हरवलेली.. उदास. क्षणभराच्या स्तब्धतेतही त्या शून्यमनस्क होतात. भानावर येण्यासाठी कोणीतरी त्यांना डिवचावे लागते. अलीकडे नेहमीचेच झाले आहे हे. या वेळी मुक्ताबाईंच्या अंगावर एप्रन आहे. गळ्यात स्टेथास्कोप लटकला आहे, आणि हातात उघडे पेन तसेच आहे. त्यावरून पेशंटला तपासता तपासता मध्येच त्या लाडक्या लेकीचा आवाज ऐकून तश्शा बाहेर धावल्या असाव्यात असा कोणाचाही तर्क व्हावा. नंदूचा वेष, उत्साह आणि हातातली खूपशी पुडकी यांवरून उघडच एखादी बाजारपेठ लुटून ती घरी परतली असावी असे दिसते. तर बाहेरून आत येतायेताच नंदू खळखळून हसते — "तुला मज्जा सांगते मॉम्स, दुकानदार बाजूला घेऊन मला विचारायला लागला की इतकं बारीक व्हायला तुम्ही काय काय केलंत ?" त्यावर तिच्या पाठोपाठ आत येत मुक्ताबाई विचारतात— )

**मुक्ताबाई** कोण ? नेहरू क्लॉथ स्टोअर्सचे मगनभाई ?

**नंदू** तोच... तीनशे पौंडांचा सिलिंडर. मग मीही त्याची चांगली फिरकी घेतली. मी म्हटलं— 'अहो, ममीनं किनई मला एक लेटेस्ट औषध दिलं; इंपोर्टेड. काय चमत्कार सांगू ! एक चमचा औषध घेतलं की

बारा तासांत पौंडभर चरबी वितळलीच.'

मुक्ताबाई इश्श– काहीतरीच काय ?

नंदू ऐक तर खरी. डाएटिंग नाही, व्यायाम नाही की काही नाही. दिवसभर तुडुंब खावं-प्यावं. फक्त रात्री झोपताना एक चमचाभर औषध घेतलं की सगळ्यांचं पाणी. सकाळी पुन्हा आपलं एक पौंड वजन कमी. तसं म्हणाला— 'कोणतं ? कोणतं औषध ? जरा लिहून देता का ?'

मुक्ताबाई आणि तू लिहून दिलंस ? काय दिलंस ?

नंदू ( हसत ) फॅट–मेल्टो–माल्ट.

मुक्ताबाई फॅट मेल्टो माल्ट ?

नंदू अग, त्यानं ड्रॉवरमधून दहाची नोट काढली आणि कौंटरवरल्या मुनीमाला पिटाळला 'फॅट मेल्टो माल्ट' आणायला. ( हसते. )

मुक्ताबाई चल चहाटळ ! बरीच आहेस की !

नंदू आणि तो काय कमी आहे ? अग गोड गोड बोलून तीन साड्या गळ्यात बांधल्या त्यानं माझ्या.

मुक्ताबाई ( विस्मयाने ) तीन साड्या ? नंदू, तू काऽय सांगतेस ?

नंदू ( पुडकी फोडत ) बघ तरी किती सुंदर आहेत.

मुक्ताबाई ही मात्र त्यांनी चांगलीच फिरकी घेतली हां. नुसती तुझी नाही— आमचीदेखील.

नंदू ( खट्टू होत ) असं ग का म्हणतेस ?

मुक्ताबाई खरं म्हणजे परवा परवा राजूच्या लग्नात हेमाच्या बरोबरीनं तुला साड्या घेऊन दिल्या होत्या.

नंदू ( पुटपुटत ) पण आज कॉलेजच्या गॅदरिंगला... ऊम न्यूम न्यूम... तीन शील्ड्स घ्यायची आहेत मला तर...ऊम न्यूम न्यूम...

मुक्ताबाई अग हो. तुला तीन शील्ड्स घ्यायची आहेत, शिवाय सेक्रेटरी म्हणून भाषण करायचंय, सगळं ठाऊक आहे मला. पण तीन साड्या ?

नंदू एक हेमासाठी, एक तुझ्यासाठी, आणि—

मुक्ताबाई पुरे पुरे. माझं आणि हेमाचं नुसतं नाव. सगळ्या साड्या गुंडाळणार आहेस शेवटी तूच. पक्की लबाड आहेस तू.

नंदू ( घुश्शाने ) मग परत करून टाकू का ? तू नको म्हणत असशील—

मुक्ताबाई पाहा, पाहा; राग कसा नाकावर बसलाय अगदी. ( तिला जवळ घेऊन तिच्या गालाचा मुका घेत ) अग मी तुला कधी कशाला नाही म्हणते का ? आवडल्यात ना तुला ? ठेवून घे बरं.

नंदू ( खुलून ) तुलासुद्धा आवडतील. बघतेस ? किती क्यूट आहे एकेक

साडी. ( पुडकी फोडू लागते तशी )

मुक्ताबाई आत्ता नको. पेशंट तपासता तपासता दमशी आलेय मी. रात्री स्वस्थपणानं पाहीन तुझी खरेदी. समारंभाला जायचंय ना तुला ? साडेसहा वाजायला आले.

नंदू ( पुडकी गोळा करीत ) पाच मिनिटांत तयार होते बघ मी. ( वर जाऊ लागते. )

मुक्ताबाई थांब. मला आधी एक सांग, दुपारी घ्यायच्या गोळ्या घेतल्यास ? ( नंदू चकारून जीभ चावते. तशी उठून कपाटातून गोळ्या काढून देत आणि पाण्याचा ग्लास भरून आणीत– )
बघ कशी आहेस ती. तुझे मात्र सगळ्यांनी हव्वे तेवढे लाड करावेत आणि तू औषधसुद्धा —

नंदू ( आईच्या गळ्यात हात घालीत ) नाही ग मॉम्स... विसरले ऽ ऽ ! खररंच ( आ करीत ) तू आपल्या हातानं दे.
( मुक्ताबाई तिच्या तोंडात एकापाठोपाठ गोळ्या टाकतात, आणि गोळीगणिक पाण्याचा ग्लास तिच्या ओठाला लावतात. दोन्ही गोळ्या घेऊन झाल्यावर तोंड वेडेवाकडे करीत नंदू म्हणते– )
ममी, कधी ग संपायची ही औषधं ? या गोळ्यांनी किनई मला फार मळमळायला होतं बघ.

मुक्ताबाई ( तिला जवळ घेत ) झालं. आता थोडं राहिलं. शहाणी आहे माझी बाबी. ( तिचा पुन्हा मुका घेतात तशी— )

नंदू ( गाल पुसत ) हे ग काय चालवलं आहेस आताशा ?

मुक्ताबाई काय झालं ?

नंदू सारखे कसले पापे घ्यायचे ? मी कुक्कुलं बाळ आहे वाटतं ?
( मुक्ताबाई शून्यमनस्क होत तिच्याकडे बघत राहतात. तशी— )
इश्श हे काय ? कसल्या विचारात गढलीस एकदम ?

मुक्ताबाई ( दचकून भानावर येत ) ऊं ? काय म्हणालीस ?

नंदू जा गडे. अलीकडे तू भारीच अबसेन्ट माइंडेड व्हायला लागली आहेस. कसला विचार करीत होतीस ?

मुक्ताबाई ( हसून ) कसला नाही. तू काय म्हणत होतीस ?

नंदू मी म्हणाले, सारखे कसले पापे घ्यायचे ? मी कुक्कुलं बाळ आहे वाटतं ? जयदेखील चेष्टा करतो माझी.

मुक्ताबाई ( तिला कुरवाळत ) मग जयला माझा निरोप सांग. म्हणावं, आमच्या ठकूताईला सारखं सारखं चॉकलेट खायची सवय झालीय. चॉकलेट

खाऊन खाऊन तिचे गाल गोड झालेत ना, म्हणून –

नंदू (लाजून) इश्श्ऽ काहीतरीच तुझं.

(तेवढ्यात जिन्याच्या लँडिंगवर हेमा येते आणि – )

हेमा नंदूताई, फोन आलाय तुमचा, कॉलेजवरून.

नंदू फोन? कॉलेजवरून? (पुडकी घेऊन वर धावत) आलेच ग, मॉम्स. हेमा, बघ तरी कशा टॉप साड्या आणल्या आहेत एकेक.

मुक्ताबाई हेमा, फोन जरा खाली घेऊन येतेस?

हेमा आणते. (नंदूच्या मागोमाग आत जात) पुन्हा आणखी साड्या घेतल्यात? कमाल आहे तुमची!

(नंदू आणि हेमा माडीवर जातात. मुक्ताबाई दाराशी जाऊन 'गंगाराम' अशी हाक मारतात. गंगाराम 'जी,–आलो' अशी ओ देतो. मुक्ताबाई माघारी येत अस्वस्थपणे घाम टिपत बसतात. पुन्हा शून्यमनस्क होतात. तेवढ्यात गंगाराम येतो आणि—)

गंगाराम काय, बाई?

मुक्ताबाई (दचकून भानावर येत) ऊं? तू होय? काय बरं म्हणत होते मी? हं; ड्रायव्हरला गाडी काढायला सांग. म्हणावं, नंदूला कॉलेजवर सोडून यायचंय. व्हिजिटला मी नंतर जाईन. (गंगाराम जाण्यासाठी वळतो तेवढ्यात) हरिभाऊ काय करताहेत?

गंगाराम आपल्या दवाखान्यातल्या त्या नव्या नर्सबाई आहेत ना—

मुक्ताबाई नर्सबाई काय? अरे सुशीलाबाई म्हणावं.

गंगाराम तेच,—त्यांच्याशी भांडताहेत.

मुक्ताबाई (विस्मयाने) सुशीलाबाईंशी भांडताहेत? हरिभाऊ?

(तेवढ्यात तरातरा हरिभाऊ प्रवेशतात आणि रागारागात–)

हरिभाऊ बाईसाहेब, आपल्या दवाखान्यातली नोकरी मी सोडायचं ठरवलंय— तात्काळ. या क्षणापासून.

मुक्ताबाई (शांतपणे) ठीक आहे.

हरिभाऊ (उसळून) ठीक आहे? काय ठीक आहे? याचा अर्थ काय?

मुक्ताबाई नोकरी सोडायचं तुम्ही ठरवलंय म्हणून सांगितल्यावर मी दुसरं काय म्हणणार? (हे ऐकून दाराशी थबकलेला गंगाराम फिदीफिदी हसतो. तसा उसळून त्याच्या अंगावर धावून जात–)

हरिभाऊ हास...हास...एक दिवस दंतमंजन लावायलादेखील एक दात नाही शिल्लक ठेवायचा...(गंगाराम पसार होतो दरम्यान–)

मुक्ताबाई हां हां– हरिभाऊ, लहान पोर आहे तो.

हरिभाऊ  महा इब्लिस झालंय कारटं तिची फूस मिळाल्यापासून.

मुक्ताबाई  कोणाची फूस ?

हरिभाऊ  ( फणफणत ) ते—ते ध्यान. यूसलेस. नर्स झालंय म्हणे नर्स. साधं बँडेज बांधता येत नाही. आयडिन आणि बेंझाइनमधला फरक कळत नाही. इंजेक्शन द्यायला बाई जवळ आली की पेशंट ठणाणा करतात. पोत्यात दाभण खुपसावा तशी ही बया दंडात सुई खुपसते. वर पुन्हा माझ्याशीच तणतणते. आणि तुम्ही आपल्या मलाच खुशाल नोकरीवरून 'जा' म्हणता ? वीस वर्षं मी इथं नोकरी केली ती—

मुक्ताबाई  ( शांतपणे ) हरिभाऊ, मी तुम्हाला जा म्हणाले नाही. नोकरी सोडायची भाषा तुम्हीच पहिल्यांदा–

हरिभाऊ  ( ओरडून ) तो माझा गाढवपणा झाला. अगदी शतमूर्खपणा—

मुक्ताबाई  हळू हळू...हळू बोला. ओरडू नका.

( त्याच वेळी हेमा वरून टेलिफोन घेऊन खाली येत असते. ती विचारते—)

हेमा  काय झालं, हरिभाऊ ?

मुक्ताबाई  काही विचारू नकोस. सुशीलाबाईंनी तुझ्याकडून कामाचा चार्ज घेतल्यापासून हरिभाऊंची आणि त्यांची रोजची भांडणं चाललीत.

हरिभाऊ  मी नाही ऽऽ ! त्याच भांडतात माझ्याशी. अरेऽऽ ? मला काही पोझिशन आहे की नाही या दवाखान्यात ? वीस वर्षं–

हेमा  हरिभाऊ, तुम्ही दवाखान्यात चला; मी येऊन बघते.

हरिभाऊ  हेमाताई, तुम्हीच सांगा, तुम्ही दवाखान्यात होता त्या वेळी एकदा तरी कधी— नाही, किरकोळ मतभेद सोडून द्या, पण एकदा तरी कधी—

हेमा  कळलंऽऽ. तुम्ही चला. मी येते म्हटलं ना ?

(हरिभाऊ जाऊ लागतात. मुक्ताबाई कधीच शून्यमनस्क झाल्या आहेत. दारापाशी थबकून हरिभाऊ वळून म्हणतात– )

हरिभाऊ  मघाशी ते राजश्री येऊन गेले, फटफटीवरून.

हेमा  कोण राजश्री ?

हरिभाऊ  ते तेऽऽ ! बागाईतदार पाटलांचे कुलदीपक.

हेमा  कोण, जयसिंह ? मग त्यांना आत या म्हणायचं नाही !

हरिभाऊ  खरं म्हणजे मी म्हणायचा नाही; तरी पण म्हणालो. केवळ नंदूताईंच्यासाठी. पण मला पाहाताच काहीतरी निरोप बोलला आणि फटफटीवरून पळाला. काय बोलला ते बरीक नीटसं ऐकू आलं नाही

हेमा  अहो पण–

(त्याच वेळी नंदू वरून खाली येऊ लागते, नटूनथटून. चेहरा रागावलेला. हरिभाऊंचे बोलणे ऐकून–जिन्यातच ती थबकते.)

हरिभाऊ (आवेशाने) हेमाताई, तुम्हाला म्हणून सांगतो, कोणाही सभ्य गृहस्थानं दारात उभा करू नाही अशा लायकीचा माणूस आहे हा. अहो, पक्का चालूऽऽऽ!

नंदू (रागाने) हरिभाऊ, तुम्ही कोणाबद्दल बोलत आहात? जयबद्दल?

हरिभाऊ (गडबडून) न... नाही... छे छे, भलतंच काय... म... म... मी... मी... त्या आपल्या नर्स सुशीलाबाई आहेत ना—

नंदू (खाली येत कडाडत) खोटं. पक्के खोटारडे आहात तुम्ही.

हरिभाऊ (बाहेर कानोसा घेतल्याचा आविर्भाव करीत) ओऽऽ आलोऽऽ (लगबगीने पसार होतात. मुक्ताबाई भानावर येतात आणि दचकून — "ऊं? काय झालं ग, हेमा? नंदू, कोणावर ओरडलीस तू? आणि हरिभाऊ कुठे आहेत?" नंदू खाली येत आईला बिलगते– )

नंदू (रुद्र स्वरात) ममी, ही माणसं पुरतं कळून समजून घेतल्यावाचून उगाचच एखाद्याबद्दल वाईट का बोलतात ग? मला सांग, वाट्टेल त्या उडाणटप्पूशी दोस्ती ठेवण्याएवढी मी बेजबाबदार आहे? खरं खरं सांग... नुसतं तोंडापुरतं बोलू नकोस. तुझा माझ्यावर विश्वास आहे की नाही?

मुक्ताबाई (तिला जवळ घेत) अग पण कोण काय बोललं तुला?

नंदू तुझं लक्ष कुठाय? तुझ्यासमोर तर हरिभाऊ बोलले.

मुक्ताबाई (विस्मयानं) हेमा—

हेमा बोलले तर बोलले. आपण कशाला तिकडे लक्ष द्यावं? हरिभाऊंचं तोंड कसं आहे हे आपल्याला ठाऊक नाही का?

नंदू (डोळे पुसत) पण जय काय 'चालू' माणूस आहे? कुणाही सभ्य गृहस्थानं दारात उभा करू नये,–एवढा नालायक आहे तो?

मुक्ताबाई (तिला जवळ घेत कुरवाळीत) जाऊ दे... त्यांचं बोलणं तू मनावर घेऊ नकोस. हरिभाऊंना मी अगदी खरमरीत समज देईन बरं. शहाणी आहे... गुणाची माझी बाबी... अगदीऽऽ डोळ्यांतून पाणी काढायचं नाही... इतका सुंदर थाटमाट केला आहेस आणि डोळ्यांत पाणी?

नंदू पण ममी—

मुक्ताबाई (तिचा पापा घेत) पण बिण काही नाही. गॅदरिंगला जायला उशीर का करायचाय तुला? जा लवकर... गाडी उभी आहे दाराशी. (तिला दारापर्यंत नेत) समारंभ संपला म्हणजे फोन कर, मी स्वतः गाडी घेऊन

न्यायला येईन तुला. अच्छा... टाटा...

( नंदू जाते. मुक्ताबाई एकदम गंभीर होत माघारी फिरतात तशी– )

हेमा सुशीलाबाई कामाला रुळेपर्यंत मी येत जाऊ का दवाखान्यात ?

मुक्ताबाई नको. एक तर घरातलं सगळंच तुला पाहावं लागतं, शिवाय राजूला तू दवाखान्यात काम केलेलं आवडायचं नाही.

हेमा हा आपला समज अगदी चुकीचा आहे. मी परवा विचारलं त्यांना तेव्हा—

मुक्ताबाई ( फोनजवळ बसत रिसीव्हर उचलून डायल फिरवीत ) हेमा, त्याला काय आवडतं आणि काय आवडत नाही हे तुझ्यापेक्षा मला जास्त कळतं. थोड्या आणखी सहवासानं तुलाही कळायला लागेल. विचारलं तर तो कशाला ' नाही म्हणायचा नाही, पण– ( तेवढ्यात फोनमध्ये ) हॅलो, मी डॉ. मिसेस मुळगावकर... डॉ. दुभाषी आहेत का ? द्या त्यांना ... हो थांबते... ( फोनवर हात ठेवीत ) फॅनीच्या प्रकरणापासून तो फार हळवा झालाय. वेळीच घटस्फोट मिळाला त्याला हे आमचं नशीब. आता आणखी काही वर्षं तरी तू सावलीसारखं त्याच्या मागं उभं राहून सांभाळायला हवंस त्याला. ( फोनमध्ये ) हॅलोऽऽ, हो, मी मुक्ताबाई बोलतेय... हूं... हूं... हो... नाही, अगदी नियमानं सगळी औषधं वेळच्या वेळी देतेय मी तिला... पण गोळ्या घेतल्यावर मळमळल्या-सारखं वाटतंय म्हणते ती... हूं हूं... नाही, बाकी अगदी ठीक आहे ती.... ऊं ?... पुन्हा ? चेकअपसाठी... ? बाई ग बाई... कठीण कर्म आणलंत... नाही... नाही .. तसं नाही हो... पण हॉस्पिटलचा धसका घेतलाय तिनं... हूं... हूं... ते बरोबर आहे... तुम्ही घेऊन जाल तिला ? मग माझी काळजीच मिटली... सकाळी साडेआठला तयार... तिला... आता ना ? कॉलेजचं गॅदरिंग आहे, तिकडे गेलीय ती. ट्रॉफीज मिळायच्यात तिला आज... हो हो, अगदी खुषीत... ऊं ? कोणाची, यांची ?... चांगली आहे की... पथ्यपाणी ? तेवढं विचारू नका... नाही. आमच्यासमोर सगळं करतात... पण वजन तेवढंच आहे अजून... हूं... बराय... सकाळी वाट पाहते... ( फोन खाली ठेवून विचारमग्न मुद्रेने उठतात; तशी– )

हेमा नंदूताईंना पुन्हा हॉस्पिटलमध्ये न्यायचंय ?

मुक्ताबाई किरकोळ चेकअपसाठी ग. बरं आहे. मी दवाखान्यात जाते. हे कोर्टातून परतल्यावर चहापाण्याचं बघ. की कुठं बाहेर जाणार आहात तुम्ही दोघं ? जाणार असलीस तर—

हेमा — छे बाई, कुठंही नाही.

मुक्ताबाई — राजू कसा आला नाही अजून ?

हेमा — यायची वेळ झालीच आहे त्यांची. क्लबमध्ये जाऊन येतात म्हणून...

मुक्ताबाई — क्लबमध्ये ? म्हणजे तुम्ही दोघं संध्याकाळी फिरायला जात नाही कधी ? ( हेमा सार्थ स्मित करते तशी- ) कमाल आहे. अग, घरातलं काम काय, कधीच संपायचं नाही. त्यातूनच सवड काढायची. लग्नानंतर एकमेकांना पुरतं समजून घ्यायचा हाच काळ असतो, लग्न झाल्यावर. प्रेम कसं करावं तेही तुम्हा मुलींना शिकवायला हवं का ग ?

हेमा — ( ओशाळत ) तसं नाही...सुट्टीच्या दिवशी जातो आम्ही बाहेर.

मुक्ताबाई — येते मी. ( दाराशी जात ) आणिक एक गोष्ट, हरिभाऊंना मी बजावतेच आहे, पण तुम्ही दोघांनीही जरा संयम राखायला हवा.

हेमा — कशाबद्दल ?

मुक्ताबाई — नंदूसमोर जयसिंहबद्दल बोलताना.

हेमा — परवा हे बोलले त्यावरून म्हणता ? मी सांगते, त्यात त्यांचा हेतू—

मुक्ताबाई — चांगला होता हे मला ठाऊक आहे. तरीदेखील तिला कोणत्याही कारणासाठी दुखवायचं नाही. तिला लागेलसं कोणीही बोलायचं नाही.

हेमा — पण—

मुक्ताबाई — तिची जिम्मेदारी माझ्यावर आहे. तिच्या डोळ्यांत पाणी आलेलं मला आवडायचं नाही. राजूला बजावून सांग.

( मुक्ताबाई जाण्यासाठी दाराकडे वळतात. तोच प्रक्षुब्ध मुद्रेने राजीव आत येतो. त्याला पाहताच- )

मुक्ताबाई — काय रे तुझं येणं ? थोडा तरी नवविवाहित पतीसारखा वाग की ! बिचारी केव्हापासून वाट बघतेय तुझी.

राजीव — ( हेमाच्या हाती बॅग देत ) ममी, इतक्यात नंदू कुठं गेली ?

मुक्ताबाई — ( उंबऱ्यातच थबकून ) तिच्या कॉलेजमध्ये गॅदरिंगला. का ?

राजीव — गॅदरिंगला जायचं तर तिला आपल्या गाडीतून का नाही पाठवलंस ?

हेमा — इश्श ! म्हणजे काय ? आपल्याच गाडीतून गेल्या की त्या.

राजीव — नाही. जयसिंहाच्या मोटर-सायकलवर त्याच्यामागं बसून गेलेली पाहिली तिला मी,—इतक्यात.

मुक्ताबाई — एवढंच ना ? गेली असेल.

राजीव — नुसतं तेवढंच नाही, ममी—तू जरा थांब. मी तुला—

मुक्ताबाई — ( गडबडीने ) आत्ता नाही. दवाखान्यात पेशंट्स वाट बघताहेत माझी.

राजीव — पण, ममी– (मुक्ताबाई जातात. टीपॉयवरचे सहज उचललेले वर्तमानपत्र

ताड्कन भिरकावून देत राजीव 'नॉन्सेन्स'... असे रागाने उद्गारतो. हेमा पळत जाऊन ते वर्तमानपत्र उचलीत परत जागी ठेवते आणि त्याला कपडे काढायला मदत करीत लाघवीपणाने म्हणते—)

हेमा त्यांना नाही आवडत तर सोडून द्यावं.

राजीव कसं सोडून द्यावं? माझा या घराशी काही संबंध आहे की नाही?

हेमा बाईंनी मला निक्षून बजावलंय की नंदूताईंना कोणत्याही कारणासाठी दुखवायचं नाही की त्यांना लागेलसं कोणी काही बोलायचं नाही.

राजीव मग काय, तिचे फक्त लाड करायचे? ती कसंही वागली तरी?

हेमा पण बाईंनी नंदूताईंची सगळी जिम्मेदारी घेतलीय. तुम्ही का उगीच डोक्यात राख घालता?

राजीव हेमा, ममी नंदूची आई असली तरी मी तिचा थोरला भाऊ आहे. ममीला दवाखाना आणि घर यापलीकडे दुसरं जग माहीत नाही. नंदूबद्दल लोक जे काय बोलतात ते ऐकावं लागतं मला.

हेमा (हसून) पूर्वी आपल्याबद्दल लोक जेव्हा बोलत, तेव्हा बाईंनी नाही ऐकून घेतलं?

राजीव (उसळून) पण तेव्हाही आपण लग्नाआधी हॉटेलमध्ये जाऊन राहिलो, असं नाही कोणी लोक बोलले.

हेमा (थक्क होत) म्हणजे नंदूताई—

राजीव (बॅग आणि हातावर कोट घेत ताड्ताड् वर जात–) आय ॲम सिंपली डिसगस्टेड ब्रुइथ हर. (जातो.)

हेमा (जिन्यापाशी जात) मी चहा करतेय. कपडे बदलून खाली या.

(ते ऐकतच बॅ. देवदत्त प्रवेशतात. हातातली बॅग भरपूर फुगलेली.)

देवदत्त छान छान– चहा तर करच, पण बरोबर काही तरी खायला करून आण. म्हणजेऽऽ– (हलक्या आवाजात) मुक्ता कुठाय?

हेमा बाई दवाखान्यात.

देवदत्त आणि ठकूताई?

हेमा नंदूताई गॅदरिंगसाठी कॉलेजवर गेल्या आहेत.

देवदत्त जाऊ देत, जाऊ देत. तर, तू चहाबरोबर सुंदर शिरा बेदाणे घालून, नाही तर खमंग कांदेपोहे, झटपट तयार करून आण.

(असे म्हणत कोट काढत प्रशस्तपणे बसतात बॅग जवळ घेऊन)

दडपे पोहे केलेस तरी चालेल. तिखट मात्र जरा बेतानं घाल हो.

हेमा (स्मित करीत) बाईंच्याकडून किल्ल्या मागून आणू?

देवदत्त (विस्मयानं) किल्ल्या? कसल्या किल्ल्या?

हेमा या सगळ्या जिनसा त्यांनी बंदोबस्तानं कपाटात ठेवून कुलूप घातलंय
देवदत्त ( उसळून ) अरे म्हणजे कमाल झाली. तिचा तुझ्यावर एवढा विश्वास नाही ?
हेमा विश्वास माझ्यावर आहे, पण— ( घुटमळते आणि हसते, तशी — )
देवदत्त माझ्यावर नाही, असंच ना ? ठीक ठीक ! बघून घेईन. तू एक रिकामी डिश घेऊन ये. ती तरी उघड्यावरच आहे ना ?
हेमा डिश कशासाठी ?
देवदत्त आण म्हटली की आणावी. सासुरवाशिणीनं फाजील चौकशा करू नये. जा, पळ अगोदर.

( हेमा बावचळून पाहात आत जाते, आणि क्षणभरात डिश घेऊन येते. दरम्यान देवदत्त सभोवार चाहूल घेत खुषीत जवळची बॅग उघडतात आणि त्यातून एक पुडा बाहेर काढतात. हेमा डिश समोर ठेवत विचारते—)

हेमा हे काय ?
देवदत्त ( पुडे उलगडत ) तुला मटन सामोसे आवडतात असं म्हणाली होतीस ना परवा ?
हेमा इश्शऽऽ. मी कधी म्हणाले ?
देवदत्त म्हणाली होतीस. तुला आठवत नसेल. कोर्टाच्या कँटीनमधला आमचा रामभय्या सामोसे मोठे फर्मास बनवतो. ( डिशमध्ये सामोसे ओतत ) म्हटलं त्याला, आमच्या सूनबाईचा फार दिवसांपासून हट्ट चाललाय, तेव्हा—
हेमा अहो पण—
देवदत्त वडीलधाऱ्यांना खोट्यात पाडू नाही, हेमा. तुला या रीतीभाती कधी कळायच्या ? घे घेऽऽ लाजू नकोस.
हेमा पण मला नकोय. आणिक तुम्हीदेखील—
देवदत्त अग तशी यात फॅट बिट काही नाही. मटण म्हणजे प्रोटीन्स. वरचं आवरण मैद्याचं अगदी कागदासारखं पातळ. शिवाय तळलंय सपोला-मध्ये—म्हणजे काय ? काहीच नाही. ( तोंडात घालीत ) विरघळलं. पाहिलंस ? बघ—बघ तरी— अग एखादा खाऊन पाहा... ( त्याच वेळी अचानक मुक्ताबाई बाहेरून गडबडीने प्रवेशतात. येतात त्याच मुळी विचारत— " हेमा, फ्रीजमध्ये ठेवलेल्या औषधात स्ट्रेप्टोमायसिनच्या ट्यूब्ज आहेत का ग ? "— आणि देवदत्तांना व त्यांच्यापुढं ठेवलेल्या सामोशांच्या डिशला पाहून एकदम थबकतात. मुद्रा एकदम प्रक्षोभित

होते. तसे देवदत्त गडबडून जातात. तरी पण अवसान राखून म्हणतात )

देवदत्त क...काही नाही... काही नाही. थोडेसे सामोसे घेऊन आलोय सामोसे. कोर्टाच्या कॅंटीनमधून... नंदूचा फार दिवसांचा हट्ट होता... म्हटलं, घेऊन जाऊ या आज. अगदी नॉन कॅलरिक. तर हेमा, तुझ्या आग्रहाखातर हा एक मी उचलतो. बाकीचे अगोदर आत नेऊन ठेव बघू. उगाच मला मोहात पाडू नकोस. अरे तुम्ही मुलांनी खाल्लं म्हणजे आम्ही खाल्ल्यासारखंच आहे. आणि आधी माझी औषधं घेऊन ये जा पळ.. )

( हेमा चटकन डिश उचलून जाते. मुक्ताबाई नजरेनेच आपला निषेध नोंदवीत मान वळवत फणकाऱ्याने आत जातात. देवदत्त सामोसा खातात आणि तोंड पुसून पाईप काढून भरू लागतात. तेवढ्यात वरून राजीव येतो, आणि समोर कोचाच्यामागे उभा राहतो. मुद्रा गंभीर आणि रागीट. काही तरी बोलायचेय; पण कसे बोलावे ते समजत नसावे. तशी त्याची ही अवस्था हेरून– )

देवदत्त बैस ना ! उभा का ? ( राजीव स्तब्ध राहतो, तशी न्याहाळत ) राजू, फॅनीकडून तुला घटस्फोट मिळाला, हेमाशी तुझं लग्न झालं; सगळं व्यवस्थित यथासांग तुझ्या मनासारखं झालं, तरी तुझी मुद्रा अशी सुतकी का ?

राजीव पपा, तुम्ही गंभीरपणे ऐकून घेणार असलात तर काही गोष्टी तुमच्या कानांवर घालायच्या आहेत.

देवदत्त नंदूबद्दल ?

राजीव हो

देवदत्त मग त्या तुझ्या ममीला सांग.

राजीव ममीला सांगण्यात अर्थच नाही. नंदूच्या मायेनं ममी आंधळी आणि बहिरी झालीय.

देवदत्त ( अस्वस्थतेने उठत ) राजू, तू काय सांगणार आहेस त्याची मला अंधुकशी कल्पना आहे. पण ते ऐकून होणारा मनस्ताप मला परवडण्यासारखा नाही. हां–आता खाण्यापिण्याचं काय थोडंफार कुपथ्य करतो, तेवढं पुरे झालं. त्याच्या भरीला आता आणखीन या काळज्या नकोत.

राजीव मग एकूण चालले आहेत ते प्रकार असेच उघड्या डोळ्यानं बघत राहायचं ?

देवदत्त राजू, आता उरलेल्या आयुष्यात मी कोणालाही दुखवायचं नाही असं ठरवलंय. तू ममीला सांग. नंदूला धाक असला तर तिचाच आहे.

राजीव पण पपा, नंदूबद्दल ममी काहीही ऐकायला तयारच नाही, तर—

देवदत्त छे छे; मला नाही खरं वाटत. (तेवढ्यात मुक्ताबाई औषधाचा पेला घेऊन येतात, आणि देवदत्तांच्या पुढे करतात. देवदत्त औषध पिऊन पेला पुढे करतात. दरम्यान हेमा चहाचा ट्रे घेऊन येते. ट्रे टीपॉयवर ठेवते. देवदत्त चहाचा कप उचलीत म्हणतात) मुक्ता, जरा थांब. राजूला नंदूबद्दल—

मुक्ताबाई (पेला हेमाच्या हाती देत) नंदूबद्दल मला कोणाकडूनही काहीही ऐकायचं नाही. (बाहेर जाऊ लागतात, तशी—)

राजीव झालं ? पटली खात्री ?

देवदत्त नो नो; असं चालणार नाही. डोन्ट बी अन्‌रिझनेबल— मुक्ता, तुला ऐकून घ्यायलाच हवं, आम्ही बाकीची माणसं काही नंदूचे वैरी नव्हेत.

मुक्ताबाई (दाराशी थबकून) दवाखान्यात पेशंट्स वाट बघताहेत माझी.

राजीव आम्ही काही शिळोप्याच्या गप्पा मारण्यासाठी थांबवीत नाही तुला इथं.

मुक्ताबाई (शांतपणे) तुला काय सांगायचंय, ते तू यांना सांग.

राजीव (उसळून) मी पपांनाही सांगत नाही आणि तुलाही सांगणार नाही. मात्र आज नंदूला मी जे बोलणार आहे त्या वेळी तुम्ही कोणी मध्ये पडलात तर मात्र—

मुक्ताबाई (एकदम गलबलून माघारी फिरत) नाही...नाही...राजू, नंदूला तू एका शब्दानंसुद्धा दुखावता कामा नयेस. माझ्या गळ्याची शपथ आहे तुला.

राजीव पण का ? असली कसली आंधळी माया ? बोलायच्या ठिकाणी बोललंच पाहिजे. मला कळत नाही ममी, नंदूबद्दल तू एवढी का हळवी झाली आहेस ?

मुक्ताबाई तुला ते कधी कळायचं नाही, राजू. पण माझी शपथ आहे, तिला कोणी काही बोलायचं नाही. तुला काय सांगायचंय ते मला सांग. मी तुझं सगळं सगळं ऐकून घेते. पण नंदूला मात्र... (क्षणार्ध त्या गहिवरतात. पण लागलीच सावरतात. मध्यभागी आसनावर बसत) हूं, बोल, मी ऐकते आहे.

राजीव तू एवढं जिवाला लावून घेणार असलीस तर मी तरी कशाला बोलू ?

देवदत्त हे बरोबर नाही, मुक्ता. नंदू तुझी लाडकी लेक असली तरी—

राजीव लाड करावेत की. खाण्यापिण्यात, कपड्यालत्त्यांत लाड चाललेच आहेत. मलाही नंदू एकुलती एक बहीण आहे. मीही तिचे लाड काही कमी केले नाहीत. या दोन-चार महिन्यांत नंदूनं पाण्यासारखा पैसा उधळला.

ती मागेल ते ममीनं तिला घेऊन दिलंय, टी. व्ही. म्हणाली–टी. व्ही. आणला. दोनदोनशे-तीनतीनशे रुपयांच्या साड्यांची किती खरेदी झाली त्याला तर गणतीच नाही. पपा, हिऱ्याची इयर-रिंग घेण्याची ऐपत तरी आहे का हो आपली ? पण नंदूनं हट्ट केला. ममीनं पुरवला. मी एका अक्षरानं कधी बोललो नाही. पण मुलीचे लाड पुरवायला-देखील मर्यादा असतात. तो जयसिंह पाटील काय लायकीचा माणूस आहे हे दुनियेला ठाऊक आहे. दरवर्षी त्याला नवीन मोटार सायकल आणि फिरवायला नवी पोरगी लागते. एका मुलीनं जीव दिलाय त्याच्या पायी. याचे उद्योग तर असले — की बाप आमदार आहे म्हणून वाचला, नाहीतर हातकड्याच पडायच्या हातात. तो हिचा जिवलग मित्र. त्याच्या-बरोबर वेळी-अवेळी गावभर फिरते ही. लोक तिच्याबद्दल काय काय बोलतात ते ऐकाल– तर मान खाली जाईल तुमची.

देवदत्त मुक्ता, मी तुला किती वेळा सुचवलं होतं बरं, की एकदा तरी तू नंदूला समज द्यायला हवीस. हेमा, तूदेखील या घरात कोणी परकी राहिली नाहीस आता. तूदेखील तिला समजावून सांगायला हवंस.

हेमा माझ्या परीनं मी नेहमीच सांगत असतं. पण त्या मुळी सगळं चेष्टेवारीच घालवतात. अजून अल्लड आहेत त्या आणि–

राजीव कसली आलीय अल्लड ? पक्की बनेल व्हायला लागलीय ती. आणि याला कारण मम्मी,– प्रत्येक वेळी तू तिला पाठीशी घालतेस. शरमेची गोष्ट सांगतो, पपा, तुम्हाला. दिल्लीला मॅचसाठी म्हणून टीमबरोबर नंदू गेली. मॅचेस संपल्यावर टीमबरोबर हिनं परत येऊ नाही ! मागाहून ही एकटी त्या जयसिंहाबरोबर हॉटेलात राहिली. असल्या गोष्टीची गावभर बोंब झाल्याशिवाय राहील ?

देवदत्त मुक्ता, ही गोष्ट तुला ठाऊक होती ?
(मुक्ताबाईंची मान खाली आहे. त्या मुळीच वर पाहत नाहीत. फक्त मान किंचित हलवून 'होय' सुचवितात तशी– )

देवदत्त आणि तरीदेखील तू तिला काही बोलली नाहीस !
( मुक्ताबाई स्तब्ध राहतात, तशी– )

राजीव हा जयसिंह काय तिच्याशी लग्न करणार आहे ? तो करतो म्हणाला, तरी त्याचा बाप त्याला संमती देणार आहे ?

देवदत्त हे सगळे सवाल नंतरचे आहेत. नंदू त्याच्याबरोबर हॉटेलमध्ये राहिली हा अक्षम्य अपराध आहे; आणि मुक्ता, तू तिला पाठीशी घालतेस हा त्याहीपेक्षा अक्षम्य बेजबाबदारपणा आहे. तुझ्याकडून माझी ही अपेक्षा

नव्हती, मुक्ता.

राजीव — ममी, ममी– तुला झालंय तरी काय ? मिंध्यासारखं खाली मान घालून तू हे सगळं कशासाठी ऐकते आहेस ? तू मूग गिळून गप्प का बसली आहेस ? शुद्ध वर्तनाबद्दलचा तुझा कडवेपणा कुठं मावळला ? ' तोवर हेमानं राजूजवळ काय रखेली म्हणून राहायचं ? '— असं विचारणारी ती तूच ना ? ' घटस्फोट मिळायच्यापूर्वी या घरात मी राजूला कसलेही थेर करू द्यायची नाही '— म्हणून बजावणारीदेखील ती तूच ना ?

देवदत्त — मुक्ता, तुला कळायला हवं, नंदूचं आज ना उद्या लग्न व्हायचंय. तिला दुसऱ्याच्या घरी जाऊन नांदायचंय. ही गोष्ट घरटूकर्णी झाली तर तिला कोण पत्करील ?

राजीव — तुला बजावून ठेवतो ममी, नंदूच्या आयुष्याचा उद्या सत्यानाश झाला तर त्याला तू...तू जबाबदार ठरशील !

( मुक्ताबाई मान वर करतात तो घळाघळा अश्रू डोळ्यांवाटे ओघळताना दिसतात. शांतपणे पदराने डोळे पुसत त्या उठतात नि म्हणतात–)

मुक्ताबाई — पुरे आता. मी एकच सांगते– नंदूचं लग्न ठरलंय. फक्त मुहूर्त कधीचा ठरतो त्याची मी वाट बघतेय.

( एवढे बोलून हुंदका आवरीत आवेगाने मुक्ताबाई बाहेर जातात. देवदत्त, राजीव आणि हेमा स्तंभित होऊन पाहातच राहतात. त्याचवेळी अंधार— )

( प्रवेश पहिला संपला. )

## अंक दुसरा

### प्रवेश दुसरा

( काही दिवस उलटले आहेत. तोच हॉल. वेळ दुपारची. रंगमंच प्रकाशाने उजळल्यावर क्षणभरातच आतून नंदू हेमाला हाताला धरून जवळजवळ ओढतच घेऊन येते. नंदूच्या दुसऱ्या हातात व्हॅनिटी बॅग आहे. )

हेमा ( येता-येताच ) नंदूताई, मी म्हणते—

नंदू काही म्हणू नकोस. आधी बैस इथं. ( तिला बसवते. स्वतः बसत. बॅग उघडीत ) फार टाळाटाळ करायला लागली आहेस तू. आज मी तुझं काहीएक ऐकणार नाही. सगळे हिशेब तू नीट समजावून आपल्या ताब्यात घ्यायलाच हवेस.

हेमा पण आताच खोळंबा झालाय का त्यावाचून? तुम्ही इतका छान कारभार ठेवला आहेत पैशाचा की कोण्णाला काही बघावंसुद्धा लागत नाही.

नंदू वा ग वा. म्हणून मी काय जन्मभर या घरात पैशाचा कारभार करीत राहू वाटतं? दादाचं लग्न झालं नव्हतं तोवर ठीक होतं. सगळेजण आपआपले पैसे आणून माझ्या अंगावर टाकतात आणि कोणी मागायला आलं की माझ्याकडे बोट दाखवतात. मी बसल्येय आपली वाटप करीत आणि हिशेब लिहून काढीत. बँकेत मीच जायचं. विजेची, टेलिफोनची, गॅसची बिलं मीच जाऊन भरायची. भाजीपाला मीच आणायचा. वाण्याकडे फेरी मीच टाकायची. तुला सांगते, इन्कमटॅक्स ऑफिसकडून नोटिस आली की पपा, ममी हातपाय गळाठून बसतात. मलाच सगळी धावाधाव करावी लागते. आता हे सगळं तू करायचंस.

हेमा मी नाही कुठं म्हणते, पण—

नंदू पणबीण काही नाही. आता इकडे नीट लक्ष दे. ही डायरी. यात प्रत्येक महिन्याला कोणी कोणी, केव्हा, आणि किती पैसे दिले आणि घेतले—याच्या तारीखवार नोंदी ठेवायच्या. दवाखान्याचा हिशेब रोज रात्री हरिभाऊंच्याकडून न चुकता घ्यायचा. ते टंगळमंगळ करतात. उद्या देतो म्हणतात. आपण ऐकायचं नाही. दादाचा पगार झाला की तो पैशाचं पाकीट तस्सं आणून अंगावर टाकतो. पगार मोजूनदेखील घेत

नाही. एक दोन वेळा फटका बसल्यापासून पुष्कळ सुधारलाय तो. तरी पण पैसे आपण मोजून घ्यायचे. पपा दोनतीन दिवसांआड पैसे आणून देतात. ( हे ऐकतच वरून बाहेर कचेरीत जाण्याच्या तयारीने देवदत्त खाली येऊ लागतात. ते जिन्यातच थबकतात. नंदू आणि हेमा यांना ते अर्थातच दिसत नाहीत. ) पपांना पैसे कुठे ठेवायचे याचं बिलकुल भान राहात नाही. अग खिशात म्हणून चक्क कोटाच्या बाहीत नोटा सारतात. त्यांचे कपडे तपासून घ्यायचे. आणिक सांगते, एकेकदा पपा शंभर रुपये आणून देतात. मग म्हणतात,– हा आला– पंचवीस रुपये दे. तो आला– चाळीस दे. इकडे जायचंय– पंधरा दे. तिकडं जायचंय– तीस दे. तर अंदाज घेऊन त्यांना स्पष्ट सांगायचं की तुम्ही दिलेले पैसे संपले. ते ओरडतात, " सकाळी तर शंभर दिले, इतक्यात कसे संपले ! "— म्हणून गुरकावतात. आपण घाबरायचं नाही. सरळ ही डायरी नेऊन दाखवायची की,– की चुपचाप निघून जातात.
(देवदत्त प्रेक्षणीय मुद्रा करून खाली येतात. नंदू व हेमा यांचे त्यांच्याकडे लक्ष जाते. नंदू विचारते– ) काऽय !

देवदत्त काही नाही, चुपचाप जातो. बाहेर पक्षकार आलेत. ( बाहेर जातात. )

नंदू ( हसून ) पाहिलंस ? हूं. आता खर्चाचं सांगते. ( कागदांच्या पाकिटांचा जुडगा काढीत ) या प्रत्येक पाकिटावर खर्चाची बाब लिहिलीय आणि अंदाजानं रक्कम त्यात घालून ठेवलीय. गॅस संपला की गॅसचं पाकीट काढायचं ( काढून दाखवीत ). विजेचं बिल आलं की विजेच्या बिलाचं पाकीट उघडायचं. इतर पैशाला हात म्हणून लावायचा नाही. हे पाकीट इमर्जन्सीसाठी. यात थोडे थोडे पैसे टाकायचेच. यात हजारभर रुपये साठले होते म्हणून माझ्या ऑपरेशनच्या वेळी तारांबळ उडाली नाही, ठाऊक आहे ? ( हे ऐकतच मुक्ताबाई बाहेरून येतात. बहुधा सकाळचा दवाखाना संपवून. त्या क्षणमात्र थबकतात. कौतुकाने नंदूकडे बघतात. शेवटचे नंदूचे उद्गार ऐकताच धावत जाऊन तिला कुरवाळत तिचा मुका घेत— )

मुक्ताबाई कशी आहेस ग माझी बाबी, तू... !

नंदू अगदी ठणठणीत आहे तुझी बाबी. सगळी औषधं घेतली. डॉक्टर दुभाषीकाकांच्याबरोबर चेकअपसाठी हॉस्पिटलमध्ये जाऊन आले. येताना एल. आय. सी. मध्ये जाऊन विम्याचा हप्तादेखील भरून आले. मॉम्स, हे सगळं आता यापुढं हेमानं करायला हवं; होय की नाही ग ?
( मुक्ताबाई शून्यमनस्क झालेल्या ) पहा पहा... हरवली कुठं तरी.

मुक्ताबाई (दचकून) काय म्हणालीस ?

नंदू (हसून) काही नाही. आता प्रत्येक वेळी पेनल्टी वसूल करून सांगणार आहे तुला मी काय म्हणाले ते.

हेमा जेवून घेणार ना आपण ?

मुक्ताबाई वेडी की काय ? अग आज संकष्टी नाही का मला ?

नंदू खरंच मॉम्स, हे तू काय खूळ काढलं आहेस नवीन ?

मुक्ताबाई असू दे. माझं खूळ माझ्यापुरतं (आत जाऊ लागतात तशी)

नंदू मॉम्स—

मुक्ताबाई (थबकून) काय ग ?

नंदू (घुटमळत) क— काही नाही. (मुक्ताबाई न्याहाळतच राहतात; तशी) तू कपडे बदलून ये. मग सांगते तुला. थोडं बोलायचंय तुझ्याशी. (मुक्ताबाई पाहात पाहात आत जातात. मग नंदू हेमाकडे वळते आणि—) तर हे बिलाबद्दल झालं. वाणसामानाबद्दल एक सांगते. राघवजी माल चांगला देतो. पण वजनात जऽरा गडबड करतो. तर आपण यादी घेऊन जायचं आणि सगळ्या जिनसा समोर तोलूनमापून घ्यायच्या. पैसे रोख 'द्यायचे. ममीला उधारी ठेवलेली आवडत नाही.

हेमा खरंच नंदूताई, संसार तुम्ही अगदी दक्षतेनं कराल. नवऱ्याला घरात एवढं म्हणून काही बघायला नको.

नंदू पुरे पुरे. मला हरभऱ्याच्या झाडावर नको चढवूस. ही पासबुकं हे ममीचं; हे पपांचं आणि हे दादाचं. प्रत्येकाच्या अकौंटमध्ये, त्याच्या त्याच्या खर्चातून उरलेले पैसे जमा करायचे. दादाचं पासबुक पहा जरा. त्याच्या नावे मी वर्षभरात किती पैसे टाकलेत ते दाखव एकदा त्याला. एखादी साडी घेतली तरी एवढे डोळे गुरकावतो माझ्यावर, पण—

हेमा तसं म्हणू नका नंदूताई. त्यांची तुमच्यावर माया कमी का आहे? पैसे शिल्लक राहिले तर तुमच्याच लग्नाला उपयोगी—

नंदू ते नको सांगूस. माझ्या लग्नाला एक पैचा खर्च येणार नाही. या घरातली एक वस्तू की अंगावरला एक जिन्नस मी घेऊन जाणार नाही. अगदी हिऱ्याच्या या इयररिंग्जदेखील जाताना तुलाच देऊन जाणार आहे मी.

हेमा लग्न ठरवून तर टाकलंत नाही तुम्ही ?

नंदू ठरलं तर कळेलच की तुला. घे हे सगळं ताब्यात. (सगळी पाकिटे, डायरी वगैरे बॅगमध्ये घालून ती देत—) हेमा, दादा माझ्यावर

रागावलाय का ग? (हेमा स्तब्ध राहते, तशी) पूर्वीसारखा तो माझ्याशी सरळ बोलतसुद्धा नाही. असं का ग?

हेमा तुम्ही विचारलंतच म्हणून सांगते. तुम्ही दिल्लीला एकट्या मागाहून राहिलात ना ते त्यांना आवडलं नाही.

नंदू तुला कोणी सांगितलं?

हेमा यांनीच.

नंदू मग दादानं सरळ मला का नाही विचारलं?

हेमा मम्मीनं त्यांना या बाबतीत तुमच्याशी बोलायचं नाही म्हणून बजावलं होतं. (नंदू विचारमग्न होते. हेमा बॅग उचलून वर निघून जाते. क्षणमात्र नंदू एकटीच आहे. तितक्यात नॅपकिननं तोंड टिपत घरगुती वेषात मुक्ताबाई येतात. नंदूची खिन्न, विचारमग्न मुद्रा पाहून एकदम कळवळून धावतात, आणि तिला जवळ ओढत— )

मुक्ताबाई का ग अशी एकदम खिन्न, उदास झालीस?

नंदू (हसून) काही नाही.

मुक्ताबाई (काळजीने) खरं सांग... माझ्या गळ्याची शपथ आहे तुला... कशी आहेस तू?

नंदू छान आहे की. (थबकून पाहात) खरंऽऽच! अगदी ठणठणीत आहे मी. हे ग काय तुझं सारखं विचारणं?

मुक्ताबाई (मुका घेत) वाईट चेहरा करून बसली होतीस म्हणून विचारलं.

नंदू (आईला हातात धरून उठवीत दुसऱ्या जागी बसवत) तू अशी इकडे माझ्यासमोर बैस, आणि विचारते त्याचं खरंखुरं उत्तर दे. खरं उत्तर देशील?

मुक्ताबाई (चकाकून, कातर स्वरात) क... काय विचारणार आहेस तू?

नंदू दिल्लीला मागाहून मी एकटी जयबरोबर एक दिवस राहिले होते हे ठाऊक होतं तुला?

(मुक्ताबाई सुटकेचा निःश्वास टाकीत मानेनेच होय म्हणतात, तशी– )

नंदू तुला कधी समजलं?

मुक्ताबाई तू परत आलीस त्याच वेळी.

नंदू मग तू मला विचारलं कसं नाहीस त्याबद्दल?

मुक्ताबाई विचारण्यासारखं मला त्यात काही वाटलं नाही.

नंदू (उसळून) विचारण्यासारखं वाटलं नाही! मॉम्स, तू काय बोलतेस हे? मी— तुझी मुलगी, जयसारख्या एका तरुणाबरोबर, एकटी हॉटेलमध्ये एक दिवस राहिले, यात तुला काहीसुद्धा वाईट दिसलं नाही

हे मी चांगलं केलं असं का तुला म्हणायचंय ?

मुक्ताबाई (शून्यमनस्क होत) चांगलं आणि वाईट...

नंदू मी तुझ्या जागी असते तर काय केलं असतं आहे ठाऊक ? दोन मुस्काटात दिल्या असत्या ठेवून, अन् जाब विचारला असता. तू का नाही मला जाब विचारलास ? सांग ना ?

(मुक्ताबाई गहिवरतात. उठून नंदूकडे धावतात. तिला पोटाशी घेतात. क्षणार्धाने नंदू दूर होत, आईचे डोळे टिपत प्रेमळपणे म्हणते—) मॉम्स, तू सांगितलं नाहीस तरी मला कळलं. माझ्या हातून काहीही वाईट घडणार नाही अशी तुला खात्री होती, होय ना ? मग तसं म्हण की. (थबकून) ममी, खरंच मी मर्यादा सोडून वागले नाही. माझ्यावर विश्वास ठेवशील ?

मुक्ताबाई (तिला जवळ घेत) असं का विचारतेस ? माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे ग, बाबी

नंदू (सोडवून घेत) काय झालं ते मी तुला सांगते. जयनं मला मागणी घातली. लोक त्याच्याबद्दल काय बोलतात ते तुला ठाऊकच आहे. सगळ्या प्रकरणांचा खुलासा त्यानं मला दिला होता. तरीसुद्धा मला त्याची परीक्षा पाहायची होती. म्हणून मुद्दामच मी एक दिवस मागाहून एकटी त्याच्याबरोबर थांबायचं ठरवलं. पण ममी, त्यानं एवढासुद्धा गैरफायदा घेतला नाही की माझ्याशी अतिप्रसंग केला नाही.

मुक्ताबाई मग ? विचार काय आहे तुझा ?

नंदू तुझी संमती असली तर मी त्याला हो म्हणायचं ठरवलंय.

मुक्ताबाई आणि पपांची संमती नको ?

नंदू पपांशी बोललेय मी. त्यांनी सगळं तुझ्यावर सोपवलंय. (क्षणार्ध-स्तब्धता) बोल ना ?

मुक्ताबाई (भानावर येत, कातर स्वरात) म्हणजे तू लग्न करायचं म्हणतेस ?

नंदू इश्य–म्हणजे काऽय ? तू तर ग्रेटच आहेस. मग कशाला हो म्हणायचं ?

मुक्ताबाई (अडखळत) पण... म्हणजे... मला वाटतं एकदा तुझी प्री-प्रोफेश-नलची परीक्षा संपू दे, मग—

नंदू परीक्षा काय, पुढच्या टर्मच्या शेवटी संपणारच आहे. लग्न झालं तरी माझं शिक्षण काही थांबणार नाही, ममी.

मुक्ताबाई तोही एम. कॉम. व्हायला हवा, म्हणजेऽऽ

नंदू उज्जेड. तो कसला एम. कॉम होतोय ! स्पोर्ट्ससाठी म्हणून कॉलेजमध्ये

नाव घातलं होतं त्यानं. वडिलांनी त्याला आता धंद्याकडे लक्ष द्यायला सांगितलंय.

मुक्ताबाई त्याच्या घरातल्या माणसांचा काय विचार आहे त्याचा अंदाज घ्यायला हवा एकदा.

नंदू त्याच्या घरात आधीच बोलणी झाली आहेत. त्याच्या आई-वडिलांची मुळीच आडकाठी नाही. मात्र ते आता फार दिवस थांबायला तयार नाहीत.

मुक्ताबाई तरीदेखील...म्हणजे मला वाटतं...नंदू, तू माझं ऐकणार असलीस तर थोडं थांब. इतक्यात काही ठरवू नकोस. जरा विचार करायला हवा.

नंदू माझी निवड तुला पसंत नाही का, ममी ?

मुक्ताबाई तसं नाही ग. तुला तो आवडला म्हणजे आम्हाला आवडल्यासारखाच आहे. पण... पण... तरीदेखील थोडी थांबलीस तर—

नंदू पण का ?

मुक्ताबाई फार नाही ग. हे एक वर्ष जाऊ दे.

नंदू पण कशासाठी ? वर्षानं काय मोठासा चमत्कार घडणार आहे ?

मुक्ताबाई (तिला जवळ घेत) मला या घरात तू अजून राहावीस असं वाटतं, म्हणून बरं बाई.

नंदू (फुरंगटून) हे काही खरं नाही, मॉम्स. तुला अजून त्याच्याबद्दल विश्वास वाटत नाही,- होय ना ?

मुक्ताबाई तसं नाही ग—

नंदू काय केलं म्हणजे तुला खात्री वाटेल ? त्याला आणून तुझ्यापुढं उभा करू ? तू बोलतेस त्याच्याशी ? तो खरंच चांगला आहे ग, ममी फार फार चांगला आहे.

मुक्ताबाई मी त्याला कुठं वाईट म्हणते आहे ? फक्त थोडे दिवस जाऊ देत—

नंदू (उसळून उठत) पण का ? काही तरी पटेलसं कारण सांगशील की नाही ? (मुक्ताबाई स्तब्ध राहतात. काय बोलावे त्यांना कळत नाही.) मी केवढ्या खात्रीनं तुझ्याकडे आले होते, ममी. पण तू—

मुक्ताबाई (कळवळून) असं ग का म्हणतेस ? मी तुला नाही म्हटलंय का ? (हे ऐकतच देवदत्त ऑफिसमधून फाइली घेऊन परत येतात. थबकतात.)

नंदू (डोळे भरून येत–) म्हणायला कशाला हवं ? इतके आढेवेढे घेतलेस त्यावरून तुझ्या मनात काय आहे एवढं मला ओळखता येत नाही ?

देवदत्त (धावून नंदूला जवळ घेत) नंदू बेटी, तू आता वर जा. मी तुझ्या आईशी बोलतो. सगळं काही ठीक होईल बरं.

(नंदू डोळे पुसत आवेगाने वर निघून जाते. क्षणार्ध शांतता. मग–)

देवदत्त मुक्ता, बाबूराव पाटलांची माझी भेट झाली. त्यांचं–माझं बोलणं झालं. इतर ठिकांणाहूनदेखील मी बारीक चौकशी केली. तसा हा जयसिंह काही वाईट मुलगा नाही. नंदूनं त्याची निवड केली आहे. आता वेळीच त्यांचं लग्न लावून देण्यात शहाणपणा आहे असं मला वाटतं.

मुक्ताबाई त्यांच्या लग्नाला माझा मुळीच विरोध नाही. फक्त एखादं वर्ष थांबावं एवढंच मला वाटतं.

देवदत्त पण कशासाठी? (मुक्ताबाई बोलू शकत नाहीत) आश्चर्य आहे! लग्न ठरल्यावर खरं म्हणजे घाई मुलीच्या आईची असते; तर तूच—

मुक्ताबाई (अजीजीनं) फार नाही हो, मी फक्त वर्षाचा अवधी मागतेय.

देवदत्त पण कशासाठी? (मुक्ताबाई गप्प राहतात, तशी) मुक्ता, तुला झालंय तरी काय? तुझ्या मनात काय आहे? जे नंदूनं करू नये ते केलं, त्या वेळी तोंड उघडायलादेखील तू आम्हाला बंदी केलीस; केवळ नंदूला दुखवायचं नाही म्हणून. आता जे केल्यानं आमची इभ्रत बचावणार आहे– एवढंच नव्हे, तर नंदूलादेखील फार मोठं सुख होणार आहे, त्याला तू अडथळा आणतेस; तेव्हा तुला काय म्हणावं? नंदूला दुःखीच करायचा तू निश्चय केला आहेस का? नंदूचा नाशच तुला हवाय का?

मुक्ताबाई (हे ऐकून घळघळा रडत) तुम्ही– तुम्ही तरी असं कसं बोलता हो? नंदूला दुःखी करून मी कधी तरी सुखी होईन? तिचा नाश झाला तर मी दोन पायांवर धड उभी तरी राहू शकेन का हो?

(मटकन बसून तळव्याने तोंड झाकून रडू लागते. देवदत्त स्तंभित होतात. तेवढ्यात बाहेर बोलण्याचा गलबला. राजीव गडबडीने हेमा... हेमा...अशी हाक मारीत आत येतो...आणि)

राजीव पपा, ममी– आमच्या कॉलेजचे प्रिन्सिपॉल आणि सोसायटीचे अध्यक्ष तुम्हाला भेटायसाठी आले आहेत. मला लाइफ मेंबर करून घ्यायचं ठरवलंय त्यांनी. (परत दाराशी धावत बाहेर जाऊन... "या या...पपा आणि ममी घरीच आहेत." असे हसतमुखाने स्वागत करतो. देवदत्त क्षणमात्र गांगरतात. पण क्षणार्धात डोळे पुसून मुक्ताबाई उभ्या राहतात. आणि–"इश्श, असं काय ते! पाहुणे आलेत. त्यांचं स्वागत करायचं नाही का?" असे म्हणत हसतमुखाने बाहेर धावतात. देवदत्तही

लगबगीने बाहेर धावतात. बाहेर कोणी तरी पाहुण्यांपैकी– "तुमची बाग मोठी छान फुललीय हो! गुलाब कसा मस्त डवरलाय, पाहिलात ना, अण्णासाहेब!" त्यावर राजीव म्हणतो– "हा सगळा माझ्या धाकट्या बहिणीचा उद्योग. तिला बागकामाची फार फार आवड आहे. हे माझे वडील, आणि ही माझी आई...!"
(दाराबाहेर ओळखीचा उपचार होत असतानाच– अंधार)

(प्रवेश दुसरा संपला)

## अंक दुसरा

### प्रवेश तिसरा

( काही दिवसानंतरची एक सायंकाळ. तोच हॉल. बाहेरून आत येण्याचा दरवाजा बंद आहे. या घटकेला हॉलमध्ये कोणीही नाही. रंगमंच प्रकाशाने उजळल्यावर क्षणार्धातच दारावरली घंटा वाजते. आतमध्ये मुक्ताबाई सांगतात– " हेमा, कोण आलंय बाहेर ते बघ ग." हेमा– " बघते." असं उत्तर देत लगबगीने बाहेर येते. स्वयंपाकघरात काम करता करता आल्यासारखी वेषभूषा. गडबडीने दार उघडते तो दारात प्रक्षुब्ध मुद्रेने जयसिंह उभा दिसतो. तशी– )

हेमा ( विस्मयानं ) त...तुम्ही होय ? मला वाटलं...( हसते. ) या. नंदूताई डोकं दुखतंय म्हणून दुपारीच कॉलेजमधून परत आल्या. वर झोपल्या आहेत. ( जिन्याकडे जात ) मी त्यांना उठवते आणि—

जयसिंह ( दारातून गडबडीने ) नको, नको. तिला उठवायची काही गरज नाही. मीऽऽ— मम्मींना भेटायला आलोय.

हेमा ( थबकून, वळून, विस्मयाने ) मम्मींना ?

जयसिंह होय. त्यांनीच मला निरोप धाडला होता– हरिभाऊंच्याबरोबर.

हेमा असं होय ? मला ठाऊक नव्हतं. पण तुम्ही बाहेर उभे का ? आत या ना ! ( जयसिंह दबकत आत येतो. ) बसा. ( जयसिंह अनमान करीत बसतो. तेवढ्यात मुक्ताबाई आतून विचारतात– " कोण ग आलंय हेमा ? " तशी हेमा दारापाशी जात– ) जयसिंहराव. तुम्हाला भेटायसाठी. ( आतून मुक्ताबाई– " येतेच आहे मी. त्यांना बसायला सांग." )

हेमा तुमचं अभिनंदन बरं का !

जयसिंह ( गडबडून ) क...कशाबद्दल ?

हेमा ( प्रसन्न स्मित करीत ) वाऽ ! कशाबद्दल म्हणून काय विचारता ? तुमचा दिल्लीचा विक्रम समजलाय आम्हाला.

जयसिंह ( ताड्कन उठत ) दिल्लीचा विक्रम ? माझाऽऽ ?

हेमा तुम्ही मॅचमध्ये ट्रिपल क्राउन मिळवलात, नव्हे का ?

जयसिंह ( बसत निःश्वास टाकीत ) हं हं...ट्रिपल क्राउन... ( मंद हसतो. )

हेमा तुम्हाला काय वाटलं ?

जयसिंह क...काही नाही. थँक्स. नंदूला काय झालंय ? डोकं कशानं दुखतंय तिचं ?

हेमा काही विशेष नाही. काल मंगळागौर होती. खूप बायकामुली जमल्या होत्या. रात्रभर जागरण झालं म्हणून—

( तेवढ्यात मुक्ताबाई येतात आणि– )

मुक्ताबाई ( हेमाला ) शेगडीवर उडदमेथी ठेवलीय तिकडे लक्ष दे ग जरा. तिखट-मीठ-मसाला सगळं घातलंय मी. फक्त एक उकळी फुटली की–

हेमा इश्श, तुम्ही कशाला केलंत ? मी करतच होते सगळं ( आत जाते. )

मुक्ताबाई ( मागोमाग दारापर्यंत जात ) तू करशीलच ग. पण या ठकूताईला रुचायला हव ना ? तिला एवढं म्हणून काही कमी-जास्त खपत नाही. ( जयसिंहकडे वळत ) तुम्हाला इकडे येण्याची मी तसदी दिली याबद्दल–

जयसिंह छे छे ! त्यात तसदी कसली ? तुम्ही बोलावलं नसतं तरी मी तुम्हाला भेटायला येणारच होतो.

मुक्ताबाई नंदूनं मला सगळं सांगितलंय.

जयसिंह ( गांगरून ) दिल्लीला आम्ही राहिलो होतो त्याबद्दल ?

मुक्ताबाई ते तर झालंच, पण—( थबकते. )

जयसिंह लग्नाबद्दल ?

मुक्ताबाई हो. काही गोष्टी थोड्या स्पष्टपणानं बोलायच्या मी ठरवल्या आहेत.

जयसिंह ( चाचरत ) म...माझ्याबद्दल ?

मुक्ताबाई ( शून्यमनस्कतेतून भानावर येत ) अं ?

जयसिंह माझ्याबद्दल तुमचा गैरसमज झालाय, ममी. माझ्याबद्दल तुमच्या कानावर आलेल्या एकूण एक गोष्टी खोट्या आहेत. नंदूला मी सगळं–

मुक्ताबाई छे छे, त्याबद्दल मी बोलत नाही. मी प्रत्यक्ष अनुभवावरून एखाद्या माणसाबद्दल बरं-वाईट मत बनविते. अफवांना मी किंमत देत नाही. पण मला जे सांगायचं आहे—( थबकते. )

जयसिंह तसं नाही, ममी. पूर्वी वडील भावाच्या नादानं मी थोडा उनाडपणा केलाय, नाही असं मी म्हणू शकणार नाही. पण नंदू माझ्या आयुष्यात आल्यापासून—

मुक्ताबाई ते ठीक आहे. तुम्ही कसे आहात किंवा होता ते जाणून घेण्याची आज तरी मला गरज नाही. नंदूचा तुमच्यावर एवढा जीव आहे म्हणजे एरवीदेखील तुम्ही असाल तसे पत्करणं आम्हाला भागच होतं. पण— ( थबकते. )

जयसिंह असं म्हणू नका, ममी. मला नुसती नंदू हवी आहे असं नाही. तिची जिवाभावाची सगळी माणसं देखील हवी आहेत. मला आपलं असं घर हवंय, ममी.

मुक्ताबाई तुमची भावना मला कळत नाही असं समजू नका. पण या घडीला तर हा सगळा वेडेपणा थांबला पाहिजे.

जयसिंह ( धक्का बसून ) वेडेपणा ? तुम्ही हा–हा फक्त वेडेपणाच मानता ?

मुक्ताबाई ( शून्यमनस्क होत ) वेडेपणा...निव्वळ वेडेपणा...

जयसिंह ममी, तुम्ही काय बोलताहात ते मला समजलं नाही.

मुक्ताबाई ( भानावर येत ) ऊं ? काय म्हणालात ?

जयसिंह आम्ही काय वेड्यासारखं वागलो ? नाही, वागण्यात थोडं-फार चुकलं असेल, पण-—

मुक्ताबाई तसं नाही, जयसिंह. ( अगतिक होत ) कसं सांगू म्हणजे तुम्हाला समजेल ? सगळं कठीण आहे. तरी देखील सांगते. प्रयत्न करून बघते. तुम्ही म्हणता, हे घर मला आवडलंय,– मी इथंच राहणार; आणि मी तुम्हाला सांगते आहे, या घराचं छप्पर केव्हा कोसळेल त्याचा नेम नाही. तर तुम्ही काय कराल ?

जयसिंह ( थक्क होऊन पाहात ) ममी, तुम्ही काय बोलताहात ते—

मुक्ताबाई ( करुण हसत ) कळलं नाही; होय ना ? फिरून प्रयत्न करून बघते. तुम्ही म्हणता, या जहाजातून मी समुद्रपर्यटणाला जाणार आहे, आणि मी तुम्हाला सांगते आहे– जहाजाचा तळच फुटला आहे. तर तुम्ही काय कराल ? ( खळखळून हसत ) नाही समजलं, होय ना ? ( टचकन डोळे पाणावत) मला सांगायला एक इतकं अवघड होतंय, पण समजून घ्यायलादेखील इतकं कटीण आहे का हो हे ? ( तेवढ्यात बाहेरून डॉक्टर दुभाषी येतात, तशी मुक्ताबाई डोळे टिपीत उठतात. आणि हसून म्हणतात–) कसे देवासारखे वेळेवर धावून आलात, डॉक्टर !

डॉ. दुभाषी ( विस्मयाने ) का ? काय झालं ?

मुक्ताबाई झालं काही नाही. जयसिंह आणि नंदू या दोघांनी लग्न करायचं ठरवलंय. त्याच्या आणि तिच्या घरातील सगळ्यांची संमती आहे. हे लग्न लवकरात लवकर उरकून टाकण्याची सगळ्यांनाच घाई झालीय. मीच तेवढी सगळ्यांच्या इच्छेआड येते आहे. मला घराची इभ्रत कळत नाही. मुलीचं हिताहित समजत नाही. प्रेमिकांचं मन उमगत नाही. मी आंधळी, बहिरी आणिक मुकी झालेय. कारण डॉक्टर, मला मुळी बोलताच येत नाही. ( हुंदका देत तळव्यांनी तोंड झाकून घेत मटकन बसतात. )

डॉ. दुभाषी नो नो, मुक्ताबाई, धिस वोण्ट डू. तुम्हाला शोभत नाही. तुमचा तोल सुटत चाललाय. आधी आत जा...

मुक्ताबाई पण, डॉक्टर—

डॉ. दुभाषी आत– आधी आत जा. जयसिंहाशी जे काय बोलायचंय ते मी बोलणार आहे. तुम्ही प्रथम स्वतःला सांभाळा. जा- जा म्हणतो ना? (मुक्ताबाई निमूटपणे आत जातात. डॉक्टर जयसिंहकडे पाहून स्मित करतात. खिसे चाचपतात, सिगरेट पेटीसाठी. सिगरेट काही सापडत नाही. तशी जयसिंहपुढे हात पसरीत–) काढ.

जयसिंह (बावचळून उठत) क...काय?

डॉ. दुभाषी सिगरेटची पेटी.

जयसिंह (गडबडून) म...म...मी...

डॉ. दुभाषी म...म...मी काय? मला ठाऊक आहे तू सिगारेट ओढतोस ते. काढ काढ लवकर... नाहीतर झडती घेईन.

(जयसिंह लाजत, भीत खिशातून सिगरेटची पेटी काढून देतो. डॉक्टर दुभाषी सिगरेट काढून तोंडात ठेवीत 'लाइट' असे फर्मावतात. जयसिंह लायटर काढून त्यांची सिगरेट शिलगावतो. एक झुरका घेऊन पाकिट परत करीत डॉक्टर दुभाषी विचारतात—) दिवसातून किती पाकिटं लागतात?

जयसिंह क.. काही फार नाही... फक्त एक...

डॉ. दुभाषी (ओरडून) आख्खं पाकीट ओढतोस? गाढवा ऽ ऽ सांगायला शरम नाही वाटत? धूम्रपानामुळं घशाचे आणि फुप्फुसाचे विकार जडतात हे ठाऊक नाही तुला?

जयसिंह (हबकून) हो... हो. ठाऊक आहे. आजपासून सोडतो.

डॉ. दुभाषी (एकदम सौम्य स्वरात) सोडू नकोस. कमी ओढ. (ओरडून) का ऽ य?

जयसिंह (हबकून) हो... हो... हो... कमी ओढतो. एकदम कमी करून टाकतो.

डॉ. दुभाषी दॅट्स गुड...आता वाटल्यास ओढ. ओढ ना!

जयसिंह नको नको...

डॉ. दुभाषी दॅट्स बेटर. ओढतो म्हणाला असतास तर टाळकं सडकलं असतं तुझं.

जयसिंह त्याची कल्पना होती मला.

(डॉ. दुभाषी धूर सोडीत हसतात. मग जयसिंहही प्रसन्नपणे गालात हसतो.)

डॉ. दुभाषी जयसिंह, तू फार लुच्चा झाला आहेस.

जयसिंह (कावराबावरा होत) क... काय झालं?

डॉ. दुभाषी — शहाजोगपणे एका सभ्य गृहस्थाच्या घरावर दरवडा घालून वर मलाच विचारतोस काय झालं म्हणून ? ( डोळे मिचकावीत ) खरं सांग, या पोरीला तू कधी गटवलीस ?

जयसिंह — ( तोंड वेडेवाकडे करीत ) गटवलीस ? छी छी ! काय हे शब्द ?

डॉ. दुभाषी — तेच रे.ऽ ऽ तेच तुमचं प्रेमबीम काय ते. नाही, तशी तुझी चाल मी पहिल्यापासून ओळखून होतो. पण ही कडकलक्ष्मी तुला सहजासहजी दाद देईल असं मला तरी बोवा वाटलं नव्हतं.

जयसिंह — सहजासहजी ? अहो पाऽर तळून, भाजून, शिजवून काढून मगच तिनं मला होकार दिला. तोही अजून पक्का नाही; तात्पुरता.

डॉ. दुभाषी — तात्पुरता म्हणजे ?

जयसिंह — म्हणजे पपा ‘ हो ’ म्हणाले, आणि ममी ‘ नाही ’ म्हणाली नाही, आणि माझ्या घरातल्या लोकांचा विरोध नसला तर—! डॉक्टर, हे जर—तरचे पर्वत ओलांडता ओलांडता, संन्यास घेऊन मोकळं व्हावं असं वाटायला लागलंय मला.

डॉ. दुभाषी — इतका जीव जडलाय तुझा तिच्यावर ?

जयसिंह — आमच्या घरात मी कोणकोणत्या वादळांना तोंड दिलंय ते काय तुमच्यापर्यंत आलं नाही ? माझी खात्री आहे डॉक्टर, तुम्हाला सगळं सगळं ठाऊक आहे.

डॉ. दुभाषी — येस येस...बेटा, मला सगळं सगळं ठाऊक आहे. पण तू किती खोल पाण्यात बुडाला आहेस त्याचा मला अंदाज लागत नव्हता. शिवाय इतक्या लवकर लग्नाचा घाट तुम्ही घालाल अशी मला कल्पना नव्हती.

जयसिंह — माझ्या आई-वडिलांचा आग्रह आहे तो. पण डॉक्टर, ममींचा हट्टच असेल तर, नंदूसाठी एक वर्षच का मी उभं आयुष्यदेखील—

डॉ. दुभाषी — सिली, त्यात काही अर्थ नाही. जयसिंह, ( थबकून सिगरेट विझवीत ) तुला भ्रमात ठेवणं मला योग्य वाटत नाही. नंदूशी तुझं लग्न होणं शक्य नाही.

जयसिंह — ( व्यथित होत ) का ? ममींचा एवढा कडवा विरोध आहे ?

डॉ दुभाषी — यू बिग फूल, विरोध ममींचा नाही, तुझ्या नि तिच्या दुर्भाग्याचा आहे. (क्षणमात्र जयसिंह बघतच राहतो. डॉक्टर येरझारा घालतात.)

जयसिंह — म... म्हणजे ? मी समजलो नाही, डॉक्टर.

डॉ. दुभाषी — सांगतो, ऐक. ( चाहूल घेत ) मला फार बोलता येणार नाही. प्रश्न विचारलेले मला चालणार नाहीत. ( थबकून ) नंदू फार थोड्या दिवसांची सोबती आहे. ( थबकून ) फार तर वर्ष-सहा महिने

जयसिंह (धक्का बसून) क... काऽय ?

डॉ. दुभाषी (मानेने होय म्हणतात. क्षणार्ध थबकतात आणि हलकेच) कॅन्सर.

जयसिंह म्हणजे... मागं जे ऑपरेशन झालं तिचं...

डॉ. दुभाषी त्या वेळी प्रायमरीज आढळून आल्या. टयूमर काढून टाकता येईना म्हणून डीप एक्स-रे ट्रीटमेंट द्यावी लागली, त्याच वेळी तिला मूल होण्याची शक्यता संपली आता सेकंडरीज कुठं केव्हा डेव्हलप होतील त्याचा नेम नाही. तेव्हा लग्नाचा प्रश्नच संभवत नाही. अँड नाऊ कीप युवर माऊथ शट. तोंडाला कुलूप घालायचं. कधीही, कुठंही बोलायचं नाही. (जयसिंह वज्राघात झाल्यासारखा थिजून बसून राहतो; तशी)— नो नो— कीप अप युवर स्पिरिटस. सिगरेट काढ एक. (जयसिंह यांत्रिकपणे पाकीट काढून देतो. लाइटरही देतो. डॉक्टर .सिगरेट शिलगावतात. जयसिंहचे डोळे भरून येतात, तशी— ) ऊं हुंः, जयसिंह, पुरुषासारखा पुरुष आहेस तू. नंदूच्या आईचा विचार कर. केवढ्या धीराची बाई आहे ती. ब्रह्मांड सोसते आहे. कोणी यायच्या आत डोळे पूस. मुद्रा हसरी ठेव. (आणि त्याच वेळी नंदूच्या खळखळून हसण्याचा आणि "ममी... ममी... ए मॉम्स..." अशी हाक मारण्याचा आवाज ऐकू येतो. जयसिंह आणि डॉक्टर विस्मयाने जिन्याकडे वर पाहू लागतात. "काय ग झालं नंदू ?" असे उद्गारत मुक्ताबाई बाहेर धावतात. नंदू जिन्यातून हसत हसत... अग मजा... हाऊ फनी...." असं म्हणत खाली येते आणि आईला बिलगते, तशी—)

मुक्ताबाई हो हो... अग झालं काय तुला एवढं हसू लोटायला ? डोकं दुखायचं थांबलं का ?

नंदू (हसत हसत) ते दुखतंच आहे. दुखू दे ग. पण झोपेतून उठल्यापासून मला एकाच्या जागी दोन दोन दिसताहेत.

मुक्ताबाई (थरकाप होत) एकाच्या जागी दोन . ?

नंदू बघ ना ! (खुदूखुदू हसत) दोन दोन ममी... दोन दोन डॉक्टर... दोन दोन जय... (दरवाजापासल्या आरशाकडे जाऊन पाहात) दोन दोन नंदू... (खदखदून हसत बाहेर व्हरांड्यात जाते. जयसिंह पाठोपाठ धावतो. त्याला बाहेर काहीतरी दाखवत नंदू हसतच राहते. प्रेक्षकाकडे तिची पाठ आहे. आतमध्ये मुक्ताबाई थरथर कापत गंभीर मुद्रेने पाठमोऱ्या नंदूकडे पाहात राहणाऱ्या डॉक्टरांना हलकेच म्हणतात—)

मुक्ताबाई ही सेकंडरीची सुरुवात तर नसेल ? (डोळयाला पदर लावतात)

डॉ. दुभाषी (बाहेर जाऊ लागतात) शंकाकुशंका काढायची ही वेळ नाही. मुक्ताबाई, आता तुमच्या कसोटीची खरी वेळ आहे. नंदू बेटी... मला तुझे डोळे पाहू दे जरा...

नंदू (हसत हसत) हाउ फनी... मज्जाच मज्जा... अहो रस्त्यावरून धावणाऱ्या गाड्यादेखील मला दोन दोन दिसताहेत...!

(बाहेर नंदू खळखळून हसते आहे. डॉक्टर दुभाषी आणि जयसिंह तिच्याशी बोलत उभे आहेत. आत मुक्ताबाई कष्टाने घळाघळा ओघळणारे अश्रू पुसताहेत, आणि त्याच वेळी— पडदा)

(अंक दुसरा संपला.)

## अंक तिसरा

### प्रवेश पहिला

[ काही दिवसानंतरची सायंकाळ. तोच हॉल. पडदा वर जातो त्या वेळी हेमा नटून थटून कुठे बाहेर जाण्यासाठी तयार होऊन ट्रान्झिस्टर लावून बसली आहे. अस्वस्थपणे वाट पाहात— अर्थातच राजीवची. मधूनच घड्याळात पाहते, तर मधूनच बाहेर व्हरांड्यात जाऊन शोध घेऊन येते. तर कधी दाराजवळच्या आरशात डोकावते. मग हताशपणे बसून ट्रान्झिस्टर उचलून स्टेशने बदलून पाहते. तेवढ्यात बाहेरून संथ पावलाने राजीव येतो. सुटाबुटात. पण व्यथित आणि विचारमग्न मुद्रेने. त्याची चाहूल लागताच ट्रान्झिस्टर बंद करून उठत नि पुढे होत ]

हेमा  इश्श ऽऽ हे हो काऽय ? किती वेळची मी वाट पाहात होते. लागलीच निघायचं ना ? कीऽऽ—

राजीव  ( बसत, सिगरेट काढून पेटवीत ) थोडा अवकाश आहे.

हेमा  समारंभ संपला ?

राजीव  हो.

हेमा  आणिक पेपर-रीडिंगचा कार्यक्रम ?

राजीव  ( घड्याळात पाहात ) तोही संपत आला असेल.

हेमा  ( विस्मयाने ) म्हणजे ? तुम्ही शेवटपर्यंत थांबला नाहीत ?

राजीव  तशी काही आवश्यकता नव्हती. प्रिन्सिपॉल म्हणाले, तुम्ही गेलात तरी चालेल.

हेमा  ( बुचकळ्यात पडून ) म्हणजे ? ( थबकून ) तुमचा चेहरा असा का झालाय ? तुम्हाला बरं वाटत नाही का ?

राजीव  छे छे— मी ठीक आहे. अगदी उत्तम आहे. नंदू कुठाय ?

हेमा  पपा त्यांना घेऊन जरा फेरफटका मारायला गेलेत.

राजीव  चालत ?

हेमा  इश्शऽऽ ! भलतंच काय ? रस्त्यातून चालत जाण्याइतपत नंदूताईंची दृष्टी सुधारली तरी आहे का ? पपा गाडीतून घेऊन गेलेत त्यांना.

राजीव  हूंऽऽ ! ( क्षणार्धाने झुरका घेऊन धूर सोडीत ) हेमा, दवाखान्यात तू खूप वर्षं नर्स म्हणून काम केलं आहेस. तुला थोडा तरी अंदाज आला असला पाहिजे. नंदूच्या डोळ्याला काय झालंय ?

हेमा इश्श. एवढंच ना? अहो, कधी कधी नर्व्हजवर टेन्शन आलं ना, म्हणजे —म्हणजे डॉ. देसाई म्हणत होते की—

राजीव ते मला ठाऊक आहे. पण तुझा काय तर्क आहे?

हेमा (गडबडून) माझाऽऽ? छे बाई... मी काहीच तर्क केला नाही. म्हणजे ममी असताना मला तशीऽऽ (थबकत) का? तुम्हाला काही समजलंय?

राजीव छे, काही नाही. तू एक काम कर. दवाखान्यात जाऊन ममीला तावडतोब पाठवून दे. मला थोडं बोलायचंय तिच्याशी.

हेमा (विस्मयाने) ममींना? तावडतोब? (थबकून) दवाखान्यात पेशंट्सची फार गर्दी आहे. ममींची मनःस्थितीदेखील बरी नाही. मला वाटतं, पुन्हा केव्हातरी—

राजीव (आवेगाने) प्लीज... हेमा... या वेळी तरी तू माझ्याशी हुज्जत घालू नकोस. फक्त ममीला पाठवून दे.

हेमा पाठवून देऊ? मी येऊ नको?

राजीव नको. (हेमाची मुद्रा पाहात) हेमा, तुला ठाऊक आहे, मी तुझ्यापासून काहीही लपवून ठेवू शकत नाही. पण आत्ता नाही. अगोदर मला ममीशी बोललं पाहिजे; प्लीऽज—

हेमा (पाठ वळवून जाऊ लागते. दाराशीच थबकून वळून) संध्याकाळच्या मेजवानीला तरी जाणार आहोत की नाही आपण?

राजीव सायन्स ॲसोसिएशनचं गॅदरिंग म्हणजे माझ्याच डिपार्टमेंटचं फंक्शन; जायला तर हवंच, त्यातून डॉ. गिडवानींच्यासारखे मुख्य पाहुणे, पण ...बघतो. तू ममीला तर पाठवून दे.

(हेमा जाते. राजीव अस्वस्थ. विचारमग्न. ट्रान्झिस्टर उचलून काही तरी चाळा करायचा म्हणून निरनिराळी स्टेशने लावण्याचा प्रयत्न करतो. मग ट्रान्झिस्टर बंद करून एकदम उठतो. टेलिफोनजवळ जातो. रिसीव्हर उचलून डायल फिरवतो. मग—) हॅलो... मी प्रोफेसर राजीव मुळगावकर... पेपर रीडिंगचा कार्यक्रम व्यवस्थित पार पडला? ...दॅट्स गुड... कुठं? ऑफिसमध्येच? मग जरा प्रिन्सिपॉलना द्या. (क्षणमात्र शीळ घालीत उभा राहतो. मग एकदम—) सर... मी राजीव बोलतोय... एव्हरीथिंग ओ के...? हूं... हूं... छे छे सगळं आपल्या मुलामुलींनीच केलंय. माझं त्यात काय आहे?... हूं... हूं... हूं... ते ठीक आहे. शक्य तोवर मी येतोच आहे, पण... नाही, नाही ...छे छे, तसं काही... (याच वेळी मुक्ताबाई येतात आणि दारातच थबकतात. राजीवची अर्थातच त्यांच्याकडे पाठ आहे.) नाही नाही

हो... डॉ. गिडवानींना एम्बरॅसिंग वाटण्यासारखं ते काहीही बोलले नाहीत. पण... बरं...हूं...हूं...हूं... थोऽडा उशीर होईल. चालेल? ...हो... हो... हेमादेखील येते आहे... ओऽके (रिसीव्हर खाली ठेवतो आणि वळतो. तेवढ्यात मुक्ताबाई पुढे येतात आणि— )

मुक्ताबाई (शांतपणे) डॉ. गिडवानींनी काय सांगितलं तुला, राजू?

राजीव (गलबलून) जे सत्य इतके दिवस तू माझ्यापासून लपवून ठेवलं होतंस तेच. ममीऽऽ हे तू चांगलं केलं नाहीस.

मुक्ताबाई मी काय करायला हवं होतं, राजू?

राजीव तू मला का नाही सांगितलंस?

मुक्ताबाई मी यांनादेखील काही सुगावा लागू दिलेला नाही.

राजीव पपांच्याबद्दल ठीक आहे. त्यांना धक्का सोसवणार नाही. पण मीऽऽ? चांगला धडधाकट आहे. तू मला का नाही विश्वासात घेतलंस?

मुक्ताबाई राजू...तू हे काय विचारतो आहेस? एका मोडतोडीतून तू नुकता कुठं सावरला आहेस. आत्ता आत्ता तुझं लग्न झालंय. सुखाचा पहिला घासदेखील तुझ्या गळयाखाली उतरला असेल नसेल, तेवढ्यात हा धक्का मी तुला द्यायला हवा होता? अरे एवढ्या प्रयासाने मिळवलेलं तुझं सुख मी नासून टाकायला का हवं होतं?

राजीव (आवेगानं) आग लागो त्या सुखाला. पण मी—

मुक्ताबाई अशी आग लागून कशी चालेल, राजा? मी आई आहे तुझी; साता जन्मांची वैरीण नाही.

राजीव (डोळे भरून येत) पण ममी, तुला हे—हे सगळं एकट्यानं सोसावं लागलं.

मुक्ताबाई (त्याला जवळ घेत) हा रे वेड्या. त्यात नवल काय घडलं? तुझी तशी तिचीदेखील मी आई आहे. आणि आईनं हे सोसायचं नाही, तर दुसऱ्या कोणी रे?

राजीव (आवेगानं ताडकन उठत) ममी, मी तुला मूर्खासारखं काय काय बोललो ते आठवलं तरी शरम वाटते मला. मी एवढा मठ्ठ कसा झालो ते अजूनही मला कळू शकत नाही.

मुक्ताबाई तसं नाही रे, राजू—

राजीव (आवेगाने) तसंच आहे, ममी, अगदी तसंच आहे. एरवी मला सांग ममी, ती त्याच्याबरोबर दिल्लीला एक दिवस हॉटेलमध्ये राहिली, आम्ही सगळ्यांनी एवढी आदळआपट केली, एवढा त्रागा केला, तरी तू तोंड मिटून गप्प होतीस. रडलीस, तरी तू बोलली नाहीस. जे बोलली त्याचा

अर्थ त्या वेळी तरी आम्हा कोणालाही कळला नाही. कुणालाही कळला नसला तरी मला तो नक्कीच कळायला हवा होता. ममी, मी नुसताच मठ्ठ नाही, माझ्या सुखासाठी मी निष्ठुर झालो होतो, स्वार्थी अप्पलपोटा झालो होतो. (गहिवरत, अस्फुट हुंदका देत, मटकन बसून तळव्याने तोंड झाकीत) ममीऽऽ मी तिच्याशीदेखील फार वाईट वागलो ग!

मुक्ताबाई (कठोरपणे) राजू, तू पुरुष आहेस. बायकांच्यासारखं हे रडणं तुला शोभत नाही.

राजीव (हुंदका देत) ममीऽऽ नंदू मला हवीय ग.

मुक्ताबाई नंदू कोणाला नकोशी झालीय रे? (थबकून राजीवला न्याहाळत) नाही...नाही, राजू...रडायचं नाही. (थबकून) राजू, रड-रडून तू फक्त मला टिपं गाळायला लावशील. पण तेही खरं नाही. कारण आता मुळी रडण्यापुरतेही अश्रू माझ्या डोळ्यांत उरले नाहीत. (हे म्हणत असतानाच डोळे पाणावतात, तशी—) तेही खोटं. डोळे पुन्हा पाणावले बघ. (डोळे टिपत, स्वतःला सावरत) राजू, तुला एकच सांगते (थबकून) ऐकणार आहेस का रे? (शून्यमनस्क होतात.)

राजीव (डोळे पुसतो, सावरतो, आणि) सांग ममी; मी ऐकतो आहे. (थबकून वर पाहात) ममीऽऽ—

मुक्ताबाई (दचकून भानावर येत) ऊं? तू होय?—काय म्हणत होते रे मी?

राजीव तू काहीतरी मला सांगणार होतीस, ममी.

मुक्ताबाई (विषण्ण स्मित करीत) अलीकडे माझं असं फार व्हायला लागलंय. बघ. अरे प्रत्येक वेळी नंदू माझ्याकडून पेनल्टी म्हणून एक एक साडी वसूल करते.

राजीव (आवेगाने) ममीऽऽ

मुक्ताबाई तर मी तुला म्हणत होते राजू—त्या वेळी तू मला तसा बोललास त्याचा राग नाही आला. तसं तुझ्या आणि त्यांच्या रागावण्यात गैर काय होतं? फक्त नंदूच्यापुढं काय वाढून ठेवलंय ते मला एकटीलाच दिसत होतं. त्या निष्पाप, अल्लड, गोड मुलीला दैवानं जबर शासन केलंय. अगदी अकारण. नुसता विचार मनात आला तरी रक्त गोठून जातं. पोटात कासावीस होतं. कोणी तरी लचके लचके तोडतंय अशा वेदना होतात. (थबकून) मला कळलं त्या क्षणी मी एवढंच मनाशी ठरवलं की, नंदूच्या सुखापलीकडे दुसरा कसलाही विचार यापुढं करायचा नाही. ती मागेल ते तिला मिळायलाच हवं. आता तिच्या वागण्याचा न्याय-

निवाडा करायचा कोणालाही अधिकार नाही. अगदी ईश्वरालासुद्धा नाही. हं—अर्थात तो असलाच तर! तिनं लग्नाचा हट्ट धरला नसता तर बाकी सगळं—सगळं मी आनंदानं पत्करलं असतं. असा चमत्कारिक दृष्टीनं बघू नकोस, राजू—अरे तुझी आणि तिची गोष्टच वेगळी होती. तुला इथंच, माणसांच्या या समाजात राहायचं होतं. तिचा जायचा दिवस— अगदी क्षणसुद्धा ठरला गेला आहे. फक्त आपल्याला तो कळत नाही म्हणून वाट बघत बसायचं मख्ख मुद्रेनं, आणि मुर्दाड मनानं— स्वतःला, तिला, आणिक 'साऱ्यांनाच फसवीत. जे कधीही घडणार नाही ते घडेल, चमत्कारानं तरी घडेल, अशी वेडी आशा करीत. ( थबकून ) राजू, हेमाच्या बाबतीत मी तुला फार टाकून बोलले नाही रे?

राजीव ( गलबलून ) नाही, ममी...तसं नाही...

मुक्ताबाई राजू, अरे ज्याला जमिनीवरच रहायचंय त्याला किनाऱ्याचं बंधन पत्करायलाच हवं; नाही का? पण जिचा किनाराच सुटलाय तिला कसलं बंधन, कोण आणि का म्हणून घालणार? ( करुण हसत ) सगळाच खुळेपणा आहे झालं.

राजीव ममी, मला अगदी खरं सांग...नंदूला ब्रेन ट्यूमर...? ( त्या मानेने होय म्हणतात, तशी ) मॅलिग्नंट? सेकंडरी? ( त्या कष्टाने होय म्हणतात, तशी उठत आवेगाने ) तर मग ममी, नंदूला घेऊन आपण स्वीडनला जाऊ या. माझ्या ओळखीचे तिथं एक प्रख्यात सर्जन आहेत. म्हणशील तर तिला घेऊन आपण—

मुक्ताबाई ( करुण हसत ) हा आणखी एक खुळेपणा. अरे या दुखण्यावर त्रिखंडात कुठंही इलाज असता तर जीव गहाण टाकून मी तिला नेली नसती का? ऊं हूं:...वेड्या, कितीही रडलास तरी दैवाला पाझर फुटणार नाही. आधी डोळे पूस.

राजीव ( डोळे पुसत )...ममी, तिला कल्पना आहे आपल्या दुखण्याची?

मुक्ताबाई अजून तरी नाही. तिला आणिक त्यांना यातलं काहीसुद्धा कळता कामा नाही. तुलादेखील यापुढं माझ्यासारखंच कोडग्या मनानं आणि हसऱ्या मुद्रेनं घरात वावरायला हवं. ( थबकून ) हे डॉक्टर होणं सगळ्यात भारी वाईट आहे बघ, राजू. अरे फक्त दुखणं कळतं, पण इलाज तेवढा कळत नाही, कारण इलाज नसतोच मुळी. मग बाकी उरतो तो फसवाफसवीचा कारभार. खरं एकच आहे, दैवानं पदरात टाकलेले भोग. ते टळत नाहीत, टाळता येत नाहीत. त्यात कोणाला भागीदारदेखील होता येत

नाही. ज्याचे त्याला ते भोगूनच संपवावे लागतात. दलदलीत फसलेल्यानं केविलवाणी धडपड करीत पळापळानं रुतत जावं आणि दुरून बघणाऱ्यांनी टाचा घासत असहाय्यपणं 'हाय हाय' करीत राहावं. बस ! एवढंच खरं आहे.

राजीव (आवेगाने) ममी... ममी... मी तिच्यासाठी काय करू तेवढंच सांग...

मुक्ताबाई (स्मित करीत) सांगू ? माझं ऐकशील ? डोळ्यांतलं पाणी पुसून टाक. एकदाच. निर्धारानं. कायमचं. आणिक तिच्याशी गोड—गोड—गोड वाग, भाजलेल्या माणसाला कापसात ठेवतात ना, तसा.

(हरिभाऊ दारात येऊन थबकलेले असतात. राजीव डोळे पुसून सावरतो तेवढ्यात ते पुढे होतात आणि—हरिभाऊ—"बाई-—")

मुक्ताबाई कोण, हरिभाऊ ? काय हो ? पेशंट्स वाट बघताहेत ?

हरिभाऊ छे छे, दवाखान्यात गर्दी व्हायला अजून वेळ आहे. पण एक विचारायचं होतं तुम्हाला. न...नाही म्हणजे— आपल्या नंदूताईंना शनीची पीड आहे ना, म्हणून गेले एकवीस दिवस मी शनिमाहात्म्य वाचतोय. उद्या शनीला तेल घालायला नंदूताईंना घेऊन याल ?

मुक्ताबाई (स्मित करीत) इश्श !—एवढंच ना ? जाऊ या बरं.

हरिभाऊ तशी तयारी करतो मी. (जातात.)

राजीव ममी, तू हा काय वेडेपणा चालवला आहेस ? असल्या भोळसटपणावर खरंच श्रद्धा आहे का ?

मुक्ताबाई राजू, अरे सगळी शास्त्रं आणि सगळी तत्त्वज्ञानं पांगळी होतात, तेव्हा भोळीभाबडी श्रद्धादेखील काडीच्या आधारासारखी वाटते. बिचारा गंगाराम देखील रोज सोमेश्वराचा अंगारा आणून तिला लावतोय.

(तेवढ्यात बाहेर नंदूचा खळखळून हसण्याचा आवाज येतो. पाठोपाठ देवदत्त म्हणत असतात— "नाही नाही...हेमा, तू तिचं काहीही ऐकू नकोस. ही फार वात्रट झालीय...")

मुक्ताबाई (गडबडीने) नंदू परत आलीय. चटकन तोंड धुऊन ये. आणि—

(राजीव चटकन आत जातो. बाहेरून नंदू 'मॉम्स...ए ममीऽऽ' अशी हाकारत प्रवेशते. मुक्ताबाई धावून दाराशी जात 'कशी आहेस ग ठकूताई ?' असे म्हणत तिला जवळ घेतात. तिचा मुका घेतात. पाठोपाठ हेमा आणि देवदत्त प्रवेशतात. नंदूच्या अंगात बेलबॉटम आणि कुडता. डोक्याला रुमाल बांधलेला. डोळ्यांवर काळा चष्मा. आत येता येता— )

नंदू (हसत हसत) मॉम्स—अग पपांची मजाच मज्जा.

देवदत्त काही मजा नाही अन् फिज्जा गाही. ही पोरटी—

नंदू आता तुम्ही बोलू नका मध्ये. (नंदूच्या चालण्यावरूनच तिला अंधुक दिसत असावंसं लक्षात येत. मुक्ताबाई तिला धरून एका आसनापाशी आणून बसवतात. नदूं हसत सांगते—) अग आम्ही पार्कमध्ये जाऊन बसलो. पपा गेले भेळपुरी आणायला.

देवदत्त तिच्यासाठी. मी फक्त पन्हं प्यालो.

नंदू थांबा हो. तेवढ्यात आमच्या वर्गातला शाम वर्मा आला आणि माझ्याशी बोलायला लागला. तेवढ्यात पपा तेथे आले, नीट पाहून विचारावं की नाही?

देवदत्त अरे म्हणजे कमाल झाली. एक तर माझ्या डोळ्यांवर चष्मा नव्हता. शिवाय त्याच्या अंगावरदेखील हिच्यासारखाच पायजमा आणि अंगरखा.

नंदू बेलबॉटम आणि कुडता म्हणा की.

देवदत्त तेच तेत्र —तुमचं काय ते. शिवाय केस मानेवर लोळणारे.

मुक्ताबाई मग झालं काय?

नंदू (हसत) अग त्याला पपा म्हणतात—"तू नंदूची मैत्रीण का ग?"

देवदत्त तूच सांग मुक्ता, या मुलामुलींना पोशाखावरून ओळखायची एवढी तरी सोय उरलीय का?

नंदू (हसत) शामनं असा चेहरा टाकला म्हणतेस, तरी मी हा शाम वर्मा म्हणून पपांना सांगतेय. पण पपांचं लक्ष कुठाय? 'शामा, शामा' म्हणून—

देवदत्त अग तिचा— आय मीन त्याचा आवाजसुद्धा बायकी. बोलताना तीन-तीनदा मुरके मारायचा. मग तूच सांग, मुक्ता—

नंदू या सगळ्या बाता आहेत तुमच्या, पपा. गालावर एवढे कल्ले वाढलेले दिसत नाही तुम्हाला? (हसत) आणिक मॉम्स, शामला मराठी येत नाही हे कळल्यावर पपा आपल्या हिंदीत बोलायला लागले. त्या वेळी तर तू हवीच होतीस ऐकायला. अग हेमा—

देवदत्त तशा काही मी फार चुका केल्या नाहीत हं बोलताना. उगाच—

नंदू (नक्कल करीत) शामा खावो, खावो, ये भेळपुरी विलक्षण खमंग है. ये बटाटेवडे तो एकदम खुबसुरत.

देवदत्त बटाटेवड्याला नाही, मी कचोरीला म्हटलं. वडा आणि पॅटिस अंमळ तिखटच होतं.

नंदू पण कचोरीला तरी 'खुबसुरत' म्हणतात का ?

देवदत्त आता छोकरी तशी कचोरी. चुकून आला शब्द तोंडात. त्याचा एवढा गाजावाजा—

मुक्ताबाई पण म्हणजे तुम्ही खाल्लंत तरी काय काय ?

नंदू (हसत) अग पानिपत ! सगळ्या फेरीवाल्यांचा पाऽर फडशा पाडला पपांनी. कोणाना नको म्हणून म्हटलंच नाही, 'काय असेल ते आणाऽऽ'—

देवदत्त पोरटे, ही दगलबाजी ? त्या आंधळ्या भिकारी मुलाला काय हवं असेल ते खायला द्या, म्हणून मला कोणी फर्मावलं ?

नंदू अहो पण त्या आंधळ्याला. तुम्ही तर त्याचं निमित्त करून आपलं-देखील वनभोजन उरकलंत. (सगळे हसायला लागतात, तशी)

देवदत्त असो असो. सात वाजायला आले. पक्षकार वाट पाहात असतील कचेरीत माझी. (असे म्हणत लगबगीने मागल्या पावली बाहेर पसार होतात. मुक्ताबाई नंदूजवळ जात— )

मुक्ताबाई कशी आहेस ग, नंदू ?

नंदू (प्रसन्नपणे) छाऽऽन, पपा पसार झाले नं ग ! वाटलंच मला. हेमा, इकडे ये की ग, मला तुझी साडी बघायचीय. (हेमा तिच्याजवळ जाऊन बसते तिच्या साडीचा पदर डोळ्यांजवळ नेऊन न्याहाळत–) त्या दिवशी मी आणलेली सीफॉन साडी नाही का ग ? मॉम्स, हेमाला साडी किती क्यूट दिसत असेल नाही ! कानांत काय घातलं आहेस बघू ? (चाचपून पाहात) शीऽऽ भंकस कुड्या ?– आधी काढून टाक.

हेमा पण—

नंदू पण बीण काही नाही. आधी काढून टाक. दादाबरोबर कॉलेजमध्ये पार्टीला जाणार म्हणतेस आणिक-– मॉम्स, माझ्या हिऱ्याच्या इयर-रिंग्ज दे ग हेमाला !

मुक्ताबाई आत लॉकरमध्ये ठेवल्यात. जा, घालून ये, बाई.

हेमा पण या कुड्या तशा काही—

नंदू नाही नाही...मी मुळीच ऐकायची नाही. जा, पळ अगोदर. की मी—

हेमा नको नको– मी येते घालून (आत जाऊ लागते, तेवढ्यात आतून राजीव येतो आणि—)

राजीव त्याची काही जरुरी नाही. हेमा, आज आपण पार्टीला जायचं नाही.

मुक्ताबाई पार्टीला जायचं नाही ? का ? ते बरं दिसायचं नाही, राजू. तुम्हाला जायलाच हवं- हेमा, तू जा. इयररिंग्ज घालून ये. (हेमा जाते.)

राजीव (नंदूजवळ बसत) मी आज या नंदीबैलाबरोबर झब्बूचा डाव मांडावा असं ठरवलंय, ममी. असला तसला नाही– गड्डा झब्बू बरं का– गड्डा झब्बू !

नंदू (त्याचा हात हाती घेत) वा वा, झब्बूराव, फार दिवसांनी एवढे लाडात आलात ! माझ्याशी लबाडीचा डाव खेळायचाय ?

राजीव लबाडीचा काय म्हणून ? आमचा सगळा कारभार खुल्लम् खुल्ला.

नंदू अहो महाराज, पत्ते खेळायला आधी पत्ते डोळ्यांना दिसावे लागतात हे विसरलात वाटतं ? (हसते.)

राजीव (गोरामोरा होत) आय ॲम सॉरी, नंदू—

नंदू (थट्टेखोरपणे) थांब, माझे डोळे एकदा बरे होऊ देत, मग दाखवते नंदी कोण आणि बैल कोण ते.

राजीव पत्ते सोडून दे ग. आपण दुसरं काहीतरी खेळू या—

नंदू मला खेळता येण्यासारखा एकच खेळ उरलाय आता. आंधळी कोशिंबीर. (हसते.) खेळ बीळ राहू द्या मिस्टर, हेमाला घेऊन जा आधी. बिचारी दुपारपासून नट्टापट्टा करून बसलीय.

राजीव (आपल्या हातातला नंदूचा हात सहजगत्या न्याहाळत) ममी, नंदूच्या हातावर हे काळसर डाग कसले पडलेत ग ?

नंदू अरे चेटूक केलंय माझ्यावर. तुझ्या स्वीडनमधल्या सासूनं.

राजीव (मारायचा आविर्भाव करीत) चल चावट कुठली !

मुक्ताबाई डॉक्टर दुभाषींनी दिलेल्या गोळयांचे साइड इफेक्ट्स् आहेत हे, पण इंजेक्शनचा कोर्स घेतला की जातील ते डाग. (तेवढ्यात हेमा येते, आणि–)

हेमा मी तयार झालेय हं.

नंदू बघू– बघू ग... (हेमाजवळ जाते आणि वाकते, तिला न्याहाळत) सुंदर...तुला फारच शोभून दिसतात हेमा, नाही ग मॉम्स ? आता तूच घालत जा या इयर-रिंग्ज.

राजीव बक्षीस ?

हेमा इश्श ! काहीतरीच काय ?

नंदू हो हो बक्षीस. भाऊबिजेला तू मला नव्या घेऊन दे म्हणजे झालं !

मुक्ताबाई भाऊबिजेला पुष्कळ अवकाश आहे अजून. राजीव, तुम्ही चला पाहू आता. नंदूला जरा स्वस्थ विश्रांती घेऊ दे.

(राजू, "अच्छा नंदी, बाय बाय–" असे म्हणत आवेगाने जातो. पाठोपाठ हेमाही "जाऊन येते हं" म्हणत जाते. मुक्ताबाई दारापर्यंत

हेमाशी काही सूचनावजा कुजबुजत जातात. मग माघारी वळतात. थबकतात. कारण नंदू आपल्या दोन्ही हातांवरले डाग बाह्या वर करून डोळ्यांजवळ नेऊन न्याहाळण्याचा प्रयत्न करीत असते, तशी– )

मुक्ताबाई काय पाहाते आहेस ग, नंदू ?

नंदू डाग कुठं कुठं उठलेत ते बघत होते.

मुक्ताबाई छे ग, तसे काही फार नाहीत. आणिक असले तरी जातील.

नंदू मॉम्स, तोंडावर उठलेत का ग ?

मुक्ताबाई नाही ग...मुळीच नाही.

नंदू आणिक उठले तर उठले. ( हसून ) तोंडावर डाग, एक डोळा तिरळा झालेला, आणिक डोक्याचे केस जाताहेत– मॉम्स, माझं ध्यान मोठं मजेदार दिसत असेल नाही ! ( हसू लागते. हसता हसता पाणावलेले डोळे हळूच गॉगल वर करून पुसून टाकते. )

मुक्ताबाई ( तिला जवळ घेत ) नाही ग बाबी...मी तुला सांगते, तुझे डाग जातील, डोळा बरा होईल, आणि काल मी जे क्रीम आणलंय ना ते नियमानं लावल्यावर पंधरा दिवसांत केस गळायचे थांबतील.

नंदू ( निःश्वास टाकीत ) हूंऽऽ ! ( सोडवून घेत क्षणमात्र आईकडे रोखून पाहाते आणि एकदम खुदकन पण मंद हसते. तशी– )

मुक्ताबाई का हसलीस ग ?

नंदू ( आईचा हात हाती घेत ) मॉम्स, तू मला किती दिवस फसवीत राहाणार आहेस ?

मुक्ताबाई ( चरकून ) म...म्हणजे ?

नंदू ( हसून ) मला काय झालंय ते मला माहीत नाही असं का तुला वाटतं ? अग मी तुझी लेक आहे,–एका डॉक्टरिणीची.

मुक्ताबाई ( गलबलून, तिला पोटाशी घेत ) नाही नाही ग नदू...( हुंदका अनावर होतो, तशी तिला सोडून उठतात नि जाऊ लागत– ) आलेच हं मी.

नंदू ( आईचा हात धरून ) नाही ममी–मला ठाऊक आहे बाथरूममध्ये जाऊन तू रडणार आहेस. रडायसाठी तुला तेवढी एकच जागा उरलीय. ( मुक्ताबाई पदर दातात धरून उमाळा आवरतात. तशी ) बस इथं. अशी माझ्याजवळ बस. माझ्या खांद्यावर मान टाक. आज मी थोडीशी तुला आई होणार आहे. ( मुक्ताबाई तिच्या गळयाला मिठी मारतात नि तिच्या खांद्यावर मस्तक ठेवीत रडरड रडतात. नंदू— आईला थोपटीत राहते. पहिला दुःखावेग संपल्यावर मुक्ताबाई दूर होत डोळे पुसतात, तशी— ) ममी, आता मी काय सांगते ते ऐक. मरणाचं मला

मुळीसुद्धा भय वाटत नाही. तसं काय— मॅच खेळताना नाही आउट होत ? पण स्पिरिट नाही जाऊ द्यायचं. मी असं ठरवलंय ममी, अगदी शेवटपर्यंत आनंदात राहायचं. मी सगळं सोसेन, पण तुम्ही कोणी डोळ्यांतून पाणी काढायचं नाही. तुम्ही कोणी म्हणजे फक्त तूच. मला ठाऊक आहे, बाकी कोणालाही काही माहीत नाही ते. पपांना तर मुळीच कळता कामा नाही. काऽय ? रडू नकोस बाई. हे बघ ममी, तू सांगशील ते मी करीन, म्हणशील तिथं येईन. टाटा मेमोरियलमध्ये जायचं म्हणशील तर तिथं जाईन. शनीच्या देवळात चल म्हणालीस तर तिथं येईन. ज्यामुळे तुला बरं वाटेल ते निमूटपणे करीन. पण एक वचन दे मला, पुन्हा म्हणून डोळ्यांतून पाणी काढायचं नाही की चेहरा सुतकी करायचा नाही. देशील वचन मला ? (नंदू हात पुढे करते. क्षणार्ध मुक्ताबाई दुःखावेग प्रयासाने आवरतात. मग तिच्या हातावर हात देतात, तशी— ) दॅट्स लाइक ममी ! तुला एकच गंमत सांगते. काल जय भेटला होता मला. मी त्याला काय सांगितलं आहे ठाऊक ? मी म्हणाले त्याला— ' जय, ममीचा आपल्या लग्नाला का विरोध आहे ते कळलं मला. अरे मी मेडिकलला जायचं ठरवलंय ना ? ममी म्हणाली —मेडिकलला जायचं असेल तर आणखी पाच-सहा वर्षं तरी लग्नाचा विचार डोक्यातून काढून टाकायला हवा तुला. मला तिचं म्हणणं पटलं. तर आता तू माझ्या नादात गुंतून पडू नकोस. एक छानदार मुलगी पाहा आणि लग्न करून टाक. जय म्हणाला— ' बरं आहे आजीबाई, उद्या-पासून मुली पाहायला सुरुवात करतो. ' (हसते.) आणि मॉम्स, सगळ्यांत मज्जा सांगते. मला काय झालंय हे जयला माहीत आहे. आणिक जयला ते माहीत आहे ते मलाही ठाऊक आहे. निव्वळ फसवा-फसवी. (मंद हसते.) पण या फसवण्यातच सोसण्याचं केवढं बळ मिळतं, नाही ? अग चिअरिंग चांगलं असलं ना म्हणजे हरणारी मॅच-देखील शेवटच्या पॉइंटपर्यंत जिद्दीनं खेळता येते बघ. (नंदू मुक्ताबाईच्या कुशीत शिरते, त्या तिला कोरड्या डोळ्याने पण प्रेमळ हाताने थोपटत असतानाच नंदू म्हणते ) मॉम्स, आता पुन्हा तू आई हो आणि शेवटचं सांगते तेवढंच ऐक. (आईच्या उराशी मस्तक घुसमटत ) मॉम्स, मी मरणाला घाबरत नाही. खरंच नाही. वेदना मी वाट्टेल तेवढ्या सोशीन. बघ हंऽऽ ! तोंडातून मी ब्रदेखील काढायची नाही. पण ममीऽऽ... हे केस गळणं, डोळा तिरळा होणं आणि अंगावर डाग येणं... नाही ममी,— ही विद्रूपता मला सोसायची नाही. असं विद्रूप होण्यापूर्वीच

मला जाऊ दे गऽऽ (उमसून रडू लागते. मुक्ताबाई तिला थोपटत राहतात. मग— )

मुक्ताबाई ऊठ, बावी. (तिला उठवत तिचा मुका घेत) चल. आत जाऊन जरा पडून रहा. खूप थकलीस तू. हे बघ, नन्ही, दैव फिरलं, देव निष्ठुर झाला तरी आईची माया कधीही पातळ होणार नाही.

(मुक्ताबाई नंदूला आधार देत आत जाऊ लागतात, तोच डॉ. दुभाषी येतात आणि— )

डॉ. दुभाषी नंदू— कशी आहेस मुली ?

नंदू (हसून) फाइन. कोणी डोळे दिले तर मॅचसुद्धा खेळायला जाईन.

मुक्ताबाई डॉक्टर, तुम्ही थांबा जरा. मी इतक्यात येते. नंदूला विश्रांतीची गरज आहे. चल, बावी—

(मुक्ताबाई नंदूला घेऊन जातात. डॉ. दुभाषी सिगरेट काढून शिलगा-वीत विचारमग्न उभे राहतात. क्षणभराने मुक्ताबाई येतात. आल्या-आल्याच दाराशी थबकून, आत वळून— "आलेच नंदू—" असे म्हणतात आणि— )

मुक्ताबाई डॉक्टर, तुम्हाला एक विनंती करते. आजची संध्याकाळ तुम्ही माझा दवाखाना संभाळाल ? फक्त आजची संध्याकाळ. नंदूला आज आईची फार गरज आहे, म्हणून म्हणते—

डॉ. दुभाषी संभाळीन की. त्यासाठी एवढी विनंती, आर्जवं कशासाठी ? नंदू कशी आहे ?

मुक्ताबाई (दारात उभे राहून आत पाहात) तशी... तशी ठीक आहे. पण (हलकेच) तिला आपलं दुखणं कळलंय.

डॉ. दुभाषी (प्रक्षोभित होत) सांगता काय, मुक्ताबाई ?

मुक्ताबाई फार धीरानं पत्करलंय तिनं सगळं. पण— (थबकून) डॉक्टर, नंदूचं ऑपरेशन करायचं असं मी ठरवलंय. तुम्ही डॉ. गिडवानींना भेटून पुढल्या—

डॉ. दुभाषी (उसळून) मुक्ताबाई, तुम्ही वेड्या आहात. मेंदूवरल्या असल्या शस्त्र-क्रियेत हजारात एखादा रोगी बरा होतो.

मुक्ताबाई तीच कदाचित नंदू असेल.

डॉ. दुभाषी आणिक नसेल देखील.

मुक्ताबाई नसली तर नसू दे. तो धोका पत्करायचं मी ठरवलंय. अखेर सवाल एकच आहे डॉक्टर, जिचं मरण अटळ आहे, जी सगळ्या वेदना हसत-मुखानं सोसतेय तिनं विद्रूप होण्याची विटंबनादेखील सोसायलाच हवी का ?

डॉ. दुभाषी पण, मुक्ताबाई—

मुक्ताबाई नाही डॉक्टर, केस गळणं आणि डोळा तिरळा होणं यातलं जिवंत मरण काय आहे ते फक्त अठरा वर्षांच्या मुलीलाच कळतं. तुम्हाला ते कधीच कळायचं नाही. ( आत जाऊ लागतात. )

डॉ. दुभाषी थांबा, मुक्ताबाई. शस्त्रक्रियेचा निर्णय घेण्यापूर्वी एकदा देवदत्तांना सांगायला हवं. त्यांनाही विश्वासात—

मुक्ताबाई ते तुम्ही माझ्यावर सोपवा. वेळ येईल तेव्हा मीच त्यांच्याशी बोलेन. पण डॉक्टर, नंदूबद्दल तुमच्या हृदयात थोडी जरी दयामाया असेल तर शस्त्रक्रियेचा दिवस लवकरात लवकर ठरवा—मी पदर पसरते. . .भीक मागतेय तुम्हाला. . .

( आवेगाने अस्फुटपणे हुंदका देत आत जातात. डॉक्टर दुभाषी स्तंभित होऊन पाहात असतानाच— अंधार होतो. )

( प्रवेश पहिला संपला )

## अंक तिसरा

### प्रवेश दुसरा

(तोच हॉल. काही दिवसांनंतरची एक सायंकाळ. आतून हेमा लगबगीने येते. तिच्या हातात सौंदर्यप्रसाधनांची छोटी बॅग आहे. तिच्या पाठोपाठ गंगाराम एक सूट-केस घेऊन येतो. आणि–)

हेमा (गंगारामला) हं. ठेव ती तिथं. आता वर जा आणि नंदूताईंना विचार तुमचं आणखी काही बरोबर घ्यायचंय का ते. (गंगाराम जाऊ लागतो' तशी–) नाहीतर थांब. जयसिंहराव वर आले आहेत. नंदूताई बोलताहेत त्यांच्याशी. ते गेल्यावर मीच त्यांना विचारीन. तू असं कर, आत ओस्यावर वॉटर-बॅग, थर्मास आणि विजेची शेगडी काढून ठेवलीय, तेवढी घेऊन ये. (गंगाराम आत जातो. हेमा टॉयलेट बॅग उघडून आतल्या वस्तू पाहू लागते. एवढ्यात बाहेरून राजीव येतो. तशी–) काय काय झालं ?

राजीव एव्हरिथिंग ओ. के. हॉस्पिटलमधली उत्तमात उत्तम रूम ताब्यात घेतलीय. आमचा प्रभ्या ताम्हणकरच हाउसमन आहे. तेव्हा एवढी म्हणून कोणाची गैरसोय होणार नाही. केव्हा निघायचं ठरलंय ?

हेमा आता पपा आले की निघायचंच. ममी दवाखान्यात आहेत. नंदूताईंच्याकडे दुपारभर खूप मित्र-मैत्रिणी येऊन बसल्या होत्या. आता फक्त जयसिंहरावच थांबले आहेत.

राजीव कशी आहे नंदू ?

हेमा मित्रमैत्रिणी जमल्यापासून सारखं हसणं खिदळणं चाललं होतं.

राजीव डोकं फार दुखत असेल नाही ग तिचं ?

हेमा फाऽर ? लेस सेड द बेटर.

राजीव कोठून या वयेनं हे सोसण्याचं बळ पैदा केलंय देव जाणे.

हेमा तुम्ही नंदूताईच्या सोसण्याबद्दल बोलता; पण ममी कोणकोणत्या दिव्यांतून गेल्या आहेत ते फक्त मी पाहिलंय. तुम्हाला खरंच सांगते, त्या दिवशी तुम्ही ममींना एवढे ताडताड तोडून बोललात, तेव्हा माझा जीव—

राजीव (प्रक्षोभानं) याचा अर्थ हेमा, नंदूचं दुखणं तुला खूप आधी कळलं होतं. खरं आहे ?

(हेमा चकारून मानेनं होय म्हणते तशी—)

राजीव — मग तू मला त्या वेळी का नाही सांगितलंस ?

हेमा — असल्या गोष्टी बोलणं सोपं का असतं ? बोलायचं म्हणून निर्धार केला तरी वेळ येताच एकेक शब्द ओठातच लटपटतो, जीभ पांगळी पडते.

राजीव — पण जीवाभावाच्या माणसापाशी तरी—

हेमा — जीवाभावाचं माणूस तर अशा वेळी सात समुद्र दूरच होतं.

राजीव — ( सुस्कारून ) हूं ! तूही आतल्या आत सोसत होतीस.

हेमा — मी मर्मींचं सोसणं पाहात होते.

राजीव — ( सुस्कारून ) हूं. ममीचं पपांशी बोलणं झालं की नाही अजून ?

हेमा — नसावंसं वाटतं. ( थबकून ) का ?

राजीव — हूं. पपांना वास लागला असावा असं मला वाटतं.

हेमा — कशावरून ? तुमच्यापाशी बोलले का काही ते ?

राजीव — बोलले म्हणजेऽऽ पुन्हा पुन्हा "कसलं ऑपरेशन आहे ? कितपत सीरियस आहे ?" असं कालपरवापासून विचारीत होते मला ते.

हेमा — मग ? तुम्ही काही बोलला तर नाहीत ना ?

राजीव — छे छे ! भलतंच काय ? तेवढं नाटक करायला शिकलो आहे मी.
( तेवढ्यात बाहेरून मुक्ताबाई येतात, आणि— )

मुक्ताबाई — झाली का ग हेमा सगळी तयारी ?

हेमा — हो, सगळी झाली.

मुक्ताबाई — तू गेला होतास तिकडे काय झालं, राजू ?

राजीव — सगळी तयारी झालीय ,ममी. फक्त आपणच जायची खोटी आहे.

मुक्ताबाई — ( फोनपाशी जात ) हे परतले की निघायचंच. ( रिसीव्हर उचलून ) डायल फिरवीत ) हेमा, तू आणि राजू नंदूला घेऊन जा. हे देखील बरोबर येतील. दवाखाना संपला की मी येतेच आहे. मग तुम्ही सगळी परतलात तरी चालेल. ( फोनमध्ये ) हॅलोऽऽ...मी डॉ. मुक्ताबाई... डॉ. दुभाषींना द्या जरा...( हेमाला ) इलेक्ट्रिकची शेगडी आणि थर्मास घेतलास ? ( हेमा बोटानं दाखवते. मुक्ताबाई फोनमध्ये–) हॅलो, डॉक्टर मी बोलते आहे. ( त्याच वेळी देवदत्त बाहेर म्हणतात– "हरिभाऊ, त्यांना ऑफिस उघडून द्या आणि बसायला सांगा. मी इतक्यात येतोच आहे म्हणावं" त्यच वेळी मुक्ताबाई फोनवर हात ठेवीत हेमाकडे पाहात म्हणतात, "हे परतलेले दिसताहेत ग, हेमा." त्याबरोबर हेमा– "मी चहा करून आणते" असे म्हणत लगबगीने आत जाते. मुक्ताबाई फोनवर बोलत राहतात. दरम्यान देवदत्त आत येतात. मुद्रा अस्वस्थ पण वरकरणी दिसू न देण्याची खटपट. आसनावर बसतात. )

मुक्ताबाई (फोनमध्ये) हो...हो...सगळी तयारी झालीय...छे छे... त्याची काही गरज नाही. राजू सगळं काही करून आलाय. तुम्ही आलात की निघायचंच...हो हो...हे काय आताच घरात येताहेत...नंदू? ती अगदी खुषीत. दिवसभर मित्रमैत्रिणींचा घोळका जमला होता घरात... हो ना, काही विचारू नका...आता ती सगळी गेली. फक्त जयसिंह थांबला आहे...वरं. वरं...हूं...मग मी आता राजीवला गाडी घेऊन तुमच्याकडे पाठवू? पाठवते. (रिसीव्हर खाली ठेवीत) राजू—

राजीव डॉ. दुभाषींना घेऊन यायचं, एवढंच ना? आत्ता आणतो.

(राजीव लगबगीनं जातो. देवदत्त तसेच न्याहाळत बसले आहेत. मुक्ताबाई प्रसन्न स्मित करीत त्यांच्याजवळ येऊन बसत विचारतात–)

मुक्ताबाई कशी आहे तुमची प्रकृती?

देवदत्त (दचकून) कोण मी? माझी? म...मला काय झालंय? छान आहे की.

मुक्ताबाई हेमा चहा घेऊन येईल इतक्यात.

देवदत्त चहा तर पाहिजेच बुवा.

मुक्ताबाई काही खायला करायला सांगू का?

देवदत्त अँऽऽ? हे कोणी विचारलं? खायला? आणि मला? मुक्ता, हे तू... तू मला विचारतेस?

मुक्ताबाई इश्श. नाहीतर दुसरं कोण विचारणार? पूर्वी कोण विचारीत होतं?

देवदत्त पूर्वी—पूर्वी म्हणजे फार प्राचीन काळी. आता असलं काही तू विचारलेलं ऐकायची सवय सुटलीय माझी.

मुक्ताबाई (मिस्किलपणे) होय का?

देवदत्त आत्ता म्हणजे— गोळ्या घेतल्यात का? इंजेक्शन घेणार का?

मुक्ताबाई पुरे पुरे. हॉस्पिटलमधून परत यायला उशीर होईल म्हणून विचारते आहे, काही खायला करायला सांगू का?

देवदत्त तू खाणार आहेस माझ्याबरोबर?

मुक्ताबाई माझा उपवास आहे आज.

देवदत्त मग माझादेखील. तेवढंच क्रेडिटला दुप्पट पुण्य.

मुक्ताबाई पांचटपणा पुरे झाला. परतायला फार उशीर होईल म्हणून—

देवदत्त तू विचारलंस ना? यात सगळं भरून पावलो. अगदी ब्रह्मसाक्षात्कार–

मुक्ताबाई काहीतरीच काय— (तेवढ्यात हेमा चहाचा कप घेऊन येते. देवदत्त कप उचलून ओठाला लावतात.) हेमा, यांच्यासाठी तू सँडविचेस आणि कॉफी करून बरोबर घे. (मान डोलावीत हेमा आत जाऊ लागते,

तशी—) नंदूसाठी पांघरायला काय घेतलं आहेस ग ?

हेमा तुमची शाल घेऊ ?

मुक्ताबाई नको. माझं जुनं पातळ घे एखादं. बयाबाई दुसरं काहीदेखील अंगाला लावून घ्यायची नाही.

( हेमा घावचळून बघू लागते, तशी—)

देवदत्त बघतेस काय अशी, हेमा ? अग ठकूताई चार-पाच वर्षांची होती तेव्हाची गोष्ट. हिला दवाखान्यातून यायला उशीर झाला की रात्री ठकूताई आईचं पातळ अंगाभोवती गुरफटून घेऊन माझ्या मांडीवर पडायची आणि पांघरूण गोंजारीत म्हणायची—

मुक्ताबाई ( गलबलून ) पुरे होऽऽ

देवदत्त आता किनई हीच थोडीशी माझी ममी.

मुक्ताबाई ( प्रयासाने मन आवरून ) तू चल, हेमा. इतक्यात डॉक्टर येतील.

( हेमा आत जाते. देवदत्त चहा पिऊ लागतात. मुक्ताबाई अस्वस्थतेने एकदा बाहेर जातात. चाहूल घेतल्यासारखे करतात. काहीतरी बोलायचे असल्यासारखी अस्वस्थ हालचाल. उगीचच फोनपाशी जातात. उगीचच कपाट उघडतात. देवदत्तांचे अर्थातच बारीक लक्ष आहे. अखेर मनाचा धडा करीत देवदत्तांच्या जवळ येत—)

मुक्ताबाई ( अति प्रेमळपणे ) तुम्ही शांतपणे ऐकण्याच्या मनःस्थितीत असला तर एक गोष्ट तुम्हाला सांगायचीय.

( हे उद्‌गार ऐकताच देवदत्तांची मुद्रा चमत्कारिक होते. हातातला कप लटपटतो. प्रक्षोभाने ते उठून उभे राहातात. तेही डळमळत आणि त्याच वेळी—)

देवदत्त ( गांगरून, भेदरून ) क...काय...काय सांगणार आहेस...न...नाही तसा मी शांत आहे...शांत आहे...प...पण म्हणजे काही सीरियस नाही ना...नंदूचं सगळं ठीक आहे ना...

मुक्ताबाई ( एकदम मोहरा बदलीत ) इश्श ! काऽय हे ? किती घाबरलात ? किती नर्व्हस होता ? आधी खाली बसा बरं. काही सीरियस नाही. नंदू ठीक आहे. आता ऑपरेशन म्हटलं की थोडाफार धोका असायचाच. घाबरून कसं चालेल ? मी तुम्हाला एवढंच सांगणार होते, की, नंदूबरोबर तुम्ही आता हॉस्पिटलमध्ये जा. दवाखाना संपल्यावर मी येतेच आहे.

देवदत्त ( किंचित सावरत ) एवढंच...एवढंच सांगणार होतीस ? खात्री आ तुझी ? ( मुक्ताबाई हसून मानेने 'होय' म्हणतात. तशी सुटकेचा निःश्वास टाकीत ) हूं ! क्षणमात्र मला वाटलं, आता तुझ्याकडून मला

काय ऐकावं लागणार आहे आणि काय नाही. पण म्हणजे...

मुक्ताबाई माझ्यावर विश्वास नाही का तुमचा? मी तुम्हाला फसवीन असं वाटतं का तुम्हाला? तसा काही गंभीर प्रकार असता तर मी तुम्हाला विश्वासात घेतलं नसतं का?

देवदत्त तुझ्याबद्दल खात्री आहे ग मला, पण...नाही—तशी ती हुशार दिसते आहे. पूर्वीपेक्षा दृष्टीतदेखील थोडी सुधारणा आहे, नाही!

मुक्ताबाई हो ना, केस देखील गळायचे खूपच थांबलेत.

देवदत्त खरंच, अग ठकूताईला परवा मी एक गोष्ट कबूल केली आहे. बरी होऊन ती घरी परत आली की दक्षिण भारताच्या सहलीसाठी तिला घेऊन जायचं.

मुक्ताबाई एकट्या ठकूताईलाच? मग आम्ही काय पाप केलंय?

देवदत्त तुझी तरी कमालच आहे. जायचं म्हणजे आपण सगळीच जाणार. कन्याकुमारी फार फार सुंदर आहे, नाही ग?

मुक्ताबाई (उदासपणे) सुंदर... पण दूर... फार फार दूर.

देवदत्त (भोळेपणाने) छे छे! तशी फार दूर नाही ग. विमानानं—

मुक्ताबाई ते राहू दे. कचेरीत पक्षकार आले असले तर त्यांना लवकर वाटेला लावून परत या. फार उशीर करून चालायचं नाही आपल्याला.

देवदत्त (लगबगीने उठत) विसरलोच होतो की ग मी.

(लगबगीने जाऊ लागतात. दारातच डॉ. दुभाषी भेटतात. त्यांच्याकडे पाहून स्मित करीत, "येतोच इतक्यात" असे उद्गारून देवदत्त जातात. डॉ. दुभाषी आणि पाठोपाठ राजीव आत येतात.)

मुक्ताबाई राजू, नंदूची निघायची तयारी झालीय का पाहतोस का रे? झाली असली तर घेऊन ये तिला खाली.

(राजीव जातो. क्षणार्ध बोचक शांतता. मुक्ताबाई हरवलेल्या. अखेर)

डॉ. दुभाषी देवदत्तांना सांगितलंत, मुक्ताबाई—?

मुक्ताबाई (दचकून भानावर येत) ॐ? काय म्हणालात?

डॉ. दुभाषी देवदत्तांना सांगितलंत?

मुक्ताबाई नाही. नाही सांगितलं. आणिक सांगायचं नाही असं ठरवलंय मी डॉक्टर.

डॉ. दुभाषी तुम्ही देवदत्तांना फसवता आहात, हे बरं नाही, मुक्ताबाई.

मुक्ताबाई बरं नसेल कदाचित. पण तेवढंच खरं आहे, डॉक्टर. सगळेच आधार खचतात तेव्हा फसवणं आणि फसलं जाणं यासारखं दुसरं सुख नाही, डॉक्टर.

डॉ. दुभाषी कधी तरी त्यांना कळणारच आहे, मुक्ताबाई. तुम्ही आजचं मरण फक्त उद्यावर ढकलता आहात.

मुक्ताबाई खरं आहे, डॉक्टर. आजचं मरण मी फक्त उद्यावर ढकलते आहे. मीच नव्हे, आपण सारीच माणसं. प्रसंग गुदरतो तेव्हा आजचं मरण उद्यावर ढकलतो आणि फसगतीच्या सावलीला आजचा दिवस काढायला बघतो. त्यात काही गैर नाही. कारण त्याशिवाय दुसरा पर्यायच मुळी माणसाला सापडलेला नाही. ( थबकून ) मोटा धीर करून मघाशी मी त्यांना खरं काय ते सांगायला गेले, पण त्यांची अशी भयानक दयनीय अवस्था झाली की अर्धमुर्धं खरंदेखील पुन्हा एकदा खोटं सांगून पुसणं मला भाग पडलं. मग मला प्रश्न पडला की, सत्य सांगण्याचा एवढा आटापिटा करून मी काय मिळवणार आहे ? काही नाही. फक्त अनर्थ. त्या अनार्थापेक्षा आजतरी हा खोटेपणा परवडला. आणि परवडला म्हणूनच पत्करला. डॉक्टर, प्रत्येक वेळी आपण माणसांच्या सगळ्याच वागण्याला न्यायनीतीचा कस लावून बघतो, हा केवढा प्रचंड मठ्ठपणा आहे, नाही ? ( करुण हसते. ) मठ्ठपणा... आणि दुबळेपणादेखील... कश्शाला काऽही अर्थ नाही. आणि तरीदेखील अर्थ देण्याची धडपड काही संपत नाही.

डॉ. दुभाषी ( शांतपणे ) मुक्ताबाई—

मुक्ताबाई तर डॉक्टर, मी त्यांच्याशी काहीही बोलले नाही, बोलणार नाही, हे भान तुम्ही ठेवायचं. त्याचं त्यांना जेव्हा कळेल— ( त्याच वेळी वरून नंदू, राजीव आणि जयसिंह यांच्या हसण्याचा खळखळून आवाज येतो, तशी–) डॉक्टर, नंदू येते आहे. ( नंदू वरल्या दाराशी येत हाकारते, 'मॉम्स–' तोवर मुक्ताबाई धावत निम्मा जिना चढून वर जात— "कशी आहेस ग बाळी ?" म्हणत नंदूला जवळ घेत खाली येऊ लागतात. पाठोपाठ जयसिंह आणि राजीव खाली येता येता— )

नंदू मम्मी, तू धावत जिन्यातून वर आलीस ? तू तर ग्रेटच आहेस.

राजीव तू झाली आहेस आजीबाई, मग मम्मीला लहान व्हायला नको ?

( सगळे हसतात. नंदूच्या डोळ्यांवर पूर्वीप्रमाणेच गॉगल आणि डोक्याला रुमाल बांधलेला. खाली येता येता— )

नंदू आजीबाई व्हायला माझी काही हरकत नाही. पण संभाळ रे बाबा, मी सारखा तुझा कान पकडीन आणि जोडीनं नमस्कार करायला लावीन. ( डॉ. दुभाषींच्याकडे पाहात ) होय की नाही हो, पपा ?

डॉ. दुभाषी मी पपा नाही, बेटी. मी डॉ. दुभाषी.

नंदू (हसत) अय्याऽऽ पाहिलंस मॉम्स, आमच्या कॉलेजमधल्या मॅगेझिनच्या फोटो-छपाईसारखी माझी दृष्टी झालीय.

डॉ. दुभाषी मॅगेझिनच्या फोटो-छपाईसारखी म्हणजे?

नंदू (बसत, हसून) म्हणजे झेंडावंदन, कसोटी सामना आणि कोणाची तरी अन्त्ययात्रा या सगळ्यांसाठी एकच ब्लॉक वापरतात. खालच्या मजकुरावरून फोटो कोणाचा आहे ते आपण समजून घ्यायचं.
(सगळे हसतात.)

मुक्ताबाई इश्श, काहीतरीच काय...

नंदू अग ममी, काहीतरीच नव्हे. विचार जयलाच. मागच्या वर्षी, व्हर्सिटी चँपियन म्हणून एका फोटोखाली जयचं नाव छापलं होतं. वर फोटो कोणाचा असावा?

जयसिंह संत तुकडोजी महाराजांचा! (सगळे हसतात)

राजीव आणि तुमच्या फोटोखाली नाव कोणाचं होतं, तुकडोजी महाराजांचं?

जयसिंह नाऽही. श्रीमंत शेट मगनभाई— कैलासवासी. अहो काय सांगू? आमच्या दोस्तांनी—हीदेखील त्यांतलीच एक— माझ्याकडून मोर्निंग पार्टी उकळली. (सगळे हसतात. तेवढ्यात वरून गंगाराम नंदूची रॅकेट प्रेससकट घेऊन येतो आणि नंदूच्या हाती देतो, तशी—)

मुक्ताबाई हे रे काऽय? नंदू काय मॅच खेळायला निघाली असं वाटतं होय तुला?

नंदू ममी, अग मीच त्याला रॅकेट घेऊन यायला सांगितली होती. पपा कसे आले नाहीत ग अजून?

मुक्ताबाई ऑफिसमध्येच बसले आहेत. येतील इतक्यात. (दारापाशी जात बाहेर पाहून) गंगाराम, जा रे, साहेबांना बोलावलंय म्हणून सांग.
(गंगाराम जातो.)

जयसिंह रॅकेट कशाला आणायला सांगितलीस ग, नंदू?

नंदू (रॅकेट कुरवाळत) तुझा काय तर्क आहे? हॉस्पिटलमध्ये नेण्यासाठी?

जयसिंह काही अशक्य नाही. तुझा जीव गुंतलाय या रॅकेटमध्ये, नव्हे?

नंदू रॅकेट वापरताना तेवढंतरी स्मरण ठेव म्हणजे भरून पावले.

जयसिंह (थक्क होत) म... म्हणजे? म्हणजे नंदू....

नंदू (हसून) म्हणजे म्हणजे काय? तुझा फार दिवसांपासून डोळा होता नाही या रॅकेटवर? (रॅकेटला ओठ लावते नि त्याच्यापुढं करते. जयसिंहचे डोळे पाणावतात. थरथरत्या हातानं तो रॅकेट घेतो, तशी—) मात्र जिवापलीकडे तिची देखभाल करीत जा,— मी करीत होते तशी.
(सगळेच गहिवरतात. तेवढ्यात देवदत्त येतात आणि—)

देवदत्त (दारातून ओरडतात.) ठकूताई.... निघायचं ?

नंदू पण आधी इकडे या. सकाळपासून तोंड चुकवताय नाही का माझं ?

देवदत्त (तिच्याजवळ जाऊन बसत) का ग बये ? तुझं कोणतं देणं बुडवून पळालो होतो मी ! सगळ्या साळकाया-माळकायांच्या गराड्यात तुला कुठं माझी आठवण होत होती ?

नंदू तुम्हाला वाटत असेल मी विसरले म्हणून. पण हॉस्पिटलमध्ये जायच्या पूर्वी सगळं पक्कं ठरवून मगच उठणार आहे मी. मॉम्स, पपांनी सगळ्यांना घेऊन दक्षिण भारताच्या प्रवासाला जायचं कबूल केलंय माझ्यापाशी.

मुक्ताबाई होय, मघाशी म्हणाले मला ते.

देवदत्त झालं ? पटली खात्री ?

नंदू जरा थांबा. ममी, प्रवासाचा सगळा खर्च पपा आपल्या पैशातून करतील. तू आणि दादा मिळून शॉपिंगचा खर्च करायचा.

राजीव शॉपिंग कुणाचं ? तुझं ?

नंदू नाही. मी आणिक हेमा.

राजीव मेलो. निकाल लागला. परत येईतोवर आमचं दिवाळं.

मुक्ताबाई त्यापेक्षा मी आणि राजू प्रवासाचा खर्च करतो. यांनी बरीक तुझं आणि हेमाचं शॉपिंग सांभाळावं,

देवदत्त एवढंच ना ? कबूऽऽल.

डॉ. दुभाषी काय, कबूल काऽय ? बायकांचं शॉपिंग हे काय भारी प्रकरण आहे त्याचा विचार केलात का ? नुसते चार दिवस म्हैसूरला राहाल तर टाळक्यावर केस नाही उरायचा तुमच्या.

देवदत्त डॉक्टर, अहो मी तरी कुठून देणार आहे पैसे, आणि ही तरी कुठून आणणार आहे पैसे ? सगळा कारभार नंदूच संभाळते अजून. ती शिल्लक टाकणार आणि तीच—

नंदू बघा, बघा डॉक्टरकाका, कसे वस्ताद आहेत पपा— पाहिलंत ना ? पपा पपा, ते काही चालायचं नाही— दादा, तुलादेखील बजावते आहे मी—

राजीव हो हो, पण कधी जाणार आहोत आपण ?

नंदू मी सांगते, डॉक्टरकाका—

डॉ. दुभाषी काय ग, बेटी ?

नंदू हॉस्पिटलमधून बरं होऊन परत यायला मला किती दिवस लागतील हो ? (डॉ. दुभाषींची मुद्रा खर्रकन उतरते. गलबलतात; "किती म्हणजे ..." असं काहीसं रुद्ध स्वरात म्हणून थबकतात. तशी मुक्ताबाई

चटकन सावरून नेत— )

मुक्ताबाई मी सांगते. फार फार तर वीस दिवस.

नंदू मी म्हणते महिना लागेल. चांगलं वरं वाटायला आणखी एक महिना लागेल असं धरू या. तरीदेखील नाताळच्या सुट्टीत जायला काहीच हरकत नाही. काय, मॉम्स ?

मुक्ताबाई ठीक आहे. नाताळात म्हणतेस तर नाताळात जाऊ या.

राजीव नाताळात कदाचित मला कॉन्फरन्सला—

नंदू एऽऽ तुझी कॉन्फरन्स वगैरे काही नाही हं. सांगून ठेवते. जय, तूदेखील यायचंस हं. डॉक्टरकाका तुम्ही याल आमच्याबरोबर ?

डॉ. दुभाषी अवश्य अवश्य ! तू मला नेणार आणि तुझा बाप प्रवासखर्च करणार... फुकट मौज करायला कोण नको म्हणेल ?

देवदत्त डॉक्टर, तुमचा सगळा खर्च करायला मी तयार आहे. पण एक बजावून ठेवतो. प्रवासात मी पथ्यपाण्याबद्दल उगाच कोणाची दमदाटी ऐकून घेणार नाही. ( सगळे हसतात. )

मुक्ताबाई झालं ना तुझ्या मनासारखं, बाबी ? ( नंदूचा मुका घेतात. )

नंदू ( कसल्याशा स्वप्नात हरवीत ) मला म्हैसूरची वृंदावन गार्डन बघायचीय. कन्याकुमारीला तिन्ही बाजूंनी एकमेकांत मिसळलेले विशाल महासागर बघायचेत. आणिक डोळाभरून बघायचीय ती किनाऱ्यावर हातात विवाहमाला घेऊन वाट पाहात उभी असलेली प्रणयवेडी कन्याकुमारी. मम्मी, पौर्णिमेच्या दिवशी आपण कन्याकुमारीला पोचायचं बरं का. जय, अरे तिथला सूर्यास्त आणि चंद्रोदय पाहिला की दृष्टीचं पारणं फिटतं म्हणतात. पण दृष्टी— ( थबकते. एकदम क्षणार्ध गळबलते. पण चटकन स्वतःला सावरीत, उठत ) चला, जाऊ या नाही का आपण आता ! मॉम्स, तू दवाखाना संपल्यावर येणार ना ग ?

मुक्ताबाई हो. तोवर बाकी सगळे थांबतील तुझ्यापाशी.

नंदू ( देवदत्तांचा हात हाती घेत ) सगळ्यांनी थांबायची काही जरुरी नाही, मम्मी. फक्त पपा असले म्हणजे— ( थबकते. कारण देवदत्त हात सोडवून रुमालाने डोळे टिपतात ते लक्षात येऊन) पपा, तुम्ही डोळ्यांतून पाणी काढलेत ! तुम्ही तरी ग्रेटच आहात. अहो, ऑपरेशन ते केवढंसं आणिक—

देवदत्त ( सावरीत ) नाही ग ठकुताई... तसं काही नाही. चला, जाऊ या आपण.

नंदू  आणि एक गोष्ट पपा तुम्ही माझ्यासाठी करायची; – कराल ?

देवदत्त  जरूर करीन ग, ठकुताई.

नंदू  रोज संध्याकाळी तुम्ही पार्कमध्ये फिरायला जाल, त्या वेळी तो आंधळा मुलगा काय मागेल ते त्याला खाऊ घाला. पपा, आंधळेपण फार वाईट असतं.

(सगळे गहिवरतात.)

देवदत्त  देईन बरं ठकूताई. अगदी न चुकता देत जाईन.

नंदू  मी येते ग, मॉम्स.

(मुक्ताबाई नंदूच्या दोन्ही गालांचे मुके घेतात आणि शून्यमनस्क होतात)

राजीव  ममी, तू इथंच थांब. बाहेर येऊ नकोस.

हेमा  (हळूच राजीवला) मला वाटतं, मीदेखील इथं थांबावं. थोड्या वेळानं मी हॉस्पिटलमध्ये येईन.

नंदू  हो. हेमा, तू थांबच; ममीजवळ कुणीतरी हवंच.

मुक्ताबाई  (भानावर येत) ऊं !–काय म्हणालीस ?

नंदू  (बाहेर जाता जाता दारावरचा पडदा चाचपत) काही नाही; म्हणत होते की–मॉम्स, हा पडदा किती सुंदर दिसतोय नाही ग... (वळून प्रसन्न हसते आणि जाते. तिच्या आगेमागेच डॉ. दुभाषी, देवदत्त, राजीव, जयसिंह ही मंडळी जातात. गंगाराम सामान घेऊन आधीच गेला आहे. मुक्ताबाई दगडी चेहऱ्याने हरवल्यागत स्तब्ध उभ्या राहिल्या आहेत. बाहेर मोटार गेल्याचा आवाज. त्याच वेळी हरिभाऊ येतात आणि– )

हरिभाऊ  (हलकेच) बाई...(क्षणार्ध वाट पाहून)

हेमा  ममी...

मुक्ताबाई  (दचकून भानावर येत) ऊं ! काय ग ?

हेमा  हरिभाऊ आलेत.

हरिभाऊ  व्हिजिटला जायचंय ना ?

मुक्ताबाई  हो, जायला तर हवंच. (बॅगमध्ये स्टेथॉस्कोप टाकून ती मिटवतात आणि व्हिजिटला जायची तयारी करीत) दोन पेशंट्स ड्रेसिंगचे त्यांच्याबद्दल मी सुशीलाबाईंना सांगितलंय. इंजेक्शन्सदेखील त्या देतील. (पायांत चपला घालून जायला निघत) मी केस-पेपर्स तयार करून ठेवलेत तेवढ्यांची मिक्श्चर्स तुम्ही तयार करून द्या. तेवढ्यात – (असे म्हणत दाराशी येतात. थबकतात. कारण समोर दिसतो दारावरला पडदा. नंदूने लावलेला. ब्रह्मांड आठवते, बॅग गळून पडते.

बांध फुटतात. मुक्ताबाई उंचबळून येत पडद्याला मिठी मारीत "नंदू... माझी बाबी" असा हंबरडा फोडतात... आणि हुंदके दे-देऊन रडू लागतात. पडदा तुटतो, आणि त्या खाली कोसळतात. हेमा चटकन धावून त्यांना सावरते. मुक्ताबाईंचा विलाप चालू असतानाच— पडदा. )

( अंक तिसरा संपला )

IRBK-0123456

म. ग्रं. स. ठा… ग्रंथालय शाखा.
अ. क्र. २३४५६ नों. दि. [illegible]
वि. ....नाटक क्र. ....................